## मराठी

# बालभारती

### इयत्ता सहावी



विनामूल्य वितरणासाठी

Tele MANAS
National Tele Mental Health Programme
14416

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२ पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

**मनोदर्पण (८४४८४४०६३२)** ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

सदर पाठ्यपुस्तक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार तयार करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत या पाठ्यपुस्तकाची पडताळणी करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक ०१.०६.२०२६ रोजीच्या सभेमध्ये हे पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# मराठी
# बालभारती
## इयत्ता सहावी

समग्र शिक्षा




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन–अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

प्रथमावृत्ती : २०२६

## मराठी भाषा समिती

**श्री. एकनाथ आव्हाड, अध्यक्ष**
डॉ. बाबासाहेब पवार, सदस्य
डॉ. जितेन्द्र काठोळे, सदस्य
डॉ. बालाजी समुखराव, सदस्य
डॉ. वसुधा वैद्य, सदस्य
श्री. सागर तांदळे, सदस्य
श्री. सागर वणवे, सदस्य
श्री. रणजीत काळे, सदस्य
श्री. सचिन जोशी, सदस्य
श्रीमती वंदना राणे, सदस्य
श्रीमती वैशाली जोशी, सदस्य
डॉ. नरसिंग वाघमोडे, सदस्य
डॉ. आनंद सावंत, सदस्य
डॉ. अशोक भालेराव, सदस्य
श्री. सतीश भोयर, सदस्य
श्री. गिरीशकुमार जोशी, सदस्य
श्री. अजय बोबडे, सदस्य
श्रीमती पूर्वा देशमुख, सदस्य
श्री. शीलवंत वाढवे, सदस्य
श्रीमती मीना साळुंके, सदस्य
डॉ. संजयकुमार सरगडे, निमंत्रित तज्ज्ञ
डॉ. वामन सरगर, निमंत्रित तज्ज्ञ
श्रीमती स्वाती ताडफळे, निमंत्रित तज्ज्ञ
डॉ. बालमणी नंदाला, अभ्यासक्रम समन्वयक
श्रीमती सविता वायळ, सदस्य सचिव

## गाभा समिती

श्री. शेषाद्री डांगे
श्री. अरुण कोल्हटकर
डॉ. आनंद काटीकर

## गुणवत्ता परीक्षण

डॉ. माधुरी जोशी, गुणवत्ता परीक्षक
डॉ. बापू शिरसाठ, गुणवत्ता परीक्षक
श्री. श्रीकांत दळवी, विधी तज्ज्ञ
प्रा. माधवी पटवर्धन, CWSN तज्ज्ञ
प्रा. शरदचंद्र बोटेकर

## संयोजन

**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
**श्री. अशोक बाबुराव तकटे**
सहायक विशेषाधिकारी, मराठी (वि. का.)

## निर्मिती

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. राजेंद्र पांडलोसकर**
निर्मिती अधिकारी

चित्रकार : मयुरा डफळ
मुखपृष्ठ : श्री. भटू बागले
अक्षरजुळणी : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
कागद : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह
मुद्रणादेश :
मुद्रक :

प्रकाशक
**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थीमित्रांनो,

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. तुमच्या हातात मराठी बालभारती इयत्ता सहावीचे हे पाठ्यपुस्तक देताना मनापासून आनंद होत आहे.

मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तक वाचनासाठी तुम्ही नक्कीच उत्सुक असाल. या पाठ्यपुस्तकात तुम्हांला आवडतील अशा कविता आणि पाठ देण्यात आलेले आहेत. या पाठ्यपुस्तकातील गेय कविता तुम्हांला तालासुरात व साभिनय सादर करायला आवडतील. या कविता वाचायला, म्हणायला आणि मित्रमैत्रिणींसोबत सादर करायलाही मजा येईल. पाठ्यपुस्तकातील पाठ, अवांतर वाचनासाठीचे उतारे, कार्यात्मक व्याकरण घटक व विविध कृतींतून तुम्हांला नवनवीन विषय अभ्यासायला मिळणार आहेत. हे पाठ्यघटक वाचून तुम्ही त्यावर विचार कराल, चर्चा कराल, प्रश्न विचाराल आणि या घटकांबाबत व्यक्त व्हाल. प्रत्येक कवितेसाठी व पाठासाठी दिलेल्या रंगीत, आकर्षक व प्रसंगानुरूप चित्रांतून तुम्हांला पाठ्यघटक अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेता येईल. या पाठ्यपुस्तकातून तुमच्या विचारशक्तीला, कल्पनाशक्तीला व कृतिशीलतेला चालना मिळणार आहे.

पाठ्यपुस्तकामध्ये विविध शीर्षकांखाली दिलेल्या नावीन्यपूर्ण कृतींतून तुमच्या भाषिक कौशल्यांचा अधिकाधिक विकास होणार आहे. 'नवीन शब्द शिकू या' या शीर्षकाखाली दिलेले पाठातील नवीन शब्द पुन्हा पुन्हा वाचा. यामुळे तुम्हांला मराठी भाषेतील परिचित व अपरिचित शब्दांची ओळख होईल. अपरिचित शब्दांचे अर्थ समजून घ्या. नव्याने शिकलेल्या शब्दांचा वापर दैनंदिन संभाषणात वापरण्याचा प्रयत्न करा. 'आम्हांला हे समजले' या शीर्षकाखाली पाठ्यघटकावर आधारित विविध स्वाध्याय सोडवल्यामुळे तुम्हांला पाठ्यघटकांचे अधिकाधिक आकलन होईल. 'खेळू या शब्दांशी' यामधील शब्दसंपत्तीवर आधारित स्वाध्याय सोडवल्याने तुमच्या शब्दसंपत्तीत अधिकाधिक भर पडेल.

'विचार करा व सांगा', 'चर्चा करू या', 'लिहिते होऊ या', 'जाणून घेऊ या', 'कृतीतून शिकू या', 'शोध घेऊ या', 'चला वाचू या', 'सारे हसू या' यांसारख्या कृतींतून तुम्हांला विचार करण्याची, कल्पना करण्याची, माहिती मिळवण्याची व विविध कृती सोडवण्याची आवड निर्माण होणार आहे. पुस्तके, वृत्तपत्रे, विविध लेख व संगणक यांचा वापर करून तुम्हांला नवीन अवांतर माहिती मिळवण्याची सवय लागेल. 'आपण समजून घेऊ या' यामध्ये तुम्हांला नवीन व्याकरण घटकांचीही ओळख होणार आहे.

विद्यार्थीमित्रांनो, हे पाठ्यपुस्तक आवडीने वाचा आणि अभ्यासा. तुमच्या शैक्षणिक प्रवासासाठी तुम्हांला मनापासून शुभेच्छा!

पुणे

**दिनांक :** १ मे २०२६

**भारतीय सौर :** वैशाख ११, शके १९४८

महाराष्ट्र दिन

**(अनुराधा ओक)**

संचालक

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व

अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : प्रथम भाषा मराठी इयत्ता सहावी

| क्रमांक | अध्ययन निष्पत्ती | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१.१ | ऐकलेल्या व वाचलेल्या बातमीतील महत्त्वाचे मुद्दे व सारांश सांगतो. | २५, ६५, ६६ |
| १.१.२ | जाहिरातींचे समजपूर्वक वाचन करतो व जाहिरातींवर आधारित प्रश्नांची उत्तरे देतो. | ३१, ८२ |
| १.२.१ | परिचित व्यक्तींच्या मुलाखती ऐकतो व त्यांच्या मुलाखतींचे नियोजन व आयोजन करतो. | ८८, ८९, ९०, ९१, ९२ |
| १.३.१ | योग्य भाषा वापरून आशयाधारित सामाजिक अनुभवांविषयी अनौपचारिक व औपचारिक प्रश्न विचारतो. | ३४, ६७, ८४ |
| १.४.१ | योग्य शैली वापरून विविध हेतूंसाठी अनौपचारिक पत्र, वर्णनात्मक निबंध व अहवाल यांचे लेखन करतो. | ३२, ३५, ३६, ७१, ७२, ८१, ९६ |
| १.५.१ | दृक्, श्राव्य व दृक्‌श्राव्य माध्यमांसाठी विषयानुरूप व प्रसंगानुसार घोषवाक्ये, संदेश व संवाद यांचे लेखन करतो. | २०, २७, ४२, ८६, ८७, ९४, १०० |
| २.१.१ | विविध संस्कृती आणि कालखंडांतील साहित्यांच्या विविध प्रकारांचा आस्वाद घेतो व वैशिष्ट्ये सांगतो. (लोकसाहित्य व महाराष्ट्रातील विविध बोलींमधील साहित्य) | २८, ४५, ४६, ४७, ४८, ५०, ५७, ५८, १०३, १०४ |
| २.२.१ | यमक, अनुप्रास व श्लेष हे शब्दालंकार ओळखून संबोध स्पष्ट करतो व उदाहरणे सांगतो. | १०, ११, ५६, ९५ |
| २.२.२ | पठित मजकुरातील म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करतो. विविध शब्दकोडी सोडवतो. | १२, १३, १४, १५, १६, ३४, ५०, ८५, ९१, १०२ |
| २.३.१ | घर व परिसरात साजरे होणारे सण आणि उत्सव यांविषयी स्वत:च्या कल्पना, मत, तोंडी लेखी स्वरूपात व्यक्त करतो. | ४९, ५० |
| ३.१.१ | नाम व नामांचे प्रकार, सर्वनाम व सर्वनामांचे प्रकार, विशेषण व विशेष्य, विशेषणांचे प्रकार, क्रियापद व क्रियापदांचे प्रकार, शुद्धलेखनाचे नियम या व्याकरण घटकांची माहिती घेतो व त्यांचा लेखनात योग्य वापर करतो. | ५, २१, २२, २३, ३७, ३८, ३९, ५१, ५२, ५३, ६२, ६३, ६४, ६७, ७०, ७७, १०१, १०२ |
| ३.२.१ | कथा आणि कविता या साहित्यप्रकारांची वैशिष्ट्ये, वेगळेपण, शैली ओळखतो. | ५, ६, १७, १८, ३०, ४०, ४९, ६०, ६८, ९३ |
| ३.३.१ | स्वत:च्या भाषेत कथा, कविता लिहितो. | ९, १४, ७०, ७५ |
| ४.१.१ | विविध साहित्य प्रकारांतील पुस्तकांचे वाचन करून सारांश सांगतो व लिहितो. | ३, ४, ५, ७६ |
| ४.२.१ | प्रकल्पादी उपक्रमांसाठी शिक्षकांच्या मदतीने संदर्भ साहित्य शोधतो. | ९, २७, ३४, ६१, ७६, ८१, ९४, ९९ |
| ४.३.१ | विविध नियतकालिकांमधील घडामोडी वाचून आपले मत व्यक्त करतो. | ३४, ६६, ९२ |
| ५.१.१ | भाषेच्या वर्णमालेची स्वर, व्यंजने, उच्चार यांबाबत मूलभूत माहिती सांगतो. | ७०, ९५, १०१, १०२ |
| ५.२.१ | भाषण अधिक मनोरंजक आणि आनंददायी होण्यासाठी भाषेतील अनुप्रास, यमक, श्लेष अलंकारांचा उपयोग करतो. | ११, ९५, ९९ |
| ५.३.१ | विविध भाषिक खेळांची माहिती करून घेतो. (उदा., विनोद, अक्षरांची उलटापालट करून नवीन शब्द तयार करणे.) | ५, ८, २७, ५६, ६६, ७२, ७६, ८१, ९५ |
| ५.४.१ | सोपी शब्दकोडी व शब्दखेळ स्वत: तयार करतो. | ८, ४२, ८१ |

- **अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांकडून वर दिल्याप्रमाणे किमान अध्ययन निष्पत्ती साध्य करून घेणे अनिवार्य आहे. अध्ययन निष्पत्तींच्या समोर दिलेल्या पृष्ठक्रमांकाच्या व्यतिरिक्त इतर पृष्ठक्रमांकांवर दिलेल्या आशयाद्वारे देखील इतर अध्ययन निष्पत्ती साध्य होऊ शकतात, असा प्रयत्न शिक्षकांनी करावा.**

# शिक्षक व पालकांसाठी सूचना

महाराष्ट्र राज्यासाठी तयार करण्यात आलेला शालेय शिक्षण अभ्यासक्रम व पाठ्यक्रम २०२६ डोळ्यांसमोर ठेवून इयत्ता सहावीचे मराठी भाषेचे हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आलेले आहे. अभ्यासक्रमातील इयत्ता सहावीच्या (प्रथम भाषा) अध्ययन निष्पत्तींचा विचार करून पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आली आहे. इयत्ता सहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा वयोगट व आकलन क्षमता लक्षात घेऊन पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी नेमक्या कोणत्या क्षमता प्राप्त कराव्यात हे अध्ययन-अध्यापन करताना स्पष्ट व्हावे, त्यासाठी या पाठ्यपुस्तकात भाषाविषयक अध्ययन निष्पत्तींचा समावेश करण्यात आला आहे. या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठांचा व कवितांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे.

भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी नावीन्यपूर्ण स्वाध्याय, उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत. 'विचार करा व सांगा', 'चर्चा करू या', 'लिहिते होऊ या', 'जाणून घेऊ या', 'कृतीतून शिकू या', 'शोध घेऊ या', 'चला वाचू या', 'सारे हसू या' या शीर्षकांखाली दिलेल्या मजकुरांतून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता, सर्जनशीलता यांस वाव दिला आहे. 'आपण समजून घेऊ या' या शीर्षकाखाली व्याकरण घटकांची सोप्या पद्धतीने मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांनी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर सहजतेने करावा, तसेच त्यांच्यामध्ये व्याकरणविषयक जाण निर्माण व्हावी, म्हणून हे सर्व मनोरंजक व सोप्या पद्धतीने दिले आहे.

महाराष्ट्रातील बोली भाषांचा परिचय व्हावा या दृष्टिकोनातून बोली भाषेतील उताऱ्यांचा समावेश केला आहे. पाठ्यपुस्तकात पाठ्यघटकांना अनुसरून प्रसंगचित्रे दिली आहेत. चित्रांचे निरीक्षण, त्यांवर विचार, चर्चा व त्यासंबंधी स्वत:चे अनुभवकथन यांतून विद्यार्थ्यांमध्ये जाणीव-जागृती निर्माण होईल. विद्यार्थ्यांना स्वत:ची कल्पकता वापरून लेखन करता यावे, विचार व्यक्त करता यावे, यांसाठी वैविध्यपूर्ण प्रश्न व कृती पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. पाठ्यघटक कसे हाताळावे, याबाबत शिक्षकांना मार्गदर्शनपर सूचना अनेक ठिकाणी दिल्या आहेत.

त्यामुळे वर्गातील विद्यार्थ्यांच्या या भाषांचा विचार अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील आंतरक्रियेदरम्यान करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या भाषेत दिलेली उत्तरे, सांगितलेले स्वत:चे अनुभव स्वीकारावेत. या पाठ्यपुस्तकामधील पाठ्यघटकांची व कृतींची मांडणी आनंददायी, क्रीडायुक्त व अधिकाधिक सरावाच्या दृष्टीने करण्यात आलेली आहे.

पाठ्यपुस्तकातील पाठ्यघटकांचे अध्यापन करताना अधिकाधिक उदाहरणे देणे, प्रश्न विचारणे, शैक्षणिक साहित्याचा वापर करणे, विद्यार्थ्यांच्या वाचन व लेखनाचा अधिकाधिक सराव घेणे, विद्यार्थ्यांना भाषण-संभाषणासाठी संधी उपलब्ध करून देणे यांसारख्या विविध गोष्टींवर भर द्यावा. तसेच अध्यापन करताना विद्यार्थ्यांना गटांमध्ये चर्चा करण्याची व मते मांडण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

### कविता

- विद्यार्थ्यांना वर्गामध्ये कविता तालासुरात व साभिनय सादर करण्यासाठी संधी उपलब्ध करून द्यावी. गटनिहाय सादरीकरणात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घ्यावा.
- कवितेतील नवीन शब्द व त्यांचे अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगावेत. नवीन शब्दांचे अर्थ शब्दकोशातून शोधण्यासाठी प्रवृत्त करावे.
- कवितेच्या चित्रासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणावी.
- ग्रंथालयातील उपलब्ध कवितांची, गाण्यांची पुस्तके विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून द्यावीत.
- कविता शिकवत असताना विविध प्रकारांच्या ध्वनिफिती व चित्रफिती दाखवाव्यात. उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करून कविता सादरीकरणामध्ये नावीन्य आणावे.
- कवितेची वैशिष्ट्ये समजून घेऊन विद्यार्थी छोट्या कविता तयार करतील व लिहितील यासाठी प्रयत्न करावेत. कविता लेखनासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.
- विद्यार्थ्यांच्या तार्किक शक्तीचा विकास होण्याच्या दृष्टीने कवितेच्या चित्रांतील विविध घटकांवर आधारित प्रश्न विचारावेत. त्यांना अभिव्यक्त होण्याच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

### पाठ

- विद्यार्थ्यांना पाठाचे वाचन करण्यास सांगावे. त्यातील चित्रांचे निरीक्षण करून आशयाच्या संदर्भात त्यांच्या कल्पना मांडण्यास सांगाव्यात.
- विद्यार्थ्यांकडून पाठ व पाठातील प्रसंग आवडण्यामागची कारणे जाणून घ्यावीत. त्यावरील स्वाध्याय, कृती सोडवून घेताना सर्व विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घ्यावा.
- पाठाच्या चित्रासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणावी. पाठांमधील प्रसंगानुरूप चित्रांवर आधारित प्रश्न विचारावेत. दैनंदिन जीवनातील प्रत्यक्ष अनुभवांची सांगड चित्राशी घालून विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरणाची दृष्टी निर्माण करावी.
- पाठासोबत दिलेले भाषिक घटक व कौशल्ये यांच्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्य वृद्धीसाठी विविध उपक्रम राबवावेत.
- विद्यार्थ्यांकडून पाठातील वाक्ये तसेच वाचनासाठी दिलेल्या उताऱ्याचे आवश्यकतेनुसार अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.
- ग्रंथालयातील उपलब्ध कथांची पुस्तके विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करून द्यावीत.
- उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करून पाठ सादरीकरणामध्ये नावीन्य आणावे. पाठ्यपुस्तकातील पाठ्यघटकांचे अध्यापन करत असताना शक्य तेथे ध्वनीफिती व चित्रफिती दाखवाव्यात. तसेच उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करावा.
- विद्यार्थ्यांना शब्दकोश ही संकल्पना समजावून सांगावी. पाठ्यपुस्तकातील अपरिचित शब्दांचा अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांना स्वत:चा शब्दकोश करण्याबाबत प्रेरणा द्यावी.

### विविध शीर्षकांखाली नावीन्यपूर्ण कृतींचा समावेश

- पाठ्यपुस्तकामध्ये विविध शीर्षकांखाली दिलेल्या पाठ्यघटकाशी संबंधित, शब्दसंपत्तीशी संबंधित व व्याकरण घटकांसंबंधित कृती विद्यार्थ्यांना समजावून सांगाव्यात. तसेच या कृती सोडवून घेण्याचा नियमितपणे सराव करून घ्यावा.
- अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रश्न विचारून बोलते करावे. त्यांना स्वत:चे अनुभव मांडण्याच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. आवश्यक तेथे विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून योग्य तेथे मार्गदर्शन करावे.

# अनुक्रमणिका


## भाग - १

| अ. क्र. | गद्य/पद्य, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | सत्य शिवाहुन सुंदर हे (प्रार्थना) – **जगदीश खेबूडकर** | १ |
| २. | पुस्तक माझा गुरू – **संदीप खरे** | २ |
| ३. | आला पाऊस (कविता) – **निर्मला देशपांडे** | ६ |
| ४. | अनुभवांच्या खाणी | १२ |
| ५. | प्रकाशयात्री (कविता) – **कल्याण इनामदार** | १९ |

## भाग - २

| अ. क्र. | गद्य/पद्य, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ६. | राष्ट्रध्वज माझा अभिमान –**स्वप्ना गोवेकर** | २४ |
| ७. | खोप्यामधी खोपा (कविता) – **बहिणाबाई चौधरी** | २८ |
| ८. | चांदोबास पत्र | ३२ |
| ९. | गीत मराठी गाऊ या (कविता) – **प्रा. रामदास केदार** | ४० |
| १०. | लोकनृत्ये – **डॉ. सरोजिनी बाबर** | ४५ |

## भाग - ३

| अ. क्र. | गद्य/पद्य, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ११. | भल्लगडी दादा (कविता) – **शाहीर कुंदन कांबळे** | ५४ |
| १२. | धाडसी रोहन – **दिलीप फलटणकर** | ५९ |
| १३. | फिटे अंधाराचे जाळे (कविता) – **सुधीर मोघे** | ६८ |
| १४. | रक्षण पर्यावरणाचे – **दिलीप कुलकर्णी** | ७३ |
| १५. | आंब्याचा मोहोर – **देवीदास बागूल** | ७८ |

## भाग - ४

| अ. क्र. | गद्य/पद्य, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १६. | आम्ही असू वेगळे (कविता) – **संजीवनी बोकील** | ८३ |
| १७. | संगणकातील 'परम'पूज्य – **कविता भालेराव** | ८८ |
| १८. | हा देश माझा (कविता) – **सेनापती बापट** | ९३ |
| १९. | खरी संपत्ती – **सुधा मूर्ती** | ९७ |
| २०. | विचारधन | १०३ |


**सूचना :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (साईन लँग्वेज) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल, त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# १. सत्य शिवाहुन सुंदर हे

विनामूल्य वितरणासाठी

- **ऐका. म्हणा. वाचा.**

ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते, त्या ज्ञानाचे मंदिर हे
सत्य शिवाहुन सुंदर हे ।।धृ.।।

इथे मोल ना दामाचे
मोती होतिल घामाचे
सरस्वतीच्या प्रेमाचे,
प्रतीक रम्य शुभंकर हे ।।१।।

चिरा–चिरा हा घडवावा
कळस कीर्तिचा चढवावा
अज्ञानी तो पढवावा,
थेंब आम्ही नच सागर हे ।।२।।

त्यागाला या नाव नसे
पुण्यवान हा देश असे
कल्पतरू हा उभा दिसे,
त्या छायेतिल मंदिर हे ।।३।।



**जगदीश खेबूडकर** (१९३२–२०११) : प्रसिद्ध मराठी कवी, साहित्यिक, गीतकार. मराठी चित्रपटसृष्टीसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर गीतांचे लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेली गीते अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांनी पटकथा व संवाद, लघुकथा, नाटके, दूरदर्शन मालिका यांसाठीही लेखन केले आहे. ‘गदिमा पुरस्कार, ‘साहित्य सम्राट पुरस्कार’, ‘व्ही. शांताराम स्मृती पुरस्कार’, ‘जीवनगौरव पुरस्कार’ यांसारख्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. सदर प्रार्थना ‘गीतपुष्पांचा फुलोरा’ या संकलित काव्यसंग्रहातून घेतली आहे.

प्रस्तुत प्रार्थनेतून श्रम, सत्य व ज्ञान यांचे महत्त्व तसेच शाळा व शाळेत दिली जाणारी शिकवण यांविषयीचे वर्णन ओघवत्या शब्दांत केले आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिकरीत्या ही प्रार्थना वर्गात व परिपाठात तालासुरात म्हणून घ्यावी.

# २. पुस्तक माझा गुरू

**संदीप खरे** (१९७३) : प्रसिद्ध कवी, गीतकार. 'मौनाची भाषांतरे', 'नेणिवेची अक्षरे', 'कधी हे कधी ते ', 'तुझ्यावरच्या कविता', 'अग्गोबाईऽऽ ढग्गोबाईऽऽ', 'मी अन् माझा आवाज' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध. स्वरचित कवितांचे अनेक म्युझिक अल्बम्स लोकप्रिय आहेत. हिंदी व मराठी चित्रपटांसाठी व मालिकांसाठी गीतलेखन. शासनाच्या विविध पुरस्कारांनी सन्मानित. कला आणि सांस्कृतिक योगदानासाठी 'पुण्य गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पाठ 'छात्र प्रबोधन' जुलै २०१७ या मासिकातून घेण्यात आला आहे.

प्रस्तुत पाठातून लेखकाने पुस्तकांचे महत्त्व विशद करताना पुस्तकांना गुरूचे स्थान दिले आहे. पुस्तके ही आपल्या जीवनातील खरे मित्र असतात. पुस्तकांमुळे आपले व्यक्तिमत्त्व घडते व जीवनाला योग्य दिशा मिळते. पुस्तके ही ज्ञानाची खाण आहे. आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी पुस्तकांचे अनन्यसाधारण महत्त्व या पाठातून विशद केले आहे.

माझी अगदी लहानपणीच पुस्तकांशी मैत्री झाली. आई मला खूप पुस्तकं विकत आणून द्यायची. माझा वाचनाचा वेग चांगला असल्यामुळे पुस्तकं पटकन वाचून पूर्ण व्हायची. खेळणी विकत घेण्यापेक्षा पुस्तक विकत घ्यायला तेव्हा मला खूप आवडायचं. वाढदिवसाला, दिवाळीला कुणी भेटवस्तू देणार असेल, तर त्याला 'मला पुस्तक भेट दे', असंच सांगायचो. विकत आणलेली पुस्तकं पटकन वाचून पूर्ण व्हायची म्हणून मग आईने ग्रंथालय लावले. ग्रंथालयातून आठवड्याला दोन पुस्तकंच मिळायची. पहिल्या दोन-तीन दिवसांतच पुस्तकं वाचून व्हायची. अशा वेळी आई खूप वैतागायची. एकदा तर आईने चक्क रद्दीतून किलोवर पुस्तकं विकत आणली आणि माझ्यासमोर ठेवली. लहानपणीच माझ्यावर पुस्तकांचा असा वर्षाव झाला.



हळूहळू पुस्तकंच माझे गुरू बनले. हे कधी आणि कसं घडत गेलं ते कळलंच नाही. चौथीला असताना मला पहिली कविता सुचली. ती सगळ्यांना खूप आवडली. तेव्हा त्यात मला बक्षीसदेखील मिळालं होतं. हळूहळू शब्दांशी दोस्ती झाली व मी कविता लिहू लागलो. कधी एका दिवसात तीन कविता लिहायचो तर कधी तीन महिन्यातून एक...! पुस्तक आणि कविता यांमध्येच माझं मन रमायचं.

मला सगळ्या प्रकारांच्या पुस्तकांचं वाचन करायला आवडतं. कुठलाही विषय मला वर्ज्य नाही. कवीनं फक्त कविताच वाचाव्यात असं नाही तर त्याने सामाजिक पुस्तकं, कादंबरी, कथा, आत्मचरित्र, ललित असं सगळ्या प्रकारचं वाचन करावं. वाचनामुळे शब्दांशी मैत्री होते. शब्दांसारखे शब्द हे किती वेगवेगळ्या प्रकारे भाषेमध्ये असू

शकतात, हे वाचनातून समजतं. हे वेगवेगळ्या लेखकांच्या लेखनांतून उमजत जातं. आपण सुरुवातीच्या काळात शब्दाला एकाच बाजूने बघत असतो. त्याला आपल्याला चौफेर बघता आलं पाहिजे. हे आपल्याला तेव्हाच जमतं, जेव्हा शब्दांचा लळा लागतो. शब्दांवर आपण प्रेम करू लागतो. हे सारं पुस्तकांमुळेच साध्य होतं. जर खूप पुस्तकं वाचलीत, तर शब्दांचे, भाषेचे वेगवेगळे आयाम कळतील. हे आयाम मला हळूहळू समजायला लागल्यामुळेच मी ‘मौनाची भाषांतरे’, ‘कधी हे कधी ते’, ‘नेणिवेची अक्षरे’, ‘तुझ्यावरच्या कविता’ हे कवितासंग्रह लिहू शकलो.

पुस्तकांतून खूप लेखकांशी आणि कवींशी माझी भेट झाली. संतकवी, पंतकवी, तंतकवी यांची ओळख झाली. त्यानंतर अनेक कवींच्या कविता वाचनात आल्या. या पुस्तकांचं मी जाणीवपूर्वक वाचन केलं, तेव्हा एकच विषय वेगवेगळ्या साहित्यिकांनी कसा मांडला आहे, हे समजलं. एखादा विशिष्ट लेखक आवडला, की त्यांचा पाठपुरावा करून मी त्यांची अनेक पुस्तकं वेड्यासारखी वाचली. तेव्हा पुस्तकांचा खूप खोल परिणाम माझ्या मनावर झाला. एकलव्याच्या गोष्टीसारखं आहे हे!

माझे दुसरे गुरू म्हणजे मला आयुष्यात आलेले ‘अनुभव.’ अनुभव आपल्याला खूप काही शिकवून जातात. आपलं जगणं समृद्ध करतात. माझ्या काही कविता या मला प्रत्यक्ष आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब आहेत. त्यांपैकी एक कविता म्हणजे ‘दमलेल्या बाबाची कहाणी.’ ‘आयुष्यावर बोलू काही’ या कार्यक्रमाचे महाराष्ट्रात सतत दौरे सुरू असतात. माझी मुलगी लहान होती तेव्हा दौऱ्यांमुळे मला तिच्यासाठी अजिबात वेळ काढता येत नसे. कार्यक्रमाहून रात्री-अपरात्री घरी यायचो, तेव्हा माझी चिमुकली झोपलेली असायची. काही वर्षं अशीच पैसे कमावण्यात गेली आणि एके दिवशी जाणीव झाली, की जिच्यासाठी आपण हे सगळं करतोय, तिला आपण वेळच देऊ शकत नाही. या अस्वस्थतेतूनच जन्म झाला ‘दमलेल्या बाबाची कहाणी’ या कवितेचा. ही कविता ऐकल्यावर बऱ्याच लोकांचे डोळे पाणावलेले असायचे. कार्यक्रम झाल्यावर बरेच लोक भेटायचे व म्हणायचे ‘तुम्ही आमचीच व्यथा मांडली आहे.’ असंख्य बाबांशी या कवितेच्या माध्यमातून मी जोडला गेलो. त्यामुळे असे अनुभवच माझ्या कविमनाचे गुरू आहेत.

शेवटी मी एकच सांगेन. ज्यांच्याकडून आपल्याला प्रेरणा, विद्या, कौशल्य, ज्ञान मिळतं ते सर्वच आपले गुरू असतात. त्यांच्याबद्दल नेहमी कृतज्ञता आणि आदर असावा. मी जसं पुस्तकालाच गुरू मानलं आहे, तसं कदाचित तुमचे गुरू म्हणजे आईवडील, दादा-ताई, शाळेतील शिक्षक असू शकतात. त्यांच्याविषयी कायम आदर बाळगा. त्यांच्याकडून मार्गदर्शन जरूर मिळवा; पण स्वत:चं स्वतः शिकण्यावर भर द्या. स्वत:च नवनवीन गोष्टी, प्रयोग, कौशल्य व ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या प्रयोगशील वाटचालीला माझ्या खूप खूप शुभेच्छा!



## नवीन शब्द शिकू या.

**अपुरी** - पुरेशी नसलेली. **रद्दी** - निरुपयोगी कागद. **वर्ज्य** - नको असलेला. **आत्मचरित्र** - स्वत:चे चरित्र. **चौफेर** - चहूबाजूंनी. **आयाम** - पैलू. **पाठपुरावा करणे** - सातत्याने मागोवा घेणे. **डोळे पाणावणे** - डोळ्यांत पाणी येणे. **व्यथा**- वेदना. **कृतज्ञता**- उपकाराची जाणीव.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध साहित्यप्रकारांतील पुस्तके वाचण्यास सांगून त्या पुस्तकांबाबत स्वत:चे मत व्यक्त करण्यास प्रवृत्त करावे.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) 'मला पुस्तक भेट दे' असे म्हणणारे-

(आ) रद्दीतून किलोवर पुस्तके विकत आणून लेखकासमोर ठेवणारी-

(इ) पुस्तकातून लेखकाला भेटणारे-

(ई) लेखक रात्री-अपरात्री घरी यायचे, तेव्हा झोपलेली असणारी-

**प्र. २. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**
**(कृतज्ञता, मैत्री, प्रतिबिंब, अनुभव)**

(अ) वाचनामुळे शब्दांशी ................ होते.

(आ) ................ आपलं जगणं समृद्ध करतात.

(इ) माझ्या बऱ्याच कविता या मला आलेल्या अनुभवांचे ................ आहेत.

(ई) गुरूंबद्दल नेहमी ................ आणि आदर असावा.

**प्र. ३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) खेळणी विकत घेण्यापेक्षा पुस्तक विकत घेणे लेखकाला का आवडायचे?

(आ) कविता लेखनाबद्दलचा लेखकाचा बालपणीचा अनुभव तुमच्या शब्दांत विशद करा.

(इ) 'माझ्या बऱ्याच कविता या मला आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब आहेत' असे लेखक का म्हणतात?

(ई) लेखकाने पुस्तकांना गुरू का मानले याविषयी विचार स्पष्ट करा.

**प्र. ४. पाठात वर्णन केलेल्या पुढील विधानांची कारणे लिहा.**

(अ) लेखकाची पुस्तके पटकन वाचून पूर्ण व्हायची, कारण ............................................

(आ) कवीने सगळ्या प्रकारांचे वाचन करावे, कारण ............................................

(इ) 'दमलेल्या बाबाची कहाणी' ही कविता ऐकल्यावर बऱ्याच लोकांचे डोळे पाणावलेले असायचे, कारण ............................................

## विचार करा व सांगा.

- **'शब्दाकडे चौफेर बघता आलं पाहिजे', या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ सांगा.**

## लिहिते होऊ या.

- **तुम्ही वाचलेल्या पुस्तकांपैकी एका पुस्तकाबद्दलचे तुमचे मत व्यक्त करा व सारांश रूपात वहीत लिहा.**



## खेळू या शब्दांशी

**प्र. १. दिलेल्या अक्षरांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण शब्द तयार करा व लिहा.**

(अ) दि वा ढ स व  (आ) ल था ग्रं य

(इ) च त्म त्र आ रि  (ई) ग्र ता ह क सं वि

- **खालील माहिती वाचा.**

**नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुषजातीची आहे की स्त्रीजातीची आहे की दोन्हीपैकी कोणत्याही जातीची नाही असे ज्यावरून कळते त्याला त्या शब्दाचे 'लिंग' असे म्हणतात.**
मराठीत तीन लिंगे मानतात. (१) पुल्लिंग (२) स्त्रीलिंग (३) नपुंसकलिंग.

- **दिलेल्या शब्दांचे पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग या प्रकारांमध्ये वर्गीकरण करून तक्ता तयार करा व वहीत लिहा.**

(पुस्तक, लेखक, कहाणी, वाटचाल, डोळे, बाबा, लहानपण, खेळणी, वाढदिवस, दिवाळी, ग्रंथालय, रद्‌दी, कविता, बक्षीस, मैत्री, भाषा, लळा, मन, अनुभव, कार्यक्रम, जन्म, प्रेरणा, कौशल्य, ज्ञान.)



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** शालेय ग्रंथालयातील तुम्हांला आवडलेल्या पुस्तकाची माहिती पुढील मुद्‌द्यांच्या आधारे लिहा व वर्गात सादर करा.

(१) पुस्तकाचे नाव  (२) लेखक/कवी  (३) पुस्तकाचा साहित्यप्रकार

(४) मुख्य आशय  (५) पुस्तक आवडण्याचे कारण



## जाणून घेऊ या.

मराठी साहित्यात संत, पंत आणि तंत हे काव्याचे प्रकार आहेत. हे वर्गीकरण मुख्यतः कवींच्या काळानुसार, विचारधारेनुसार व शैलीनुसार केले जाते.

**(१) संत काव्य–** संत काव्य म्हणजे संतांनी रचलेले भक्तिप्रधान काव्य होय. (उदा., अभंग, ओवी, भारूड इत्यादी.)
उदा., संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव, संत कान्होपात्रा, संत निर्मळा इत्यादी.
**वैशिष्ट्ये :** (१) भक्तिभाव (२) साधी व ओघवती भाषा (३) समाजजागृतीचा संदेश

**(२) पंत काव्य–** पंत काव्य म्हणजे दरबारी किंवा पंडित कवींचे काव्य होय. (उदा., आर्या, आख्यान काव्ये, श्लोक इत्यादी.)
उदा., वामन पंडित, मोरोपंत, श्रीधर, रघुनाथ पंडित, मुक्तेश्वर इत्यादी.
**वैशिष्ट्ये :** (१) संस्कृतप्रचुर भाषा (२) अलंकारांचा व छंदांचा वापर (३) विद्‌वत्ताप्रधान आशय

**(३) तंत काव्य–** तंत काव्य म्हणजे शाहिरांनी रचलेले काव्य होय. (उदा., पोवाडे, लावण्या इत्यादी.)
उदा., शाहीर रामजोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा, पठ्ठे बापूराव, शाहीर अमरशेख, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे इत्यादी.
**वैशिष्ट्ये :** (१) जोशपूर्ण व प्रभावी भाषा (२) लोकभाषेचा वापर (३) शौर्य व प्रेरणा
'संत, पंत, तंत' काव्यप्रकार हे मराठी साहित्यातील विविध प्रवाह दाखवतात. मराठी साहित्याची महान परंपरा या काव्यप्रकारांतून प्रतिबिंबित होते.

- **संत, पंत, तंत काव्यप्रकारांविषयी अधिकची माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा व वाचा.**

# ३. आला पाऊस



- **ऐका. म्हणा. वाचा.**

आला पाऊस आला पाऊस अंगण झाले ओले
घेऊन आले थेंब टपोरे संगे वादळवारे ।। १ ।।

आला पाऊस आला पाऊस आल्या मोठ्या गारा
स्वच्छ पांढरे अंगण झाले रस्ता भरला सारा ।। २ ।।

आला पाऊस आला पाऊस वीज लखाखे लख्खन्
भिजणारी ती अवखळ पोरे घरात पळती पटकन् ।। ३ ।।

आला पाऊस आला पाऊस  रस्त्यावरही होई नदी
चला चला रे होड्या नावा सोडूया त्या पाण्यामधि ।। ४ ।।

आला पाऊस आला पाऊस मधेच पिवळे ऊन हासे
सप्तरंगी इंद्रधनुची कमान आकाशात दिसे ।। ५ ।।

आला पाऊस आला पाऊस कभिन्नकाळे हत्ती
निळ्या नभांगणी सैरावैरा धावत हे सुटती ।। ६ ।।

आला पाऊस आला पाऊस पागोळ्या गळती
थरथरणारे पंख मिटवुनि चिप्प पाखरे बसती ।। ७ ।।

**निर्मला देशपांडे** (१९४०): निर्मला सुधाकर देशपांडे या मराठीतील प्रसिद्ध लेखिका व कवयित्री. आकाशवाणीवर काव्यवाचन, कथावाचन याचे अनेक कार्यक्रम प्रसिद्ध. विविध मासिकांतून व दिवाळी अंकातून त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे. 'जाणता राजा' या महानाट्यात कलाकार म्हणून  सहभाग. ही कविता 'इंद्रधनु' या काव्यसंग्रहातून घेण्यात आली आहे.

प्रस्तुत कवितेत पावसाच्या आगमनाने संपूर्ण निसर्गसृष्टीमध्ये निर्माण झालेला ताजेपणा व नवजीवन यांचे सुरेख वर्णन करण्यात आले आहे. तसेच पावसामुळे मुलांच्या मनामध्ये निर्माण झालेला आनंद आणि उत्साह यांचेही दर्शन या कवितेतून दिसून येते.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक, सामूहिकरीत्या कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. विद्यार्थ्यांना कविता या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये, वेगळेपण आणि  शैली स्पष्ट करून सांगावी. विद्यार्थ्यांना स्वत:च्या भाषेत कवितेच्या आशयाचे वर्णन करण्यासाठी प्रवृत्त करावे.

## नवीन शब्द शिकू या.

**टपोरे** – मोठे. **संगे** – सोबत. **लखाखणे** – चमकणे. **अवखळ** – चंचल, खट्याळ. **कमान** – अर्धवर्तुळाच्या आकारासारखे. **कभिन्नकाळे** – काळेभोर, काळेकुट्ट. **नभांगणी** –आभाळात. **सैरावैरा धावणे** – मनाला वाटेल त्या दिशेला धावणे. **पागोळ्या** – पाऊस सुरू असताना छपरावरून ओघळणारे पाणी. **चिप्प** – हालचाल न करता, शांत, स्तब्ध.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

(अ) पाऊस आल्यावर ओले झालेले –

(आ) थेंबांसंगे आलेले –

(इ) गारांनी भरलेला –

(ई) लख्खन् लखाखणारी –

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**




**प्र. ३. कवितेतील खालील ओळींचे अर्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

(अ) आला पाऊस आला पाऊस कभिन्नकाळे हत्ती
निळ्या नभांगणी सैरावैरा धावत हे सुटती

(आ) आला पाऊस आला पाऊस पागोळ्या गळती
थरथरणारे पंख मिटवुनि चिप्प पाखरे बसती

**प्र. ४. खालील अर्थ व्यक्त करणाऱ्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) पाऊस पडत असताना त्यात खेळणारी खोडकर मुले
विजेचा लखलखाट होताच घरात पटकन पळतात.

(आ) ऊनपावसाचा खेळ सुरू असताना इंद्रधनुष्याची कमान आकाशात दिसते.



## विचार करा व सांगा.

प्र. १. पावसात भिजण्याचा तुम्ही घेतलेला आनंददायी अनुभव थोडक्यात सांगा.

प्र. २. पावसाळा सुरू होताच निसर्गात कोणते बदल होतात ते तुमच्या शब्दांत सांगा.



## खेळू या शब्दांशी

प्र. १. कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधा व लिहा.

उदा., गारा – सारा

प्र. २. शब्दसाखळी तयार करा.

(अ) **ससा** → साप → पतंग → गरुड → डमरू → रूपये

(आ) **आकाश** → ☐ → ☐ → ☐ → ☐

(इ) **इमारत** → ☐ → ☐ → ☐ → ☐

- वरीलप्रमाणे शब्दांच्या किमान ५ शब्दसाखळ्या तयार करा व लिहा.

प्र. ३. पावसाशी संबंधित शब्द लिहून संकल्पनाचित्र पूर्ण करा.




प्र. ४. 'घर' या शब्दाशी संबंधित शब्द लिहून संकल्पनाचित्र तयार करा.

प्र. ५. कवितेतील खालील शब्दांसाठी समानार्थी शब्द शोधून लिहा.

(अ) रस्ता–

(आ) घर–

(इ) नदी–

(ई) आकाश–

**प्र. ६. वाचा. लक्षात ठेवा.**

खालील शब्दांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच आहेत.

| | | |
|---|---|---|
| (अ) अंगण | (आ) थेंब | (इ) पाऊस |
| (ई) हत्ती | (उ) भाषा | (ऊ) आकाश |

वरीलप्रमाणे एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असणारे शब्द शोधा व लिहा.



## शोध घेऊ या.

- **पावसाचे पाणी वर्षभर कोणकोणत्या प्रकारे साठवून वापरता येईल? याची माहिती आंतरजालावरून शिक्षकांच्या मदतीने शोधा.**



## कृतीतून शिकू या.

- **प्रकल्प :** (१) वर्तमानपत्रातील पावसाच्या बातम्यांची कात्रणे मिळवा व वहीत चिकटवा.
  (२) पावसावर आधारित कविता मिळवा व त्यांचा संग्रह करा.



## चला वाचू या.

### अशी लिहावी कविता...

कविता लिहिणे ही एक कला आहे.

तुम्हांलाही कविता लिहिता येईल. त्यासाठी सर्वांत आधी विषय निवडावा. उदा., पाऊस, शाळा, वाढदिवस वगैरे. जर तुम्हांला पावसावर कविता लिहायची असेल, तर तुम्ही काय कराल?

पाऊस येण्यापूर्वी, पाऊस येताना आणि येऊन गेल्यानंतर वातावरणात, परिसरात, निसर्गात कोणकोणते बदल होतात, ते आठवा. त्या प्रत्येक घटनेचे निरीक्षण करा. त्या वेळी तुमच्या मनात पावसाविषयी कोणकोणते विचार येतात ते एका कागदावर लिहा.

उदा., पाऊस आला. सगळीकडे पाणीच पाणी साचले. घरे, झाडे, वेली, पाने, फुले, पक्षी सारे पावसात भिजून गेले. गार वारा सुटला. मनाला आनंद झाला. आता आपण हेच विचार कवितेच्या रूपात कसे लिहू शकू? हे जाणून घ्या. कविता लिहिण्याचा प्रयत्न करा.

- **खालील शब्दांच्या आधारे कवितालेखन करा.**

जीवन, झुळझुळ, नदी, पाणी, झाडे

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वरील उतारा वाचून घ्यावा. उताऱ्यातील मजकूराशी संबंधित प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना स्वत:चे मत व्यक्त करण्याची संधी द्यावी. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयांवर कविता तयार करण्याबाबत प्रोत्साहन द्यावे.



## आपण समजून घेऊ या.

### अलंकार व त्याचे प्रकार

अलंकार म्हणजे दागिना. दागिन्यांमुळे व्यक्तीच्या सौंदर्यात भर पडते. त्याप्रमाणे भाषेच्या अलंकारांनी भाषेलाही सौंदर्य प्राप्त होते. भाषेला ज्याच्या ज्याच्यामुळे शोभा येते, त्या गुणधर्मांना भाषेचे अलंकार म्हणतात. अलंकारयुक्त भाषा वाचताना, ऐकताना आपल्याला आनंद वाटतो. भाषेचे महत्वाचे घटक म्हणजे शब्द आणि अर्थ होय. यावरून भाषेच्या अलंकाराचे शब्दालंकार व अर्थालंकार असे दोन प्रकार पडतात.

**अलंकाराचे मुख्य प्रकार**

**शब्दालंकार**

**अनुप्रास, यमक, श्लेष** इत्यादी.

**अर्थालंकार**

**उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अपन्हुती, व्यतिरेक, चेतनगुणोक्ती** इत्यादी.

या वर्षी आपण '**शब्दालंकार**' या घटकाची ओळख करून घेणार आहोत.

**शब्दालंकार :** जे अलंकार शब्दांवर, त्यातील अक्षरे किंवा स्वरांसहित व्यंजन समूहावर आधारलेले असतात. म्हणजेच ज्यांमध्ये चमत्कृती ही वर्णोच्चारापुरती किंवा विशिष्ट शब्दयोजनेपुरती मर्यादित असते, त्यांना 'शब्दालंकार' म्हणतात.

आता आपण शब्दालंकारातील 'अनुप्रास' व 'यमक' या अलंकाराची माहिती घेऊ या.

### (१) अनुप्रास अलंकार :

- **खालील ओळी वाचा. ओळींमध्ये कोणत्या अक्षरांची पुनरावृत्ती झाली आहे ते समजून घ्या.**

(१) गोड गाणी गुणगुणत गाव जागे झाले.
(२) फुलबाग फुलांनी फुलली.

तुमच्या लक्षात आले असेल, की पहिल्या वाक्यात 'ग' आणि 'ण' तर दुसऱ्या वाक्यात 'फ' आणि 'ल' या अक्षरांची पुनरावृत्ती झालेली आहे.

**एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा 'अनुप्रास' हा अलंकार होतो.**

- **खालील ओळीत कोणत्या अक्षरामुळे अनुप्रास झाला आहे ते सांगा.**

(१) गडद निळे, गडद निळे जलद भरूनि आले ।
(२) कळी कोमल काठावर फुलली ।
कुंजात कोकिळा कूजन करी ॥
(३) माळरानावर मऊ मऊ माती होती.

- **अक्षरांची पुनरावृत्ती होणारी वाक्ये/ओळी शोधा व वहीत लिहा.**

**(२) यमक अलंकार :**

विनामूल्य वितरणासाठी

- **खालील ओळी वाचा व निरीक्षण करा.**

(१) इथे मोल ना दामाचे
मोती होतील घामाचे

(२) हीच अमुची प्रार्थना, अन् हेच अमुचे मागणे
माणसाने माणसाशी माणसासम वागणे

अधोरेखित शब्दांच्या उच्चारांमध्ये साम्य आढळते का?

वरील ओळींमध्ये शेवटी 'दामाचे-घामाचे', 'मागणे-वागणे' या शब्दांतील काही अक्षरे क्रमाने आल्यामुळे नाद निर्माण झालेला आहे.

**कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठरावीक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास तेथे 'यमक' हा अलंकार होतो.**

- **खालील ओळी वाचा. ओळीतील यमक दर्शवणाऱ्या शब्दांच्या जोड्या लिहा.**

(१) आला पाऊस आला पाऊस आल्या मोठ्या गारा ।
स्वच्छ पांढरे अंगण झाले रस्ता भरला सारा ॥

(२) गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे ।
आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे ॥

(३) चिरा-चिरा हा घडवावा ।
कळस कीर्तिचा चढवावा ॥

- **पुढील ओळींतील अलंकार ओळखा व लिहा.**

(१) तशाच हिरव्या वेलींवरची जरा निराळी फुले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे तरी निराळी मुले

(२) काकूने काकांच्या कपाटातील कोरे कागद कात्रीने कराकरा कापले.

(३) सोनसळी सकाळ सुंदर सुगंधाने सजली.

(४) फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश ।
दरीखोऱ्यांतून वाहे, एक प्रकाश प्रकाश ॥

**लक्षात ठेवा–** अनुप्रास अलंकारात वर्णांची पुनरावृत्ती कोठेही असू शकते. परंतु यमक अलंकारात ही पुनरावृत्ती ठरावीक ठिकाणीच होते.

- **अनुप्रास व यमक या अलंकारांची ओळख तुम्हांला झालेली आहे. या अलंकारांचा उपयोग करून 'निसर्ग' या विषयावर आधारित आकर्षक परिच्छेद किंवा काव्यपंक्ती लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना शब्दालंकारातील अनुप्रास व यमक या अलंकारांची माहिती विविध उदाहरणांद्वारे करून द्यावी. तसेच वाक्यांतील/ओळींतील अनुप्रास व यमक ओळखण्याचा जास्तीतजास्त सराव करून घ्यावा. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारांच्या विविध कृती करून घ्याव्यात.

# ४. अनुभवांच्या खाणी

म्हणी म्हणजे लोकांच्या अनुभवातून निर्माण झालेली अर्थपूर्ण वाक्ये होत. अनेक वर्षांच्या अनुभवातून आणि निरीक्षणातून म्हणी तयार झालेल्या असतात. म्हणूनच म्हणींना 'अनुभवांच्या खाणी' असे म्हटले जाते. म्हणी लहान असल्या तरी त्यांचा आशय खूप मोठा असतो. त्या भाषेला गोडवा प्राप्त करून देतात. योग्य वेळी वापरलेल्या म्हणींमुळे बोलणे अधिक परिणामकारक होते. अशा म्हणी जीवनातील महत्त्वाचे धडे शिकवतात. म्हणींमधून आपल्याला संस्कार, शहाणपण आणि व्यवहारज्ञान मिळते. त्यामुळे आपल्या भाषेत आणि दैनंदिन जीवनात म्हणींना विशेष महत्त्व आहे. प्रस्तुत पाठातून विद्यार्थ्यांना म्हणींचे महत्त्व समजावून सांगितले आहे.

''आजी, आज की नाही शाळेत एक मोठी गोष्ट घडलीय.'' शाळेतून घरी आल्या आल्या खांद्यावरचे दप्तर काढत सौरभ उत्साहाने आजीला म्हणाला.

आजी सौरभचा फुललेला चेहरा पाहून म्हणाली, ''अरे व्वा! आज एक मुलगा खूप खूश दिसतोय. आनंदाची बातमी असणार बहुतेक. बक्षीस वगैरे मिळालं का रे? हो ना?''

''तुला गं कसं कळलं आजी? तू आणि आई दोघीही माझ्या मनातलं पटकन ओळखता बुवा. छे! तुमच्यापासून काहीच लपून राहत नाही. बरं आजी, आई कुठंय?''

''अरे, तुझी आई शेजारच्या राधाकाकूंकडे गेलीय. येईल तासाभरात. पण आधी मला सांग कशाबद्दल बक्षीस मिळालं? काय बक्षीस मिळालं? कोणी बक्षीस दिलं?''

''आजी, थांब थांब. एका वेळी केवढे गं प्रश्न तुझे! अगं, आज जे बक्षीस मिळालं ना, ते काय माझ्या एकट्याचं मुळीच नाही. ते बक्षीस माझं आणि तुझं आपल्या दोघांचं मिळून आहे.''

आता आजी गोंधळली. ती स्वतःशीच पुटपुटली. 'दोघांचं? एकच बक्षीस?' तिला काहीच कळेना.

सौरभ म्हणाला, ''ओळख! ओळख! तू माझ्या मनातलं पटकन ओळखतेस ना! आता हेसुद्धा ओळख बघू.'' आजी म्हणाली, ''अरे, आधी बक्षीस तर दाखव. त्यावरून काही अंदाज बांधता येतोय का ते बघू.''



सौरभने शाळेकडून बक्षीस म्हणून मिळालेलं डॉ. अरुण जोशी यांचं 'म्हणी आणि वाक्प्रचार' हे पुस्तक दप्तरातून काढलं. दुमडायला नको म्हणून चित्रकलेच्या मोठ्या वहीच्या पानांत जपून ठेवलेलं प्रमाणपत्रही बाहेर काढलं. आजीला दाखवलं. आजीने प्रमाणपत्र हातांत घेतलं. 'अनुभवांच्या खाणी समृद्ध करती वाणी' या स्पर्धेत सौरभचा प्रथम क्रमांक आला होता.

आजी म्हणाली, ''ही कोणती रे स्पर्धा?''

''अगं आजी, ही स्पर्धा तू ओळखली नाहीस? गंमतच आहे. अगं तुझ्यामुळे तर या स्पर्धेत माझा पहिला नंबर आलाय.''

आजीने खूप विचार केला. तिला काही आठवलं. ती म्हणाली, ''अनुभवांच्या खाणी म्हणजे म्हणी? बरोबर ना?''

सौरभ म्हणाला, ''अगदी बरोबर. हुशार आमची आजी! आजी, आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालाय. यानिमित्ताने आमच्या शाळेनं एक उपक्रम घेतला होता... 'लेखक आपल्या भेटीला.' या उपक्रमात आमच्या शाळेत अनेक लेखक आले होते. त्यांनी आम्हाला मराठी भाषेची महती तर सांगितलीच शिवाय कमी शब्दांत मोठा आशय व्यक्त करणाऱ्या 'म्हणी व वाक्प्रचार' यांचे महत्त्वही पटवून दिलं. त्यामुळेच शाळेनं या आठवड्यात म्हणींवर आधारित एक स्पर्धा घेतली होती. या स्पर्धेची अट एकच, आपल्या शरीराच्या अवयवाचा उल्लेख असणारीच म्हण स्पर्धकानं सांगायची.''

आजी मध्येच म्हणाली, ''अरे पण, ही स्पर्धा तुझी. मग मी काय केलं या स्पर्धेत? स्पर्धा तर तू जिंकलीस ना.''

''अगं आजी, ही स्पर्धा जरी मी जिंकलो असलो, तरी ही स्पर्धा मी तुझ्यामुळेच जिंकलोय. अगं, तू घरात येता-जाता उठता-बसता म्हणींचा वापर करून किती छान बोलत असतेस. कधीकधी तर तुझ्या म्हणींमागचा दडलेला अर्थ शोधण्यासाठी मी इतर पुस्तकांचा, संगणकाचा आधार घेत असतो आणि तुला माहितीय का, तू रोज वापरत असलेल्या नवनवीन म्हणी मी तुझ्याही नकळत माझ्या वहीमध्ये नित्यनेमानं लिहून ठेवल्या आहेत. अगं, तुझ्यामुळेच अनेक म्हणी माझ्या तोंडपाठ झाल्या आहेत.''

आजी म्हणाली, ''छानच रे! बरं मला सांग, तू शरीराच्या अवयवावर कोणकोणत्या म्हणी सांगितल्यास?''

''अगं मला 'हात' या अवयवावर आधारित म्हणी सांगायच्या होत्या. मी भरपूर म्हणी सांगितल्या. 'आपला हात जगन्नाथ', 'एका हाताने टाळी वाजत नाही', , 'हातच्या कांकणाला आरसा कशाला', 'हात दाखवून अवलक्षण', 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी', 'तेल गेले तूप गेले हाती धुपाटणे राहिले.'

सौरभ धाडधाड म्हणींवर म्हणी सांगत राहिला.

आजी चकित होऊन सौरभकडे पाहतच राहिली. मग म्हणाली. ''अरे थांब थांब. तुझी गाडी एकदा सुरू झाली ना सौरभ, मग ती मध्ये थांबायचं नावच घेत नाही.''

सौरभ हसत म्हणाला, ''अगं शाळेतसुद्धा प्रश्नाचं उत्तर देताना जाधव सर मला असंच म्हणतात.'' आजीने सौरभकडे कौतुकाने पाहिले आणि त्याला शाबासकी दिली.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठाचे प्रकट वाचन करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना पाठात आलेल्या म्हणींचे अर्थ समजावून सांगावेत. विद्यार्थ्यांनी ऐकलेल्या व वाचलेल्या म्हणींविषयी वर्गात चर्चा घडवून आणावी. विद्यार्थ्यांना नव्याने शिकलेल्या म्हणी व त्यांचे अर्थ यांचा संग्रह करण्यास सांगावे.

## नवीन शब्द शिकू या.

**वाणी** – बोलणे. **महती** – महत्त्व. **कांकण** – बांगडी. **समृद्ध** – संपन्न, वैभवशाली.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. का ते लिहा.**

(अ) घरी येताना सौरभचा चेहरा फुललेला होता, कारण ..............................

(आ) सौरभ घरी आला, तेव्हा आई घरी नव्हती, कारण ..............................

(इ) सौरभच्या शाळेने एक उपक्रम घेतला, कारण ..............................

(ई) आजी चकित होऊन सौरभकडे पाहत राहिली, कारण ..............................

**प्र. २. कोण ते लिहा.**

(अ) राधाकाकूंकडे गेलेली– [ ]

(आ) 'म्हणी व वाक्प्रचार' या पुस्तकाचे लेखक– [ ]

(इ) धाडधाड म्हणी सांगणारा– [ ]

(ई) सौरभकडे कौतुकाने पाहणारी– [ ]

**प्र. ३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) म्हणींवर आधारित स्पर्धेची अट कोणती होती?

(आ) 'ही स्पर्धा मी आजीमुळे जिंकलो', असे सौरभ का म्हणाला?

(इ) म्हणी व वाक्प्रचार यांची वैशिष्ट्ये कोणती?

## लिहिते होऊ या.

- **या पाठातील प्रसंगांवरून तुमच्या शब्दांत कथा तयार करा व लिहा.**

## चर्चा करू या.

- **पारंपरिक म्हणी व त्या संदर्भातील प्रचलित कथा यांविषयी शिक्षकांसोबत व पालकांसोबत चर्चा करा.**



## खेळू या शब्दांशी

- **खालील चौकोनात काही म्हणी लपल्या आहेत. चौकोनातील म्हणी शोधा आणि लिहा. शिक्षकांच्या मदतीने अर्थ माहीत करून घ्या.**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ | क | डे | आ | ड | ति | क | डे | वि | ही | र |
| जा | रा | बा | य | र | को | र | य | था | ना | ग |
| गा | वे | प | त्या | ह | ल्हा | ना | रा | जा | व | र्वा |
| व | त | त | बि | पा | का | ही | त | था | ड | चे |
| क | से | सा | ळा | पा | क | त्या | प्र | जा | ती | घ |
| री | भ | बे | व | चा | डी | ला | रा | जी | चे | र |
| ते | रा | टा | र | मा | सों | ड | अ | रा | मी | खा |
| रा | वे | पा | ना | ल | गे | र | ति | त्र | ठ | ली |
| व | न | क | गो | ग | फा | क | ते | थो | अ | ल |
| बै | ल | री | बा | पा | र | शा | थे | डी | ळ | क्ष |
| ल | गे | ला | झो | पा | के | ला | मा | ती | णी | ण |

(१) इकडे आड तिकडे विहीर.
(२) आयत्या बिळावर नागोबा.
(३) कोल्हा काकडीला राजी.
(४) कर नाही त्याला डर कशाला.
(५) बैल गेला, झोपा केला.
(६) हपापाचा माल गपापा.
(७) नावडतीचे मीठ अळणी.
(८) करावे तसे भरावे.
(९) गाव करी ते राव न करी.
(१०) अति तेथे माती.
(११) बाप तसा बेटा.
(१२) गर्वाचे घर खाली.

**प्र. २. पाठात आलेल्या म्हणींचा अर्थ समजून घ्या व वाक्यांत उपयोग करा.**

**प्र. ३. समानार्थी शब्द लिहा.**

(अ) शाळा → ______ (आ) घर → ______ (इ) हात → ______

**प्र. ४. हात व हस्त हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. खालील शब्दांत हात व हस्त लपलेले आहेत. ते शब्द वाचा व त्यांचे अर्थ समजून घ्या. असे इतर अवयवांवर आधारित शब्द शोधा व लिहा.**

हातोडा, हातकंकण, हातकडी, हस्तक्षेप, हस्तकला, हातमोजे, हस्तरेषा, हस्ताक्षर, हातखंडा, हस्तलिखित, हस्तांदोलन, हस्तगत, हातशिलाई, हस्तमुद्रा, हातचलाखी



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** पाठात आलेल्या म्हणींव्यतिरिक्त मानवी अवयवांवर आधारित असलेल्या म्हणी माहीत करून घ्या. जास्तीतजास्त म्हणींचा संग्रह करा व वहीत लिहा.



## आपण समजून घेऊ या.

सतत वापरात येणारी छोटीछोटी व अर्थपूर्ण वाक्ये म्हणजे म्हणी. प्रत्येक म्हणीमागे एक मोठा अर्थ दडलेला असतो, त्यातून आपल्याला बोध होतो. 'म्हण' म्हणजे लक्षात ठेवण्यास योग्य असे ज्ञानवचन होय. म्हणींमुळे मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग बोलताना व लिहिताना होत असतो. म्हणींमुळे आपले बोलणे अधिक प्रभावशाली करता येते. म्हणींमुळे भाषेला सौंदर्य प्राप्त होत असते.




### ※ निवडक म्हणींचे अर्थ

**(१) करावे तसे भरावे :–** आपण जसे काम करू, तसा परिणाम होईल अशा आशयाची ही म्हण आहे. आपण चांगले काम केले, तर त्याचा परिणामही चांगलाच होईल आणि वाईट काम केले, तर परिणामही वाईट होईल. एका छोट्याशा वाक्यातून आशयाचा मोठा अर्थ या म्हणीतून लक्षात येतो.

**(२) नाचता येईना अंगण वाकडे :–** ही एक मनोरंजक म्हण आहे. आपल्याला नाचताच येत नसेल, तर आपण म्हणतो, की अंगणच वाकडे आहे म्हणून मला नाचता येत नाही. याचाच अर्थ असा, की आपल्यातील उणिवा झाकून ठेवण्यासाठी आपण इतरांना दोष देतो.

अशा प्रकारच्या अनेक म्हणी मराठी भाषेत वापरल्या जातात. अशा म्हणी वेगवेगळ्या बोली भाषांमध्येही वापरल्या जातात. लेखनाचे व भाषणाचे सौंदर्य वाढवण्यास म्हणी मदत करतात. आपल्या बोलण्यातून व लिहिण्यातून म्हणींचा वापर होत राहिला, तर आपली भाषा अधिक समृद्ध होईल.



## आम्हांला हे समजले.

- **म्हणींचा अचूक अर्थ सांगणारा पर्याय निवडा.**

**(१) घरोघरी मातीच्या चुली**

(अ) सर्वांच्या घरात मातीची चूल असते.
(आ) सर्वत्र सारखीच परिस्थिती असते.
(इ) मातीच्या चुली वापरणे योग्य असते.
(ई) चुली मातीपासून बनवतात.

**(२) थेंबे थेंबे तळे साचे**

(अ) थेंब थेंब पाणी साचून तळे भरते.
(आ) तळ्यात येणारे पाणी थेंबाथेंबाने एकत्र झालेले असते.
(इ) थोडी थोडी बचत केल्याने कालांतराने मोठा साठा होतो.
(ई) तळे आटण्यासाठी पावसाची वाट पाहावी लागते.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांनी बोलताना व लिहिताना म्हणींचा वापर करावा यासाठी मार्गदर्शन करावे. म्हणी व त्यांचे अर्थ यावर आधारित विविध भाषिक खेळांचा व कृतींचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या म्हणींची माहिती सांगण्यासाठी प्रवृत्त करावे.



## जाणून घेऊ या.

### मराठी साहित्यप्रकार

व्यक्तीच्या मनातील विचार, भावना आणि अनुभव यांना लिखित किंवा मौखिक पद्धतींनी शब्दांत गुंफून तयार केलेला मजकूर म्हणजेच 'साहित्य' होय. साहित्यात समाज, संस्कृती व मानवी जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

समाज — संस्कृती — मानवी जीवन

साहित्य हे प्रतिबिंब असते.

**साहित्य प्रकार**

| गद्य | पद्य | नाट्य |
|---|---|---|
| कथा, कादंबरी, निबंध, प्रवासवर्णन, आत्मचरित्र इत्यादी. | कविता, गझल, महाकाव्य, आख्यान, भावगीते इत्यादी. | नाटक, एकांकिका, नाट्यछटा, सुखांतिका, प्रहसन, शोकात्मिका, संगीत नाटक इत्यादी. |

**या इयत्तेत आपण कथा आणि कविता या दोन साहित्यप्रकारांची ओळख करून घेणार आहोत.**

✻ **कथा–** कथा ऐकणे व कथा सांगणे हा सर्वांसाठीच आनंदाचा विषय आहे. कथालेखन म्हणजे कल्पनाशक्ती, अनुभव आणि भावना यांना शब्दरूप देणे होय. कथावाचनामुळे व लेखनामुळे आनंद, बोध आणि मनोरंजन होत. असते. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती नवनिर्मिती आणि सर्जनशीलता यांना वाव देणारा हा विषय आहे. कथेतून आनंद मिळतो व त्यामुळे विचारांना चालना व दिशा मिळते.

एखादा महत्त्वाचा प्रसंग किंवा अनुभव प्रभावीपणे मांडणे म्हणजे 'कथा' होय.

• **कथालेखनाचे महत्त्वाचे घटक**

**कथा**

- कथाबीज
- कथेची सुरुवात
- कथेतील घटना व स्थळ
- कथेतील पात्रे
- कथालेखन भूतकाळात
- कल्पकता
- शीर्षक
- तात्पर्य (कथेतून मिळालेला बोध, संदेश, मूल्य)
- पात्रांचे स्वभावविशेष
- पात्रांमधील संवाद
- विषयाला अनुसरून भाषा
- कथेचा शेवट
- कथेची सुरुवात व शेवट यांची सांगड

कथा ही पूर्णत: काल्पनिक किंवा सत्यघटनेवर आधारित असू शकते. कथेतून आनंद मिळतो त्याचप्रमाणे कथेतून बोधही मिळतो. कथेतील घटक वापरून वाचकांच्या मनात एक अविस्मरणीय अनुभव निर्माण करणारी लेखकाची हातोटी म्हणजे 'शैली' होय.

- **कथा कशी लिहावी ?**

(१) कथा सर्वसाधारणपणे भूतकाळात लिहिली जाते.
(२) कथेत पात्रे असावीत.
(३) पात्रांच्या तोंडी संवाद असावेत.
(४) लेखनातील घटना, प्रसंगानुसार काळाचे योग्य भान राखले जाणे महत्त्वाचे आहे.
(५) कथाबीजाला अनुसरून पात्रे व त्यांचे संवाद असावेत. पात्रांनुसार योग्य भाषा असावी.







कथा ऐकणे व सांगणे हा आबालवृद्धांच्या आनंदाचा विषय आहे. कथा ही कल्पनाशक्तीला, नवनिर्मितीला व सर्जनशीलतेला वाव देते. मग आवडेल ना तुम्हांला अशा गोष्टी ऐकायला, वाचायला आणि स्वत: तयार करून दुसऱ्यांना ऐकवायला. अशी तुमची एक कथा वर्गात ऐकवा व लिहून काढा.

- **लेखक व त्यांच्या कथासंग्रहांची नावे वाचा व लक्षात ठेवा.**

| लेखक/लेखिका | कथासंग्रह |
|---|---|
| (१) शंकर पाटील | वळीव |
| (२) द. मा. मिरासदार | भोकरवाडीच्या गोष्टी |
| (३) बाबुराव बागूल | मरण स्वस्त होत आहे |
| (४) अण्णाभाऊ साठे | कृष्णाकाठच्या कथा |
| (५) व्यंकटेश माडगूळकर | माणदेशी माणसं |
| (६) कुसुमावती देशपांडे | दीपकळी |
| (७) कमल देसाई | रंग भाग १ व २ |
| (८) दुर्गा भागवत | दख्खनच्या लोककथा |
| (९) विभावरी शिरूरकर | कळ्यांचे नि:श्वास |
| (१०) आशा बगे | मारवा |

- **याप्रमाणे कथाकार व त्यांचे कथासंग्रह यांची माहिती मिळवा व वाचा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध कथा ऐकवाव्यात तसेच कथा वाचण्यासाठी प्रवृत्त करावे.

# ५. प्रकाशयात्री




- **ऐका. म्हणा. वाचा.**

बालक आम्ही प्रकाशयात्री गगन चितारू नवे
फूलपाखरापरि आम्हांला पंख मोकळे हवे

कळ्याकळ्यांचे गेंद होऊनी हसता हसता झुलू
रंग वेगळे तरीही एका फांदीवरती फुलू
धरेस सांगू आकाशाचे नाते हळवे हळवे

अंधारातुन नेऊ अवघी वाट प्रकाशाकडे
ताठ उभारू आम्ही आमुच्या पायावरती खडे
तेजोमय होतील उद्याला लुकलुकणारे दिवे

हात हाताशी घेऊन घडवू इतिहासाची पाने
स्वर उंचावुन गाऊ इथल्या मातीचे गाणे
घुमवू नारा,घुमवू वारा, सर्व बांधवासवे!



**कल्याण इनामदार** (१९३९-२००८): प्रसिद्ध मराठी कवी आणि बालसाहित्यिक. 'धमाल गाणी', 'छम् छम् छडी', 'गाणारे गाल, 'फुलपाखरांचे डोळे' हे बालगीतसंग्रह. 'तळ्याचा राजा', 'सशाभाऊ', 'टिपूनाना आणि मंडळी', 'मोरपंखी डोळे', 'देवाची लेकरे' या बालकथा. तसेच 'गीतरचना : स्वरूप आणि विकास' हे अभ्यासपूर्ण पुस्तक प्रसिद्ध. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'बालकविता वाङ्मय पुरस्कार २००८' देऊन गौरवण्यात आले होते. २००८ साली महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या बालकविता वाङ्मय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. ही कविता 'गीतपुष्पांचा फुलोरा' या संकलित काव्यसंग्रहातून घेण्यात आली आहे.

'प्रकाशयात्री' म्हणजे अशी व्यक्ती जी समाजात चांगुलपणा, प्रामाणिकपणा आणि नवी आशा पल्लवित करते. प्रस्तुत कवितेतून कवीने चांगले विचार आणि चांगल्या कृती यादवारे सकारात्मकतेचा संदेश सर्वांना दिला आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक, सामूहिकरीत्या कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. विद्यार्थ्यांना कवितेतील नवीन शब्दांचा अर्थ समजावून सांगावा. कवितेची वैशिष्ट्ये, वेगळेपण व शैली याबाबत गटामध्ये चर्चा घडवून आणावी.



## नवीन शब्द शिकू या.

**प्रकाशयात्री** – प्रकाशाच्या मार्गावर चालणारा. **गगन** – आकाश. **चितारणे**– रेखाटणे. **गेंद** – फुलांचा गुच्छ, झुबका. **धरा**– पृथ्वी, वसुंधरा. **खडे** – उभे. **स्वर** – आवाज. **नारा** – घोषणा. **बांधव**– भाऊ.



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. कवितेतील खालील अर्थाच्या ओळी शोधून लिहा.**

(अ) फुलपाखरासारखे स्वातंत्र्य हवे.
(आ) आम्ही स्वावलंबनाने ताठ उभे राहू.
(इ) एकमेकांच्या सोबतीने नवा इतिहास घडवू.

**प्र. २. कवितेतील खालील ओळींचा अर्थ लिहा.**

(अ) बालक आम्ही प्रकाशयात्री गगन चितारू नवे.
(आ) कळ्याकळ्यांचे गेंद होऊनी हसता हसता झुलू.
(इ) अंधारातुन नेऊ अवघी वाट प्रकाशाकडे.
(ई) घुमवू नारा, घुमवू वारा, सर्व बांधवासवे!

**प्र. ३. कवितेच्या आधारे खालील कृती करा.**

(अ) कवीचे नाव – (आ) कवितेचे नाव– (इ) कवितेचा विषय –
(ई) कवितेतील शब्दांचे अर्थ –
(१) स्वर – (२) धरा–
(३) बांधव– (४) तेजोमय –
(उ) कवितेतून मिळणारा संदेश –

**प्र. ४. कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**



## जाणून घेऊ या.

'घोषवाक्य' म्हणजे एखादा संदेश, विचार किंवा उद्देश. थोडक्यात प्रभावी व लक्षवेधी शब्दांत मांडलेले लहान व अर्थपूर्ण वाक्य होय. सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणविषयक, आरोग्यविषयक, देशभक्तीपर अशा विविध विषयांवर जागृतीपर घोषवाक्ये तयार करता येतात.

- **घोषवाक्याचे स्वरूप**

(१) कमी शब्दांत लयबद्ध प्रभावी मांडणी.
(२) यमक जुळणारे शब्द वापरून सूत्रबद्ध वाक्यरचना.
(३) समूहात जोश, उत्साह निर्माण करण्यासाठी घोषवाक्ये घोषणा म्हणून वापरली जातात.
उदा., (१) साक्षर जनता, भूषण भारता ।
(२) स्वच्छ भारत, सुंदर भारत ।

- **विविध विषयांवरील आकर्षक घोषवाक्यांच्या पट्ट्या तयार करून विविध उपक्रमप्रसंगी त्यांचा वापर करा.**



## आपण समजून घेऊ या.

मागील इयत्तेत आपण शब्दांच्या जाती किती व कोणत्या याविषयी माहिती करून घेतली आहे.

शब्दांच्या जाती म्हणजे शब्दांचे प्रकार. वाक्यात जे शब्द येतात, त्यांची कार्ये विविध प्रकारची असतात. त्या शब्दांच्या वाक्यातील कार्यावरून त्यांना वेगवेगळी नावे देण्यात आली आहेत.




शब्दांपासून वाक्य तयार होण्यासाठी शब्दांच्या रूपांत आपण कधीकधी बदल करतो. काही शब्दांच्या रूपांत बदल होतो, तर काही शब्द मुळीच बदलत नाहीत. जेव्हा शब्दांचे लिंग किंवा वचन बदलते किंवा शब्दांना विभक्तीचे प्रत्यय लागतात, तेव्हा शब्दांच्या रूपांत बदल होतो. ज्या शब्दांमध्ये बदल होतो, त्यांना 'विकारी शब्द' म्हणतात, तर ज्या शब्दांमध्ये बदल होत नाहीत, त्यांना 'अविकारी शब्द' म्हणतात.

- **खालील तक्त्यामध्ये लिंग व वचन यांमुळे शब्दांमध्ये झालेले बदल लक्षात घ्या.**

| शब्दांची जात | पुल्लिंग | स्त्रीलिंग | अनेकवचन | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| **नाम** | मुलगा | मुलगी | मुलगे | मुलांना |
| **सर्वनाम** | तो | ती | ते | त्यांना |
| **विशेषण** | चांगला | चांगली | चांगले | चांगल्यांना |
| **क्रियापद** | गातो | गाते | गातात | गाण्याने |

- **खालील अविकारी शब्दांची दिलेली उदाहरणे वाचा व समजून घ्या.**

(१) क्रियाविशेषण अव्यय- सभोवार, तिकडे, उद्या, जलद, नेहमी

(२) शब्दयोगी अव्यय- नंतर, वरील, देखील, साठी, मागे

(३) उभयान्वयी अव्यय- आणि, किंवा, परंतु, अथवा

(४) केवलप्रयोगी अव्यय- वाहवा, शाब्बास, अबब, अरेरे

या इयत्तेत आपण नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या विकारी शब्दांच्या प्रकारांची माहिती पाहणार आहोत.

# नाम आणि नामाचे प्रकार

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) शौर्य हे वीराचे लक्षण आहे.

(२) गंगा ही भारत देशातील मोठी नदी आहे.

(३) मला पुस्तक आवडते.

(४) माझ्या मैत्रिणीचे नाव अनघा आहे.

वरील वाक्यात शौर्य, वीर, गंगा, भारत, देश, नदी, पुस्तक, मुलगी, मैत्रीण, अनघा ही नामे आहेत.

हे शब्द वाचले, की आपल्या डोळ्यांसमोर काही वस्तू येतात, व्यक्ती येतात. या नावांना नाम म्हणतात. सामान्यतः 'वस्तू' हा शब्द डोळ्यांना दिसणाऱ्या पदार्थांना उद्देशून वापरतो, पण व्याकरणात त्याचा अर्थ व्यापक आहे. 'वस्तू' या शब्दाच्या अर्थामध्ये सर्व प्रकारांचे पदार्थ, प्राणी व त्यांच्या अंगी असणारे गुणधर्म, भाव, भावना यांचा अंतर्भाव होतो.

**प्रत्यक्षात दिसणाऱ्या किंवा कल्पनेने जाणलेल्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना जी नावे दिलेली असतात, त्यांना व्याकरणात 'नाम' असे म्हणतात.**

**नामाचे प्रकार**

- **सामान्यनाम**
- **विशेषनाम**
- **भाववाचकनाम**

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) सह्याद्री पर्वतरांगात 'कळसूबाई' हे सर्वांत उंच शिखर आहे.

(२) रोहित माझा विद्यार्थी आहे.

वरील वाक्यांतील सामान्यनामे– **पर्वतरांगा, शिखर, विद्यार्थी**

वरील वाक्यांतील विशेषनामे– **सह्याद्री, कळसूबाई, रोहित**

वरील वाक्यांत **पर्वतरांगा, शिखर, विद्यार्थी** ही सामान्यनामे आहेत. सामान्यनामे ही त्या वस्तूच्या जातीला दिलेली नावे आहेत.

**एकाच जातीच्या पदार्थातील समान गुणधर्मामुळे त्या पदार्थाला जे सर्वसामान्य नाव दिले जाते, त्याला 'सामान्यनाम' असे म्हणतात.**

पहिल्या वाक्यात 'सह्याद्री' हे एका ठरावीक पर्वताला तर 'कळसूबाई' हे एका ठरावीक शिखराला दिलेले नाव आहे. दुसऱ्या वाक्यात 'रोहित' हे एका ठरावीक विद्यार्थ्याला दिलेले नाव आहे. वरील वाक्यांत **सह्याद्री, कळसूबाई, रोहित** ही नावे काही ठरावीक व्यक्तींना, वस्तूंना तसेच ठिकाणांना दिलेली आहेत.

**ज्या नामाने जातीचा बोध होत नसून त्या जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो, त्यास 'विशेषनाम' असे म्हणतात.**

- **खालील वाक्ये वाचा.**

  (१) प्रामाणिकपणा हा खूप चांगला गुण आहे.
  (२) पावसाळ्यातील निसर्गसौंदर्य मनाला खूप भावते.
  (३) जोशीबाईंना जॉनने केलेली स्वच्छता आवडली.

वरील वाक्यातील प्रामाणिकपणा, सौंदर्य, स्वच्छता हीदेखील नावे आहेत; पण ती वस्तू किंवा प्राणी यांची नावे नसून त्या त्या वस्तूतील किंवा प्राण्यातील गुणधर्मांना दिलेली नावे आहेत. प्रामाणिकपणा, सौंदर्य, स्वच्छता ही भाववाचकनामे आहेत.

**ज्या नामाने प्राणी किंवा वस्तू यांच्यामध्ये असलेले गुण, धर्म किंवा भाव यांचा बोध होतो, त्याला 'भाववाचकनाम' असे म्हणतात.**

- **पुढे काही सामान्यनामे, विशेषनामे व भाववाचकनामे दिली आहेत. खालील तक्त्यात त्यांचे वर्गीकरण करा व लिहा.**

पाटी, गुलाब, प्राजक्ता, वात्सल्य, माणुसकी, फूल, नवलाई, नम्रता, नदी, गोदावरी, चवळी, चांगुलपणा.

| | |
|---|---|
| **सामान्यनाम** | फूल, ................. |
| **विशेषनाम** | प्राजक्ता, ................. |
| **भाववाचकनाम** | वात्सल्य, ................. |



## सारे हसू या.

- **खाली दिलेले विनोद वाचा व त्याचा आनंद घ्या.**

**नातू** : हॅलो आजी, इंद्रजित बोलतोय
**आजी** : कोण बोलतंय? नीट ऐकू येत नाही.
**नातू** : इंद्रजित बोलतोय म्हटलं.
**आजी** : इंग्रजीत नको रे बाबा, मराठीतच बोल.

**प्रिया** : अरे, थंडी वाजते, तेव्हा तू काय करतोस?
**विनोद** : मी मेणबत्तीजवळ बसतो.
**प्रिया** : आणि खूप थंडी वाजली तर!
**विनोद** : मेणबत्ती पेटवतो.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना नामाची व नामाच्या प्रकारांची ओळख करून द्यावी. तसेच वाक्यांतील नाम व नामाचे प्रकार ओळखण्याचा जास्तीतजास्त सराव करून घ्यावा. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारांच्या कृती करून घ्याव्यात.

# ६. राष्ट्रध्वज माझा अभिमान

**स्वप्ना गोवेकर** (१९८७) : प्रसिद्ध कवयित्री व लेखिका. २०१९ मधील 'आजोळच्या आठवणी' हा कथासंग्रह, २०२३ मधील 'काव्यरंग' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध. 'काव्यरंग' या पुस्तकासाठी त्यांना कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वाङ्‍मयीन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पाठ 'किशोर' जानेवारी २०१६ या मासिकातून घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत पाठातून वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून राष्ट्रध्वजाविषयी मुलाच्या मनामध्ये असणारा अभिमान प्रतिबिंबित होतो. तसेच मुलाच्या स्पर्धेच्या तयारीसाठी पालकांनी घेतलेले परिश्रम व प्रोत्साहन याचेही सुंदर चित्रणही या पाठातून करण्यात आले आहे.

शाळेतील वक्तृत्व स्पर्धा पार पडली. विषय होता, 'राष्ट्रध्वज माझा अभिमान'. स्पर्धेतील सर्वच विद्यार्थ्यांनी सुंदर-सुंदर भाषणे केली होती. स्पर्धेचा निकाल ऐकण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये फार उत्सुकता होती. अखेर निकाल सांगण्यासाठी स्पर्धेचे परीक्षक श्री. जाधव सर व्यासपीठावर उभे राहिले. ते म्हणाले, ''आज जी वक्तृत्व स्पर्धा पार पडली त्यात सहभागी सर्वच विद्यार्थ्यांनी सुंदर भाषणं केली; परंतु केवळ प्रथम आणि द्‌वितीय अशा दोनच क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना तालुका स्तरावर २६ जानेवारी रोजी होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेसाठी सहभाग घेता येईल. तरी इतरांनी नाराज व्हायचं नाही बरं का! सर्वांमध्येच काही ना काही सुप्त गुण असतात. ते विकसित करण्यासाठी प्रत्येकानं भरपूर मेहनत घ्यायला हवी.''

सर्वांनी माना डोलावल्या. सर्वांची उत्सुकता अगदी शिगेला लागली होती. ती अधिक न ताणता सरांनी निकाल जाहीर केला. प्रथम क्रमांक श्रेया सुधाकर कांबळे, द्‌वितीय क्रमांक अभिषेक श्रीधर देसाई. सभागृहामध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला. सर्व जण कार्यक्रम आटोपून घरी परतले. सहावी ते आठवी या गटात स्पर्धा झाली होती. सहावीतील अभिषेकने द्‌वितीय क्रमांक पटकावला होता. ही गोष्ट कौतुकास्पद होती; पण स्वारी काहीशी हिरमुसली होती. घरात पाऊल टाकताच आई म्हणाली, ''काय रे अभिषेक, काय झालं! स्पर्धेत नंबर आला नाही का? बाळा, हार मानायची नाही बरं का!''

अभिषेक म्हणाला, ''अगं, दुसरा नंबर आलाय माझा! पण २६ जानेवारीच्या तालुका स्तरावरच्या स्पर्धेत मला पहिला नंबर काढायचाय. कसं जमणार ते?'' वडील म्हणाले, ''एवढंच ना! आम्ही तुझी तयारी करून घेऊ. मग तर झालं!'



अभिषेकची कळी खुलली. राष्ट्रध्वज आणि राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय सण, राष्ट्रीय सणांचे महत्त्व या विषयांवर अनेक मुद्‌दे वडिलांनी अभिषेकच्या भाषणात समाविष्ट केले. आपला देश पारतंत्र्यात असताना देशासाठी घरादाराचा त्याग करणाऱ्या, प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या देशभक्तांचा जाज्वल्य इतिहास वडिलांनी अभिषेकला सांगितला. आईबाबांनी अभिषेककडून भाषणाची उत्तम तयारी करून घेतली. योग्य त्या ठिकाणी त्याला मार्गदर्शन केले. अभिषेक दररोज पहाटे लवकर उठून भाषणाचा सराव करू लागला. अखेर स्पर्धेचा दिवस उजाडला. सकाळी लवकर उठून त्याने अंघोळ केली, प्रार्थना केली. आईने इस्त्री करून ठेवलेले स्वच्छ कपडे परिधान केले. आईवडिलांना एकदा भाषण म्हणून दाखवले. आईवडिलांनीही स्पर्धेसाठी अभिषेकला शुभेच्छा दिल्या. आईवडिलांना नमस्कार करून तो शाळेत गेला.

तालुक्यातील वेगवेगळ्या शाळांमधील प्रथम दोन क्रमांकांचे विद्यार्थी स्पर्धेसाठी अभिषेकच्या शाळेत आले होते. स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी बाहेरील परीक्षक बोलावले होते. स्पर्धेमध्ये सर्व विद्यार्थ्यांची भाषणे चांगली झाली. वडिलांनी सांगितलेले सर्व मुद्‌दे अभिषेकने भाषणात शांतपणे आणि आत्मविश्वासाने मांडले होते. अभिषेकचा तालुका स्तरावर प्रथम क्रमांक आला. त्याला फार आनंद झाला. सर्वांनी त्याचे अभिनंदन केले. ही आनंदाची बातमी कधी एकदा वडिलांना सांगेन, असे त्याला वाटत होते. घरात पाऊल टाकताच अभिषेक आईला बिलगला. वडिलांच्या हातात आनंदाने प्रमाणपत्र दिले. वडिलांनी प्रमाणपत्र वाचले आणि म्हणाले, ''अरे वा! प्रथम क्रमांक. शाब्बास!'' अभिषेक म्हणाला, ''बाबा, हे बक्षीस माझ्या एकट्याचं नाही तर यात तुमचा, आईचा आणि माझ्या शाळेचाही खूप मोठा वाटा आहे. बाबा, माझं भाषण उत्तम व्हावं म्हणून तुम्ही खूप छान मार्गदर्शन केले. आईनेही माझ्या भाषणाची तयारी करून घेतली. म्हणूनच मी आत्मविश्वासाने भाषण करू शकलो.''

आमचे देशमुख सर नेहमी म्हणतात, ''एकटा माणूस एखाद्या गोष्टीची सुरुवात करू शकतो; पण अंतिम ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वांची साथ आवश्यक असते. ही गोष्ट आज मला पुरेपूर पटली.''

त्याचे हे उद्‌गार ऐकून आईवडिलांना काय बोलावे ते सुचेना. आईवडिलांनी अभिषेकला अभिमानाने जवळ घेतले आणि त्याचे कौतुक केले.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना आपल्या देशाविषयी व राष्ट्रभक्तीविषयी सन्मानाची जाणीव विविध उदाहरणांतून करून द्यावी. विद्यार्थ्यांकडून वर्तमानपत्रातील राष्ट्रीय सणांविषयी आलेल्या बातम्यांचे वाचन करून घ्यावे. तसेच त्याबाबत चर्चा घडवून आणावी. त्यातील महत्त्वाचे मुद्‌दे, सारांश लिहिण्यासाठी प्रेरित करावे. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

## नवीन शब्द शिकू या.

**वक्तृत्व** - भाषण. **सुप्त** - लपलेले. **कळी खुलणे** - आनंदी होणे. **परीक्षक** - स्पर्धेचे परीक्षण करणारी व्यक्ती.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) अभिषेकच्या वक्तृत्व स्पर्धेचा विषय–

(आ) शालेय स्तरावरील वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण करणारे –

(इ) अभिषेकची वक्तृत्व स्पर्धेची तयारी करून घेणारे –

**प्र. २. पाठातून तुम्हांला जाणवलेले अभिषेकचे गुण दिलेल्या चौकटीत लिहा.**

अभिषेकमधील गुण

**प्र. ३. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) श्री. जाधव सर यांनी वक्तृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांना कोणते मार्गदर्शन केले?

(आ) अभिषेकचे भाषण उत्तम होण्यासाठी वडिलांनी काय केले?

(इ) देशमुख सर मुलांना नेहमी काय सांगायचे?

## विचार करा व सांगा.

**प्र. १. अभिषेकचा तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक का आला असावा, असे तुम्हांला वाटते?**

**प्र. २. स्पर्धेमध्ये यश मिळवण्यासाठी कशा प्रकारे तयारी करणे आवश्यक असते, असे तुम्हांला वाटते?**

**प्र. ३. तुम्ही आतापर्यंत कोणकोणत्या स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे, त्याची पूर्वतयारी तुम्ही कशी केली होती ते सांगा.**

## चर्चा करू या.

- **तुम्हांला आवडणाऱ्या विविध स्पर्धांविषयी गटात चर्चा करा.**



## खेळू या शब्दांशी

- **खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

(१) कडकडाट (२) परीक्षण (३) सभागृहात (४) मार्गदर्शन.



## लिहिते होऊ या.

- **राष्ट्रध्वजाविषयी अभिमान दर्शवणारी घोषवाक्ये तयार करा व लिहा.**





## शोध घेऊ या.

- **आंतरजालाच्या साहाय्याने आपल्या राष्ट्रध्वजाविषयी अधिकची माहिती मिळवा.**



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** (१) वेगवेगळ्या देशांच्या राष्ट्रध्वजांची चित्रे व माहिती मिळवा.
(२) राष्ट्रीय सण/राष्ट्रभक्ती यावर आधारित विविध घोषवाक्ये तयार करा व वहीत लिहा.



## चला वाचू या.

- **पुढील उतारा वाचा.**

आपला राष्ट्रध्वज म्हणजे आपल्या देशाचा आणि आपला अभिमान आहे. राष्ट्रध्वज पाहिला, की प्रत्येक भारतीयाच्या मनात देशप्रेमाची भावना जागृत होते. आपल्या राष्ट्रध्वजामध्ये तीन रंग आहेत-केशरी, पांढरा आणि हिरवा. केशरी रंग त्याग व शौर्य दर्शवतो, पांढरा रंग शांततेचे व सत्याचे प्रतीक आहे, तर हिरवा रंग समृद्धीचे व निसर्गाचे प्रतीक मानला जातो. मध्यभागी असलेले निळ्या रंगाचे अशोकचक्र प्रगतीचा आणि सतत पुढे जाण्याचा संदेश देते.

स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन अशा राष्ट्रीय सणांमध्ये राष्ट्रध्वज अभिमानाने फडकताना पाहून प्रत्येक भारतीयाचे हृदय आनंदाने भरून येते. सैनिक देशाच्या सीमांचे रक्षण करताना या राष्ट्रध्वजासाठी आपले प्राणही अर्पण करतात म्हणूनच राष्ट्रध्वजाचा आदर करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

राष्ट्रध्वज आपल्याला एकता, देशभक्ती आणि राष्ट्रसेवा यांची प्रेरणा देतो. म्हणूनच सर्व भारतीयांमध्ये राष्ट्रध्वजाप्रति 'राष्ट्रध्वज माझा अभिमान' ही भावना दिसून येते.

# ७. खोप्यामधी खोपा

- **ऐका. म्हणा. वाचा.**

अरे खोप्यामधी खोपा
        सुगरणीचा चांगला
देखा पिलांसाठी तिनं
        झोका झाडाले टांगला ।। १ ।।

पिलं निजले खोप्यात
        जसा झुलता बंगला
तिचा पिलांमधी जीव
        जीव झाडाले टांगला ।। २ ।।

खोपा इनला इनला
        जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
        जरा देख रे मानसा ।। ३ ।।

तिची उलूशीच चोच
        तेच दात तेच ओठ
तुले देले रे देवानं
        दोन हात दहा बोटं ।। ४।।



**बहिणाबाई चौधरी** (१८८०-१९५१) : शेतकऱ्याच्या कुटुंबातील संसारी स्त्रीची सुख-दु:खे अनुभवताना अंत:स्फूर्तीने बहिणाबाईंनी काव्यनिर्मिती केली. माणुसकी, निसर्गाशी समरसता, डोळस श्रद्धा आणि खेड्यातल्या समूहजीवनाची जाणीव त्यांच्या कवितेतून दिसून येते. मनातला जातिवंत जिव्हाळा प्रकट करणारी अल्पाक्षरी शैली, भोवतालच्या निसर्गाचा, मानवी जगण्याचा खानदेशी बोलीतील सहजस्फूर्त आविष्कार ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र कविवर्य सोपानदेव यांनी आचार्य अत्रे यांच्या प्रोत्साहनामुळे 'बहिणाबाईंची गाणी' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. ही कविता 'बहिणाईची गाणी' या काव्यसंग्रहातून घेण्यात आली आहे.

प्रस्तुत कवितेतून कवयित्रीने सुगरण या पक्ष्याने मेहनतीने व कलात्मक पद्धतीने तयार केलेल्या खोप्याविषयी वर्णन केले आहे. सुगरण पक्ष्याकडून माणसाने खूप काही शिकण्यासारखे आहे असे कवयित्री या कवितेतून सुचवत आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक, सामूहिकरीत्या कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. विद्यार्थ्यांना कवितेत वर्णन केलेल्या सुगरण पक्षी तयार करत असणाऱ्या खोप्याविषयीची माहिती द्यावी. विद्यार्थ्यांना कवितेतील नवीन अर्थ समजावून सांगावेत. विद्यार्थ्यांना या कवितेची वैशिष्ट्ये, वेगळेपण व शैली स्वत:च्या शब्दात मांडण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.



## नवीन शब्द शिकू या.

**खोपा** – सुगरणीचे घरटे. **सुगरण**– एक पक्षीण. **इनला** – विणला. **जीव टांगणे** – अतिशय काळजी वाटणे. **गिलके** – घोसाळे. **कोसा** – वाळून सुकलेल्या घोसाळ्याचा सुंदर दिसणारा जाळीदार अवशेष. **देख** – बघ. **उलूशीच** – लहानशी.



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सुगरण पक्ष्याने खोपा कोणासाठी बांधला आहे?

(आ) खोपा कोठे टांगला आहे?

**प्र. २. पुढील आकृती पूर्ण करा.**

**कवितेत खोप्यासाठी आलेल्या उपमा**

↓ .................. ↓ .................. ↓ ..................

**प्र. ३. खालील ओळींचा भावार्थ तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) देखा पिलांसाठी तिनं, झोका झाडाले टांगला.

(आ) तिचा पिलांमधी जीव, जीव झाडाले टांगला.

(इ) पाखराची कारागिरी, जरा देख रे मानसा.

(ई) तुले देले रे देवानं, दोन हात दहा बोटं

**प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यांत लिहा.**

(अ) सुगरणीचा खोपा चांगला आहे, असे कवयित्रीने का म्हटले आहे?

(आ) कवयित्रीने पाखरांची कारागिरी कोणत्या शब्दांत वर्णिली आहे?



## लिहिते होऊ या.

**प्र. १. सुगरण पक्ष्यांकडून आपणांस काय शिकायला मिळते?**

**प्र. २. सुगरण पक्ष्याच्या खोप्याची रचना इतर पक्ष्यांच्या घरट्यांपेक्षा वेगळी कशी असते?**



## खेळू या शब्दांशी

**प्र. १. शब्दांचे वचन बदला.**

(अ) झोका–  (आ) बंगले–

(इ) झाड–  (ई) पाखरे–

**प्र. २. खालील शब्दांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

(अ) सुगरण (आ) झोका (इ) कारागिरी (ई) चोच



## जाणून घेऊ या.

वैशिष्ट्ये, वेगळेपण आणि लेखनशैली यांमुळे कवितेला सौंदर्य प्राप्त होते. प्रत्येक कवीच्या व कवयित्रींच्या कवितांची वैशिष्ट्ये, शैली यांत वेगळेपण असते.

**कवितेची वैशिष्ट्ये**

- गेयता (लय, ताल)
- आशयघनता
- यमकादि अलंकार
- कल्पकता
- भावनाप्रधानता
- शब्दांची योजना
- प्रतीके व प्रतिमा
- चित्रदर्शित्व
- सोपी व प्रभावी भाषा

**भाषिक शैली**

- वर्णनात्मक
- विविध बोली
- प्रासादिकता
- चरणांची मांडणी
- वृत्तांचा, अलंकारांचा उपयोग
- अक्षर संख्या
- ठरावीक अक्षर संख्या
- संवादात्मक



## विचार करा व सांगा.

- **वरील चौकटींचा अभ्यास तुम्ही केला आहेच. आता 'खोप्यामधी खोपा' या कवितेची वैशिष्ट्ये, शैली व त्यातील वेगळेपण अभ्यासा.**
  - ✻ **वैशिष्ट्ये–** निसर्ग चित्रण, उपमा अलंकाराचा वापर, गेयता व लयबद्धता, सोपे व सुबोध शब्द
  - ✻ **शैली–** वर्णनात्मक, प्रेरणादायी, भावस्पर्शी सुंदर चित्रण

  प्रस्तुत कवितेतून सुगरण पक्ष्याच्या कर्तृत्वाचे कौतुक, मानवाला मिळणारा संदेश आणि निसर्गातून शिक्षण या गोष्टींचे वेगळेपण लक्षात येते.
- **तुम्ही अभ्यासलेल्या 'प्रकाशयात्री' या कवितेची वैशिष्ट्ये, शैली व वेगळेपण तुमच्या शब्दांत सांगा.**

# जाहिरात

आजच्या स्पर्धेच्या युगात 'जाहिरात' हा महत्त्वाचा घटक आहे. एखाद्या उत्पादनाची जाहिरात करणे ही अत्यंत सर्जनशील कला आहे. ही कला आत्मसात करणे हे व्यवसायाच्या यशाचे महत्त्वाचे तंत्र आहे. असे असले, तरी जाहिरात पूर्णपणे विश्वसनीय आहे किंवा नाही यासाठी त्यात दिलेल्या सर्व बाबींची शहानिशा करणे आवश्यक असते.

सुवर्णसंधी ! सुवर्णसंधी ! सुवर्णसंधी !

**डॉ. सलीम अली पक्षी निरीक्षण मंडळ आयोजित,**

**शालेय विद्यार्थ्यांसाठी**

**पक्षी निरीक्षण सहल**

१० जानेवारीपर्यंत नोंदणी करणाऱ्यास १०% पर्यंत सवलत

मर्यादित ५० विद्यार्थ्यांसाठी

**शुल्क :** ३० रु.

**दिनांक :** १५ जानेवारी

**वेळ :** सकाळी ७ वाजता.

**ठिकाण :** पळसदेव (उजनी जलाशय परिसर)

**संपर्क : डॉ. सलीम अली पक्षी निरीक्षण मंडळ, इंदापूर**

**भ्रमणध्वनी :** ९४ x x x x x x ०५

**टीप :** सहभागी विद्यार्थ्यांनी एक वेळचा डबा, पाण्याची बाटली, टोपी, रोजनिशी/दैनंदिनी, पेन या आवश्यक गोष्टी सोबत आणाव्यात.



## आम्हांला हे समजले.

- **वरील जाहिरात वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

  (अ) सहलीचे आयोजक कोण आहेत?

  (आ) सहलीची वैशिष्ट्ये कोणती?

  (इ) सहलीसाठी वरील ठिकाणच का ठरवले असेल?

  (ई) वरील जाहिरातीत मुलांसाठी कोणती टीप देण्यात आली आहे?

- **जाहिरातीची आवश्यकता असते का? या विषयावर गटात चर्चा करा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके यांमधील जाहिरातींची कात्रणे वाचण्यासाठी उपलब्ध करून द्यावीत. जाहिरातीवर आधारित विविध प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या जाहिरातींवर आधारित गटामध्ये चर्चा घडवून आणावी.

# ८. चांदोबास पत्र



दि. २६ ऑगस्ट

प्रिय चांदोमामा,

सप्रेम नमस्कार,

मामा, तुला पत्र लिहावं असं कितीतरी दिवसांपासून मला सारखं वाटत होतं, पण जमलचं नाही. आज मात्र तुला पत्र पाठवायचंच असं ठरवून लिहायला बसले आहे.

अक्षरशः लक्षावधी किलोमीटर अंतरावरून या पत्रातून मी तुझ्याशी बोलत आहे. तू इतक्या दूर असलास ना, तरी आम्हांला नेहमी जवळच वाटत आला आहेस. पृथ्वीवरच्या आम्हां सर्व मुलांचा आवडता मामा आहेस. लहानपणी आम्ही तुझ्याजवळ टोपी मागत फिरायचो. ''आज नाही, उद्या या'', असं तू म्हणायचास, तो 'उद्या' कधी उगवलाच नाही. जेवताना तुझ्या तूपवाटीत माशी पडायची आणि तू उपाशी राहायचास. त्या वेळी आम्हांला खूप वाईट वाटायचं. निंबोणीच्या झाडाआड तू लपायचास ना, त्या वेळी तुला हुडकून काढण्यात फार मजा यायची. तू सापडलास, की आम्हांला किती आनंद व्हायचा म्हणून सांगू! आणि ए मामा, त्या निंबोणीच्या झाडाआडून किती छान दिसायचास रे तू !

पौर्णिमेच्या रात्रीचं तुझ मोहक रूप काय वर्णावं! तुझं चांदणं पृथ्वीवर पडलं, की समुद्राला भरती येते ना, त्याचप्रमाणे त्या रात्री सगळी सृष्टीच शोभायमान होते. राने-वने आनंदानं डोलू लागतात. नद्या, नाले, सरोवरं उल्हासानं खिदळू लागतात. मुलामुलींनाच नव्हे, तर इथल्या प्रत्येकाला तू मनापासून आवडतोस. सगळ्यांनाच जवळचा वाटतोस. आम्ही माणसं तुझ्या मोहात पडलोय हे काही खोटं नाही. म्हणून तर इथल्या माणसानं तुझ्यापर्यंत येण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. त्यासाठी त्यानं निरनिराळी यानं तयार केली. त्यांत बसून तो अंतराळामध्ये भिरभिर फिरला. तुझ्याकडे येण्याचा मार्ग त्यानं शोधला, आणि एक दिवस 'अपोलो' नावाच्या यानातून पोहोचलाच की तुझ्यापर्यंत! त्या यानात नील आर्मस्ट्राँग आणि एडविन ऑल्ड्रिन होते. तुला भेटले की नाही खरं सांग हं चांदोमामा, त्या वेळी तुला काय वाटलं रे? पृथ्वीची मुलं भेटली म्हणून आनंद झाला असेल ना तुला? तुझ्यावरून ते आमच्याशी बोलले. तुझी भेट झाली म्हणून त्यांना आनंद झाला होता. त्यांचं ते बोलणं ऐकलं आणि तुला भेटल्याचा आम्हांला आनंद झाला.

चांदोमामा, पृथ्वीवर देखील आनंद आहे रे. मौजच मौज आहे. मग येशील ना तू आमच्याकडे या पृथ्वीवर?



**तुझी भाची,**
**वंदना.**

## नवीन शब्द शिकू या.

**हुडकून**– शोधून. **मोहक** – मनाला मोहून टाकणारा, आकर्षक. **खिदळणे** – आनंदाने मोठ्याने हसणे. **प्रयत्नांची शिकस्त करणे** – खूप प्रयत्न करणे.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) आनंदाने डोलू लागणारी– ..........................

(आ) पत्रात उल्लेख असलेले अंतराळवीर– ..........................

(इ) चंद्रावर जाण्यासाठी वाहन– ..........................

(ई) पत्र लिहिणारी– ..........................

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

**अपोलो यानातून चंद्रावर गेलेले**

| | |
|---|---|
| | |

**प्र. ३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) चांदोमामाचे चांदणे पृथ्वीवर पडल्यावर कायकाय घडते?

(आ) मुलांना चांदोमामाचे आकर्षण का वाटते?

(इ) चांदोमामाला आनंद का झाला असेल?

**प्र. ४. योग्य उत्तरापुढे ☑ अशी खूण करा.**

**(१) नद्या, नाले, सरोवरे उल्हासाने केव्हा खिदळू लागतात?**

(अ) चंद्राचे रूप मोहक असते तेव्हा

(आ) सारी सृष्टी शोभायमान होते तेव्हा

(इ) राने–वने आनंदाने डोलू लागतात तेव्हा

(ई) पौर्णिमेचं चांदणं पृथ्वीवर पडते तेव्हा

**(२) चांदोमामाला केव्हा आनंद झाला असेल?**

(अ) अपोलो यान चंद्रावर गेल्यावर

(आ) अंतराळवीर चंद्रावरून बोललेले ऐकल्यानंतर

(इ) नील आर्मस्ट्राँग आणि एडविन ऑल्ड्रिन चंद्रावर गेल्यावर

(ई) अंतराळवीरांना आनंद झाल्यावर

## लिहिते होऊ या.

- चांदोमामा तुमच्याशी बोलू लागला अशी कल्पना करा. चांदोमामाला तुम्ही कोणते प्रश्न विचाराल त्याची प्रश्नावली तयार करा.

## खेळू या शब्दांशी

**प्र. १. पुढे दिलेल्या वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा व लिहा.**

(अ) शोभायमान होणे–

(आ) खिदळू लागणे–

(इ) मोहात पडणे–

(ई) प्रयत्नांची शिकस्त करणे –

**प्र. २. खाली दिलेल्या संदेशवहनाच्या साधनांची मराठी भाषेतील नावे लिहा.**

(अ) मोबाईल–

(आ) इंटरनेट–

## कृतीतून शिकू या.

- **प्रकल्प :** शिक्षकांच्या मदतीने ‘संदेशवहनाची प्राचीन आणि आधुनिक साधने’ या विषयासंदर्भातील विविध पुस्तके व नियतकालिके मिळवा व वाचा. वाचलेल्या माहितीचे मुद्दे वहीत नोंदवा व वर्गात त्यावर आपले मत व्यक्त करा.

## शोध घेऊ या.

**प्र. १. खालील प्रश्नांची माहिती पालक तसेच शिक्षक यांच्याकडून जाणून घ्या.**

(१) चंद्रावर प्रथम कोण व कसे पोहोचले ?

(२) चंद्रावर जाण्यासाठी मनुष्य कोणकोणते प्रयत्न करत आहे ?

(३) आपल्या देशाने आतापर्यंत किती चांद्रमोहिमा राबवल्या आहेत ?

**प्र. २. आजपर्यंत कोणकोणत्या देशांनी चांद्रमोहिमा राबवल्या याची माहिती शिक्षकांच्या मदतीने आंतरजालावरून मिळवा.**

> **शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना टपाल कार्यालयातील पोस्टकार्ड, अंतर्देशीय पत्रे यांविषयी माहिती सांगावी. पत्र व पत्रांचे महत्त्व समजावून सांगावे. पत्रांचे विविध नमुने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवून त्यावर चर्चा घडवून आणावी.



## जाणून घेऊ या.

# पत्रलेखन

स्वत:कडे असलेली माहिती, संदेश, भावना, विचार इत्यादी विशिष्ट पद्‌धतीने कागदावर लिहून दुसऱ्यास कळवण्याच्या लेखन प्रकारास **'पत्रलेखन'** म्हणतात.

पत्रलेखनाचे महत्त्व प्राचीन काळापासून आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या युगातही संदेश, आपल्या भावना, विचार व्यक्त करण्याचे **'पत्रलेखन'** हे एक महत्त्वपूर्ण साधन आहे.

पत्रलेखन विषयानुसार पत्राचे पुढील प्रकार पडतात.

**पत्रलेखन**

- **अनौपचारिक पत्र** → **(कौटुंबिक)** → (आई, वडील, आजी, आजोबा, भाऊ, बहीण, मित्र-मैत्रीण, शिक्षक अशा जिव्हाळ्याच्या व्यक्तींना पाठवले जाणारे पत्र)
- **औपचारिक पत्र** → **(कार्यालयीन व व्यावहारिक पत्र)**

## मायना

| कोणास | सुरुवात | शेवट |
|---|---|---|
| * आई/वडील | तीर्थरूप... यांना<br>सा. न. वि. वि. | तुझा/तुमचा<br>तुझी/तुमची |
| * वडील मंडळी (आजी, आजोबा, काका-काकू वगैरे) | तीर्थस्वरूप... यांना<br>सा. न. वि. वि. | आपला/आपली |
| * शिक्षकांस | गुरुवर्य... यांना<br>सा. न. वि. वि. | तुमचा आज्ञाधारक |
| * धाकटा भाऊ/बहीण | प्रिय... यास<br>अनेक आशीर्वाद | तुझा/तुझी |
| * मित्र/मैत्रीण | प्रिय मित्र/मैत्रीण...<br>सप्रेम नमस्कार... | तुझा/तुझी |
| * सन्माननीय व्यक्ती | माननीय... यांना<br>सा. न. वि. वि. | आपला/आपली<br>नम्र |

(सा.न. वि. वि. म्हणजे साष्टांग नमस्कार विनंती विशेष)

## • अनौपचारिक पत्रलेखन करताना घ्यावयाची काळजी

(१) पत्र लिहिणाऱ्याने उजवीकडे कोपऱ्यात आपले नाव, पत्ता व दिनांक लिहावा.
(२) ज्याला पत्र पाठवायचे आहे, त्यांना उद्देशून मायना लिहावा.
(३) पत्राचा मायना लिहून झाल्यानंतर पत्राला सुरुवात करावी. सुरुवात करताना 'पत्रास कारण की...' असे लिहावे.
(४) यानंतर परिच्छेदात मुख्य मजकूर लिहावा. तो लिहिताना आधी त्या व्यक्तीचे क्षेमकुशल विचारावे.
(५) आपल्या भावना, विचार व्यक्त करताना प्रभावी भाषेचा वापर करावा.
(६) नात्यातील जिव्हाळ्यानुसार विस्तृत लेखन करावे.
(७) त्यानंतर समारोप करताना 'कळावे, लोभ असावा' असे लिहावे.
(८) उजवीकडील कोपऱ्यात शेवट करावा व आपले नाव लिहावे.
(९) पुढील पाकिटावर पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता (प्रेषक) आणि ज्याला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता (प्रति) लिहावा.

### अनौपचारिक पत्र प्रारूप

पत्र लिहिणाऱ्याचे नाव
लिहिणाऱ्याचा पत्ता
दिनांक –

मायना

सुरुवात (पत्राස कारण की...)

मुख्य मजकूर
...............................................
...............................................
(जे कळवायचे आहे ते विचार/भावना)
...............................................
...............................................
शेवट (कळावे, लोभ असावा.)

शेवट
(नाव)

प्रति,
(ज्यांना पत्र पाठवायचे त्यांचा पत्ता)

तिकीट

प्रेषक :–
(पत्र लिहिणाऱ्याचा पत्ता)

• **उपक्रम :** दूर गावी असणाऱ्या आजीची खूप आठवण येत आहे. अशा वेळी आपल्या भावना आजीला कळवणारे पत्र वरील प्रारूपानुसार तयार करून लिहा.



## आपण समजून घेऊ या.

### सर्वनाम आणि त्याचे प्रकार

- **पुढील परिच्छेद वाचा. अधोरेखित नामांच्या जागी योग्य सर्वनाम वापरा.**

काल सुधाचा वाढदिवस होता. सुधाच्या सर्व मैत्रिणी वाढदिवसासाठी घरी आल्या होत्या. सुधासाठी सर्वांनी छानछान भेटवस्तू आणल्या होत्या. सुधाला सर्वांच्या भेटवस्तू आवडल्या. सुधाने सर्वांचे आभार मानले.

**नामांचा पुनरुच्चार किंवा पुनर्वापर टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या नामांच्या जागी येणाऱ्या विकारी शब्दाला 'सर्वनाम' असे म्हणतात.**

सर्वनामाचे मुख्य प्रकार पुढीलप्रमाणे– (१) पुरुषवाचक सर्वनाम (२) दर्शक सर्वनाम (३) संबंधी सर्वनाम (४) प्रश्नार्थक सर्वनाम (५) सामान्य सर्वनाम किंवा अनिश्चित सर्वनाम (६) आत्मवाचक सर्वनाम

**(१) पुरुषवाचक सर्वनाम–**

(शाळेत स्नेहसंमेलनाची तयारी सुरू होती.)

**बाई** – वैभवी, तू काय सादर करणार आहेस? गाणं की गोष्ट?
**वैभवी** – मी गाणं म्हणणार आहे.
**बाई** – आणि अमित, तू रे?
**जोसेफ** – आम्ही दोघेही गाणीच म्हणणार आहोत.
**संकेत** – आपण तिघांनीही गाणीच म्हणायची का?
**बाई** – कोण आलंय, वैभवी बघ बरं.
**जोसेफ** – बाई, परवीन आली आहे.
**बाई** – परवीन, तुला काय सादर करावयाचे आहे?
**परवीन** – तुम्ही जे सांगाल, ते मी करेन.

वरील संवादात तू, मी, आम्ही, आपण, तुला, तुम्ही ही सर्वनामे आहेत.

**पुरुषवाचक सर्वनामे**–प्रथम पुरुष, द्‌वितीय पुरुष, तृतीय पुरुष.

- **खालील आकृतीचे निरीक्षण करा.**

**प्रथम पुरुषवाचक सर्वनामे**
(स्वत:विषयी बोलताना)
मी | आम्ही | स्वत:

**द्‌वितीय पुरुषवाचक सर्वनामे**
(ज्याच्याशी बोलतो)
तू | तुम्ही | आपण

**तृतीय पुरुषवाचक सर्वनामे**
(ज्याच्याविषयी बोलतो)
तो | ती | ते | त्या

- **दिलेल्या वाक्यातील पुरुषवाचक सर्वनामाचा प्रकार ओळखून लिहा.**

(अ) तू काल शाळेत का आला नव्हतास? (आ) आपण सर्व जण पोहायला जाऊ या.

(इ) आम्ही अभ्यास करतो. (ई) मी मुंबईला जाणार आहे.

**(२) दर्शक सर्वनाम–**

- **खालील वाक्ये वाचा. अधोरेखित केलेली सर्वनामे पाहा.**

(१) ही रांगोळी कोणी काढली? (२) हे कोणाचे पुस्तक आहे?

(३) तो माझा मित्र आहे. (४) ती खुर्ची लहान आहे.

वरील वाक्यांतील ही, हे, तो, ती, ते ही दर्शक सर्वनामे आहेत. ही, हे, ह्या या शब्दांनी जवळची तर तो, ती, ते त्या शब्दांनी दूरच्या वस्तू, पदार्थ किंवा प्राणी दाखवला जातो.

**जवळची किंवा दूरची वस्तू दाखवण्यासाठी जी सर्वनामे वापरली जातात, त्यास 'दर्शक सर्वनाम' असे म्हणतात.** उदा., हा, ही, हे, तो, ती, ते

- **पुढील वाक्यात कंसातील योग्य शब्द लिहा.**

(तो, ते, हे, त्या)

(१) ........ माझे पुस्तक आहे. (२) ........ टेबलावर पेन आहे.

(३) ........ दप्तर संजयचे आहे. (४) ........ बेभान होऊन नाचू लागला.

**(३) संबंधी सर्वनामे–**

- **पुढील वाक्ये वाचा.**

(१) जो सराव करेल, तो उत्तम यश मिळवेल.

(२) जे चमकते, ते सोने नसते.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द हे संबंधी सर्वनामे आहेत.

**वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणाऱ्या सर्वनामांना 'संबंधी सर्वनामे' असे म्हणतात.** उदा., जो–जी–जे, जे–ज्या

- **खालील वाक्यांत योग्य ते दर्शक सर्वनाम वापरा. (जो, तो, जे, ते)**

(१) ........ दानशूर असतात, ........ गरिबांना मदत करतात.

(२) ........ वृक्षारोपण करतो, ........ पर्यावरणाचे रक्षण करतो.

**(४) प्रश्नार्थक सर्वनामे–**

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) खेळात कोण भाग घेणार आहे? (२) परीक्षेनंतर तू काय करणार आहेस?

(३) ही गोष्ट कोणी लिहिली आहे?

वरील उदाहरणातील कोण, काय, कोणी ही प्रश्नार्थक सर्वनामे आहेत.

**ज्या सर्वनामांचा उपयोग वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी होतो, त्यांना 'प्रश्नार्थक सर्वनामे' म्हणतात.**

- **खालील वाक्यात योग्य ती प्रश्नार्थक सर्वनामे वापरून वाक्ये पूर्ण करा.** (काय, कोणाला, कोणी)

(१) हा धडा ........ वाचता येईल?

(२) हा निबंध ........ लिहिला?

## (५) सामान्य सर्वनामे किंवा अनिश्चित सर्वनामे–

- **पुढील वाक्ये वाचा.**

(१) कोणी कोणास हसू नये. (२) तिथे कोण बसले आहे ते सांगा.

**वरील वाक्यांतील कोणी, कोणास, कोण ही सर्वनामे प्रश्न विचारण्यासाठी न येता ती कोणत्या नामाबद्दल आली आहेत हे निश्चितपणे सांगता येत नाही, तेव्हा त्यांना अनिश्चित किंवा सामान्य सर्वनामे असे म्हणतात.**

- **पुढील वाक्यात कंसातील योग्य शब्द लिहा.**

(१) या बंद पेटीत ........ आहे ते सांग. (काय, कोण)

(२) मदतीला ........ बोलवावे हे समजत नाही. (कोणाला, कशाला)

(३) त्या दुकानात ........ वाटेल ते मिळते. (काय, कोण)

## (६) आत्मवाचक सर्वनाम

- **पुढील वाक्ये वाचा.**

(१) मी स्वत: त्याला पाहिले. (२) तो आपणहून होऊन माझ्याकडे आला.

**'आपण' या सर्वनामाचा अर्थ जेव्हा 'स्वत:' असा होतो, तेव्हा ते आत्मवाचक सर्वनाम असते.**

- **पुढील वाक्यांतील आत्मवाचक सर्वनामे ओळखा.**

(१) तो स्वत:बद्दल फार कमी बोलतो. (२) आम्ही ठरवले आहे, की आपण सहलीला जाऊ.

(सर्वनामाच्या प्रत्येक प्रकाराची ५ वाक्ये पाठात शोधून लिहा.)

- **पुढील सर्वनामांचा वापर करून पाच वाक्ये तयार करा.**

(१) आपण

(२) काय

(३) ही

(४) जो, तो

(५) कोणी



## चला वाचू या.

पत्रलेखन ही एक सुंदर आणि उपयुक्त कला आहे. याच्या माध्यमातून आपण आपले विचार, भावना आणि माहिती इतरांपर्यंत पोहोचवू शकतो. पूर्वीच्या काळात पत्र हे संवादाचे महत्त्वाचे साधन होते. आजही पत्रलेखनाचे महत्त्व कमी झालेले नाही. पत्र लिहिताना योग्य रचना आणि शिष्टाचार पाळणे आवश्यक असते. पत्रात सुरुवात, मुख्य मजकूर आणि शेवट असे तीन भाग असतात. सुरुवातीला नम्र संबोधन करावे लागते. मुख्य भागात आपले विचार स्पष्ट आणि सोप्या भाषेत मांडावेत. शेवटी आभार व्यक्त करून पत्र समाप्त करावे. पत्रलेखनामुळे आपली भाषा सुधारते. विचार मांडण्याची क्षमता वाढते. यातून आपली सर्जनशीलतादेखील दिसून येते. वैयक्तिक, औपचारिक आणि अनौपचारिक असे पत्रांचे विविध प्रकार असतात. प्रत्येक प्रकारासाठी वेगवेगळी शैली वापरावी लागते. पत्र लिहिताना स्वच्छ आणि सुंदर अक्षर महत्त्वाचे असते. तसेच योग्य शब्दांची निवड करणे आवश्यक असते. पत्रलेखनामुळे नात्यांमध्ये जवळीक निर्माण होते. ही कला शिकल्याने संवाद अधिक प्रभावी होतो. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही पत्रलेखनाचे स्थान खास आहे. म्हणूनच प्रत्येकाने पत्रलेखन ही कला आत्मसात करावी.

# ९. गीत मराठी गाऊ या



- **ऐका. म्हणा. वाचा.**

प्रतिभेचे पंख लावून
सूर्य नवा होऊ या
माय मराठी लेकरांनो
गीत मराठी गाऊ या

हे विश्वची माझे घर
ज्ञाना-तुका आठवू या
बहिणाई, शांताईच्या
कवितांना साठवू या

हिमालयाच्या शिखरावरती
शब्द मराठी पेरु या
माय मराठी लेकरांनो
गीत मराठी गाऊ या

संमेलनांच्या सोहळ्यांचे
होवू या आपण वारकरी
साहित्याची पालखीही
नेऊ या आपण घरोघरी

अमृताची गोडी अजूनी
थोडी-थोडी लावू या
माय मराठी लेकरांनो
गीत मराठी गाऊ या




**प्रा. रामदास केदार** (जन्म १९७६) : प्रसिद्ध कवी, गीतकार व समीक्षक. 'बालसाहित्य वाटा आणि वळणे' हा समीक्षा ग्रंथ, 'बिनबुडाची माणसं', 'डोळ्यात दाटले पाणी', 'कपाटातले पुस्तक' हे कवितासंग्रह, 'पोखरून पडलेली माणसं', 'डांगोरी', 'बऱ्याची शाळा', 'चिमणी चिमणी खोपा दे' हे कथासंग्रह, 'पुस्तकांच्या गावाला जाऊया', ' उठ तरुणा जागा हो' हे नाट्यलेखन प्रसिद्ध. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांचा विशेष ग्रंथकार पुरस्कार व अखिल भारतीय मराठी बालकुमार संस्थेच्या शंकर सारडा पुरस्काराने सन्मानीत. ही कविता 'बैल दौलतीचा धनी' या काव्यसंग्रहातून घेण्यात आली आहे.

मराठी आपल्या महाराष्ट्राची मातृभाषा आहे. मराठी ही शौर्य, भक्ती आणि संस्कृती यांची भाषा आहे. मराठी भाषा आपल्याला माणसांशी जोडते म्हणून सर्वांनीच मराठी भाषेचा अभिमान मनामध्ये बाळगावा अशी आशा या कवितेतून कवीने व्यक्त केली आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक, सामूहिकरीत्या कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. विद्यार्थ्यांना मातृभाषेविषयी आपुलकी निर्माण होण्याच्या दृष्टीने मराठी भाषेतील शब्दांचे महत्त्व, बोलीचे महत्त्व, मराठी भाषेची थोरवी स्पष्ट करून सांगावी. कवितेच्या वैशिष्ट्यांबाबत चर्चा घडवून आणावी.

विनामूल्य वितरणासाठी

## नवीन शब्द शिकू या.

**प्रतिभा** – अलौकिक बुद्धिमत्ता, कल्पनाशक्ती. **विश्व** – जग, सृष्टी. **शिखर** – कळस. **संमेलन** – मेळावा, परिषद.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

(अ) कवितेत आलेल्या संतांची नावे → ........ , ........

(आ) कवितेत आलेल्या कवयित्रींची नावे → ........ , ........

**प्र. २. एका शब्दात उत्तर लिहा.**

(अ) गीत गाण्यासाठी आवाहन केलेली भाषा– ................

(आ) कवितेतून विश्वाला दिलेली उपमा– ................

(इ) मराठी शब्द पेरण्यासाठी सुचवलेले शिखर– ................

(ई) साहित्याची पालखी वाहणारे– ................

(उ) साहित्याची पालखी नेण्यासाठीची जागा– ................

**प्र. ३. कवितेतील खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(अ) प्रतिभेचे पंख लावून, सूर्य नवा होऊ या.

(आ) शब्द मराठी पेरु या.

**प्र. ४. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) संमेलनाच्या सोहळ्याचे आपण वारकरी व्हावे, असे कवीला का वाटते ?

(आ) मराठी भाषेचा अभिमान कवीने कोणत्या शब्दांतून व्यक्त केला आहे ?

(इ) कवीने आपल्याला ‘माय मराठी लेकरांनो’ असे का म्हटले असावे ?

**प्र. ५. या कवितेतील आलेल्या यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.**



## लिहिते होऊ या.

- **मराठी भाषा संवर्धनासाठी खाली दोन घोषवाक्ये दिलेली आहेत. त्यातील यमक जुळणारे शब्द अधोरेखित करा. या पद्धतीने आणखी तीन घोषवाक्ये तयार करा.**

उदा., (अ) माय मराठीचा करा सन्मान
वाढवा तिचा मान!

(आ) घरोघरी मराठी बोलू या,
मराठी भाषा समृद्ध करू या.

(१) ..........................................................................................

(२) ..........................................................................................

(३) ..........................................................................................



## खेळू या शब्दांशी

**प्र. १. खालील शब्दांचे प्रत्येकी दोन अर्थ लिहा.**

उदा., **पार**–पलीकडे, **पार**–झाडाभोवती बसण्यासाठी बांधलेली जागा.

(अ) कर – .............................. ..............................

(आ) हार – .............................. ..............................

(इ) जय – .............................. ..............................

(ई) मान – .............................. ..............................

(उ) ग्रह – .............................. ..............................

**प्र. २. 'लोक' शब्दाला दुसरा शब्द जोडून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

उदा., लोककथा



प्र. ३. खाली दिलेल्या सर्वनामांचा उपयोग करून वाक्ये लिहा.

(अ) तो- ..............................................................

(आ) कोण- ..............................................................

(इ) आपण- ..............................................................

(ई) आम्ही- ..............................................................

(उ) स्वत:- ..............................................................

(ऊ) कोणाचा- ..............................................................



## शोध घेऊ या.

प्र. १. मराठी भाषेचा गौरव करणाऱ्या कविता आंतरजालावरून मिळवा. तालासुरात त्याचे सादरीकरण करा.

प्र. २. 'मराठी भाषा गौरव दिन', 'मराठी राजभाषा दिन', 'अभिजात मराठी भाषा दिन' यांविषयी शिक्षकांकडून अधिक माहिती मिळवा.



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** तुम्हांला माहीत असलेले वाक्प्रचार, म्हणी व सुविचार यांपासून वेगवेगळ्या प्रकारांची शब्दकोडी तयार करा व सोडवा.

## ओळखा पाहू.

(अ) अंगावर माझ्या काटे, आतून मी गोड, कोकणात मी वाढतो, चवीला नाही तोड- [ ]

(आ) पोटात माझ्या खूप ज्ञान, वाचले की मिळतो मान- [ ]

(इ) राहते मी नकाशाच्या कोपऱ्यात, पण माझ्यामुळे तुम्हांला दिशा समजतात- [ ]

(ई) डोंगरदऱ्यातून मी खाली जोरात पडतो, पांढराशुभ्र फेस, जणू ढगच खाली उतरतो- [ ]



## चला वाचू या.

### साहित्यविषयक संकल्प

- मी वर्षभरात किमान दहा अवांतर पुस्तकांचे वाचन करेन.
- मी बचत केलेल्या पैशांतून दरवर्षी किमान एक पुस्तक खरेदी करेन.
- वाचलेल्या साहित्यावर वर्षभरात किमान पाच लेखकांना पत्ररूपाने प्रतिसाद देईन.
- वाचन वही तयार करून वाचलेल्या पुस्तकांविषयी त्यामध्ये मुद्दे लिहून ठेवेन. (आवडलेला भाग, ओळी, कथानक)

- **खालील उतारा वाचा.**

### मराठी : अभिजात भाषा

मराठी ही भारतातील एक समृद्ध आणि प्राचीन भाषा आहे. तिचा सांस्कृतिक वारसा, व्याकरण आणि साहित्यपरंपरा अत्यंत समृद्ध आहे. म्हणूनच भारत सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा दिलेला आहे.

- **अभिजात भाषा म्हणजे अशी भाषा–**

  * ज्या भाषेचा इतिहास खूप जुना म्हणजे दीड हजार ते अडीच हजार वर्षे आहे.
  * ज्या भाषेत प्राचीन आणि मौलिक साहित्य उपलब्ध आहे.
  * ज्या भाषेचा सांस्कृतिक आणि भाषिक वारसा समृद्ध आहे.

मराठी भाषेचा इतिहास दोन हजार वर्षांपेक्षाही जुना असून प्राचीन शिलालेखांवर आणि ग्रंथांमध्ये मराठी भाषेचे पुरावे आढळतात. संतसाहित्यामुळे मराठी भाषा समृद्ध झाली असून त्यात विपुल प्रमाणात काव्य, कथा, कादंबऱ्या आणि नाटके यांची भर पडलेली आहे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे भाषेच्या अभ्यासासाठी संशोधन केंद्रे सुरू होतात. प्राचीन साहित्याचे जतन आणि संशोधन यांसाठी मदत मिळते. तसेच जागतिक स्तरावर भाषेचा गौरव वाढतो.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणे ही आपणा सर्वांसाठी अभिमानाची व गौरवाची बाब आहे. मराठीसह तमिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगु, मल्याळम, ओडिया, पाली, प्राकृत, आसामी व बंगाली या 'अभिजात' भाषा आहेत.

- **मराठी साहित्यिक आणि त्यांची टोपणनावे वाचा व लक्षात ठेवा.**

| | |
|---|---|
| **(१) केशवसुत** | कृष्णाजी केशव दामले |
| **(२) कुसुमाग्रज** | विष्णू वामन शिरवाडकर |
| **(३) गोविंदाग्रज** | राम गणेश गडकरी |
| **(४) बी** | नारायण मुरलीधर गुप्ते |
| **(५) बालकवी** | त्र्यंबक बापूजी ठोमरे |
| **(६) केशवकुमार** | प्रल्हाद केशव अत्रे |
| **(७) ग्रेस** | माणिक सिताराम गोडघाटे |
| **(८) माधव जूलियन** | माधव त्र्यंबक पटवर्धन |

| | |
|---|---|
| **(९) आरती प्रभू** | चिंतामण त्र्यंबक खानोलकर |
| **(१०) अनिल** | आत्माराम रावजी देशपांडे |
| **(११) दिवाकर** | शंकर काशिनाथ गर्गे |
| **(१२) लोकहितवादी** | गोपाळ हरी देशमुख |
| **(१३) बाया कर्वे** | आनंदीबाई धोंडो कर्वे |
| **(१४) विंदा करंदीकर** | गोविंद विनायक करंदीकर |
| **(१४) विभावरी शिरूरकर** | मालतीबाई बेडेकर |
| **(१५) गदिमा** | गजानन दिगंबर माडगूळकर |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वरील उताऱ्याचे वाचन करून घ्यावे. मराठी भाषा, साहित्यविषयक संकल्प, मराठी साहित्यिकांची नावे व त्यांच्याविषयीची माहिती या संदर्भाने अधिकची माहिती द्यावी. तसेच या मुद्द्यांच्या आधारे विविध प्रश्न विचारून बोलते करावे. मराठी साहित्यिकांची पुस्तके वाचनासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे.

# १०. लोकनृत्ये

**डॉ. सरोजिनी बाबर** (१९२०-२००८) : लोककला, लोकसंस्कृती या विषयांवर लेखन करणाऱ्या प्रसिद्ध लेखिका. त्यांनी दुर्मीळ आणि अप्रकाशित लोकसाहित्य 'लोकसाहित्य शब्दकोश' आणि 'भाषा संस्कृती' या पुस्तकांमधून प्रकाशित केले. हा पाठ बालभारती जुन्या मालेतून घेण्यात आला आहे.

समृद्ध सांस्कृतिक परंपरा असलेल्या आपल्या देशात नृत्य, नाट्य, शिल्पकला आदींचा समृद्ध वारसा जतन केला जात आहे. या सांस्कृतिक वारशाचे ज्ञान मुलांना व्हावे; यासाठी भारतातील विविध प्रांतातील लोकनृत्ये, वेशभूषा, वाद्यांचे प्रकार आदींची माहिती या पाठामध्ये दिली आहे. विविधतेत असलेली एकता यामधून दिसून येते. सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन घडवण्याचा संस्कारही यामधून करता येईल.

खेड्यातील सर्वसामान्य माणसे शेतीच्या कामातून फावला वेळ मिळाला, की एकत्र येतात. एकमेकांशी आनंदाने गोष्टी करत बसतात. कधी गाणी गातात, कधी नृत्यदेखील करतात. अशा वेळी मोकळ्या मनाने ती एकमेकांत मिसळतात, एका विचाराने वागतात. आपल्या वाडवडिलांनी दिलेली शिकवण लक्षात आणतात. आपल्या चालीरितीप्रमाणे पोशाख करतात. एका सुरात गाऊ लागतात. एका तालात नाचू लागतात. मग कशाचा भेदभाव राहत नाही. वयाचे बंधन उरत नाही. लोकांच्या सामुदायिक नृत्याला 'लोकनृत्ये' असे म्हणतात. सर्वसामान्य लोकांच्या अंगातील गुणांचे प्रकटीकरण या नृत्यकलेतून होते.

माणूस नाचू लागला म्हणजे त्याला स्वतःचे भान राहत नाही. तो बेभान होऊन नाचू लागतो, इतर त्याला साथ देत राहतात. त्याच्या बरोबर ईर्षेने, उमेदीने नाचू लागतात. अशा वेळी बघण्याजोगा देखावा असतो. माणूस वाऱ्यासारखा हालताना पाहिला म्हणजे अचंबा वाटू लागतो. धरणीवर पाय न ठेवता त्याची पावले हालू लागली म्हणजे बघणाऱ्यांची तहानभूक हरपते आणि त्या हालचालींच्या जोडीला कुणी वाद्य वाजवू लागला म्हणजे वाजणारे वाद्य ठेका देत आहे, की पायात बांधलेली घुंगरे ठेका देत आहेत, हे लक्षात येत नाही.

लोकनृत्याच्या वेळी मृदंग, ढोल, ताशा, हलगी, खंजिरी, घडा, झांजा, टाळ, टिपऱ्या, घुंगरू, डफ अशी अनेक प्रकारांची वाद्ये वाजत असतात. त्यांच्या आवाजांनी सारे गाव घुमू लागते. तसेच या वाद्यांच्या जोडीला वाजणाऱ्या एकतारीने, मुरलीने, सनईने अगर सारंगीने सूर धरला म्हणजे माणूस डोलायला लागतो. गुणगुणू लागतो. समोरच्या प्रसंगाशी एकजीव होऊन जातो.



महाराष्ट्रात 'दिंडी-नृत्य' वारकरी मंडळ करत असतात. मृदुंग, वीणा, टाळ अशा वाद्यांच्या साथीवर वारकरी लोक अतिशय एकचित्ताने भजन करत नाचत असतात. नाचतनाचत रस्त्याने देखील जात असतात. अभंग म्हणताना ही मंडळी एकदा डावीकडे व एकदा उजवीकडे वळून मोठ्या ढंगदार रीतीने नाचत असतात. त्या तालावर टाळ्या वाजवत नाचू लागतात, हे विशेष होय !

गुजरातमधील 'रास–नृत्य' सुप्रसिद्ध आहे. अंगात पिवळ्या रंगाचा चुणीदार अंगरखा, पायात तंग चुडीदार पायजमा, कमरेला तांबडा शेला, डोक्यावर तांबडी टोपी आणि हातात टाळ अगर टिपऱ्या घेऊन गुजराती लोक हा नाच करतात. अशा वेळी एकदोघे जण मध्ये झांज, एकतारी व मुरली वाजवत उभे राहतात. बाकीचे अनेक जण त्यांच्याभोवती वर्तुळात फिरत नाचत राहतात. या वेळच्या टिपऱ्यांचा नाच पाहण्यासारखा असतो.



पंजाबमधील 'भांगडा–नृत्य' विशेष प्रेक्षणीय असते. या नृत्यासाठी येथील लोक भडक रंगांचे कपडे वापरतात. तांबड्या, हिरव्या, निळ्या, पिवळ्या अशा रंगांचे पंचे कंबरेभोवती बांधून, अंगात पांढरे अंगरखे व त्यावर रंगीत जरीची जाकिटे घालून आणि डोक्यावर रंगीत रुमाल बांधून हे लोक नाच करतात. अशा वेळी ते चिमट्याप्रमाणे दिसणाऱ्या लोखंडी वाद्याचा व ढोलाचा उपयोग करत असतात.



छत्तीसगडमधील बस्तर भागातील माडिया जमातीच्या शेतकऱ्यांचे लोकनृत्य मोठे गमतीदार असते. येथील लोक डोक्यावर उंच अशी पिसांचीही शिडे खोवतात. त्याखाली बैलांची शिंगे लावतात आणि कपाळावर माळा बांधून, हातात खूप लांबीचे मृदंग घेऊन नाच करतात. हे लोक पेरणीच्या वेळी आणि सणासुदीच्या वेळी नाच करत असतात.



बिहारमधील आदिवासींच्या नृत्याचा थाट काही वेगळाच असतो. स्त्रिया परकरासारखा एक लेहंगा नेसतात. गळ्यात चांदीचे जड दागिने घालतात. पुरुष आखूड धोतर नेसून कंबरेला एक कापड बांधतात व त्याचा सोग्यासारखा पट्टा पुढे सोडतात. डोक्याला रंगीत फडके बांधून त्यात पिसे खोवतात व ढोलके वाजवतात. त्याच्या तालावर स्त्रिया नाचतात. हा नाच फार बघण्यासारखा असतो.



स्त्रियांची लोकनृत्ये वेगळी, पुरुषांची वेगळी, स्त्री-पुरुषांची एकत्र अशी लोकनृत्ये आणखी वेगळी. शिवाय गावोगावची, प्रांताप्रांतांची, देशादेशांची पद्धत निराळी. प्रत्येकाचे म्हणून वेगळे असे वैशिष्ट्य ही लोकनृत्ये दाखवत असतात. लोकनृत्यांचे असे अनेक प्रकार आहेत.

पुरुषांच्या नाचाप्रमाणेच अखिल भारतात प्रसिद्ध असलेल्या स्त्रियांची फुगडी, झिम्मा हा नाच सर्वत्र लोकप्रिय आहे. गुजरातमधील स्त्रियांचा गरबा, महाराष्ट्रातील स्त्रियांचा फेर, हिमाचल प्रदेशातील स्त्रियांचा पांगी हे नाच अतिशय आकर्षक असतात. त्याचप्रमाणे दक्षिण भारतातील गोफनृत्य आणि आसामातील बांबूनृत्य पाहण्यासारखे असते.

आपला भारत देश हा विस्ताराने जेवढा मोठा आहे, तेवढाच तो लोकनृत्यांच्या दृष्टीनेही श्रीमंत आहे, वैशिष्ट्यपूर्ण आहे.

## नवीन शब्द शिकू या.

**फावला** – रिकामा. **सामुदायिक** – सामूहिक. **ईर्षा** – हेवा, मत्सर, द्वेष. **उमेद** – उत्साह. **अचंबा** – आश्चर्य, नवल. **ठेका** – ताल. **ढंगदार** – व्यवस्थित, शिस्तबद्ध. **पंचा** – एक प्रकारचे वस्त्र. **शिडे** – तुरे. **थाट** – रुबाब. **अखिल** – संपूर्ण.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**प्र. २. तुलना करा.**

| माडिया जमातीच्या लोकांचे शेतकरी नृत्य | बिहारमधील आदिवासी नृत्य |
|---|---|
| | |

**प्र. ३. पुढील लोकनृत्यांचे थोडक्यात वर्णन करा.**

(अ) रास नृत्य–

(आ) भांगडा नृत्य–

(इ) दिंडी नृत्य–

**प्र. ४. तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) महाराष्ट्रातील 'दिंडी–नृत्य' व गुजरातमधील 'रास–नृत्य' यांची वैशिष्ट्ये लिहा.

(आ) छत्तीसगडमधील बस्तर भागातील माडिया जमातीच्या शेतकऱ्यांच्या लोकनृत्याचे वर्णन करा.

(इ) लोकनृत्यातून कोणकोणत्या गोष्टी शिकायला मिळतात?

(ई) भारत देश लोकनृत्याच्या दृष्टीने श्रीमंत आहे, असे लेखिकेने का म्हटले?

**प्र. ५. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लोकनृत्याचे प्रकार सांगा.

(आ) लोकनृत्याच्या वेळी कोणकोणती वाद्ये वाजवली जातात?

(इ) भांगडा नृत्य प्रेक्षणीय का वाटते?

**प्र. ६. पुढील शब्दांवरून लोकनृत्यप्रकार ओळखा.**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | मृदंग–वीणा | अभंग | → ...................... |
| (आ) | तांबडा रुमाल | टिपऱ्या | → ...................... |
| (इ) | रंगीत रुमाल | रंगीत पंचे | → ...................... |
| (ई) | बैलांची शिंगे | कवड्यांच्या माळा | → ...................... |



## विचार करा व सांगा.

**प्र. १. सण–उत्सव साजरे केल्याने आपल्या जीवनात कोणते सकारात्मक बदल घडतात ते सांगा.**

**प्र. २. सणांमुळे आपल्या संस्कृतीचे जतन कसे होते याबाबत विचार व्यक्त करा.**



## चर्चा करू या.

**प्र. १. महाराष्ट्रातील पंढरपूरची वारी व परंपरा यांबद्दल घरातील मोठ्या व्यक्तींशी चर्चा करा व माहिती मिळवा.**

**प्र. २. खालील विषयांबाबत मित्रमैत्रिणींबरोबर चर्चा करा व माहिती लिहा.**

(१) तुमच्या घरात व परिसरात साजरे केले जाणारे सण व उत्सव

(२) सणांचे व उत्सवांचे बदललेले स्वरूप

## खेळू या शब्दांशी

**प्र. १. समानार्थी शब्द लिहा.**

(अ) आनंद-  (आ) धरणी-

(इ) वारा-  (ई) पाय-

**प्र. २. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

(अ) अचंबा वाटणे-

(आ) तहानभूक हरपणे-

(इ) एकजीव होणे-

## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** (१) तुमच्या शाळेतील कलासंचात लोकनृत्यांचे सादरीकरण करा.
(२) तुमच्या परिसरातील विविध लोकगीतांचे पारंपरिक वाद्यांच्या साथसंगतीत सादरीकरण करा.
(३) लोकसाहित्याच्या प्रकारांविषयी माहिती मिळवून त्या संदर्भाने माहितीचे सादरीकरण गटात करा.

## शोध घेऊ या.

**प्र. १. आसाम राज्यात 'बिहू' सणाच्या वेळी बिहू-नृत्य सादर केले जाते. आंतरजालाचा वापर करून याविषयी अधिक माहिती मिळवा. या सणाविषयी वर्गात चर्चा करा व ही माहिती वहीत लिहा.**

**प्र. २. तुम्ही पाहिलेली तालवाद्ये व सूरवाद्ये यांची सचित्र माहिती आंतरजालाचा वापर करून मिळवा.**

## चला वाचू या.

लोकसाहित्य हे प्रामुख्याने मौखिक परंपरेतून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचवले जाते. बहुतांशी याचे लेखक अज्ञात असतात. लोकसाहित्याची नाळ बोली भाषेशी जोडलेली असते. विशिष्ट ताल, ठेक्यात ते सादर केले जाते. बरेचदा यातून सणावारांचे, प्रथा-परंपरांचे, कृषिपरंपरेतील उत्सवांचे वर्णन आढळते. लोकसाहित्य म्हणजे आपल्या मातीचा सुगंध, त्याला जपले पाहिजे व अनुभवले पाहिजे.

- **लोककथा व उतारे-** यात राजा-राणीच्या, प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या गोष्टींद्वारे मनोरंजन तर होतेच आणि चांगले संस्कारही होतात.
- **लोककाव्य-** निसर्ग, पाऊस, शेती इत्यादींवर आधारित नादयुक्त व लययुक्त काव्यरचना असते.
- **ओव्या-** जात्यावर दळण दळताना स्त्रिया ओव्या गातात. त्यात प्रेमाचा, मायेचा ओलावा असतो.
- **गौळण-** यात विशेषत: श्रीकृष्णाच्या बाललीला आणि गोकुळातील वातावरणाचे वर्णन असते.
- **भारूड-** मनोरंजनातून समाजप्रबोधन करणाऱ्या भारुडात विनोदी ढब आणि सोंगे असतात.
- **भोंडल्याची गाणी-** भोंडला (हादगा) हा महाराष्ट्रात नवरात्रीत मुली-मुलांकडून खेळला जाणारा पारंपरिक खेळ आहे. हस्त नक्षत्राचा पाऊस चांगला पडावा यासाठी यात प्रार्थना केली जाते. हत्तीचे चित्र/मूर्ती मध्यभागी ठेवून त्याभोवती भोंडल्याची लोकप्रिय गीते गात फेर धरला जातो.

विनामूल्य वितरणासाठी



## आपण समजून घेऊ या.

### विशेषण व त्याचे प्रकार

- **पुढील शब्दसमूह वाचा.**

**हिरवी** राने, **स्वच्छ** शहर, **पाच** खंड, **खूप** लोक, **आमची** शाळा, **सुगंधी** फुले, **कोणता** पेढा, **माझी** वही, **गुणी** मुले

वरील शब्दसमूहांचे आपण निरीक्षण केले तर 'हिरवी', 'स्वच्छ', 'पाच', 'खूप', 'आमची', 'सुगंधी', 'कोणता', 'माझी', 'गुणी' हे शब्द त्यांच्यापुढे येणाऱ्या नामांविषयी विशेष माहिती सांगतात.

या शब्दसमूहात **'हिरवी'** हे **'राने'** या नामाचे विशेषण आहे, तर 'राने' हे नाम दिलेल्या विशेषणाचे विशेष्य आहे.

**विशेषण :** नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला **'विशेषण'** असे म्हणतात.

**विशेष्य :** ज्या नामाबद्दल विशेषण अधिक माहिती सांगते, त्या नामाला **'विशेष्य'** असे म्हणतात.

| विशेषण | विशेष्य |
|---|---|
| हिरवी | राने |
| स्वच्छ | शहर |
| पाच | खंड |
| खूप | लोक |
| आमची | शाळा |

**विशेषणांचे प्रकार**

गुणवाचक विशेषण — संख्यावाचक विशेषण — सार्वनामिक विशेषण

- **पुढील शब्दसमूह वाचा.**

**शूर** सरदार, **शुभ्र** ससा, **आंबट** बोरे, **उंच** इमारत, **निळे** आभाळ, **भव्य** वाडा

वरील ठळक अक्षरांतील विशेषणांचे निरीक्षण केले असता ही विशेषणे नामांचे रंग, रूप, आकार, चव इत्यादी गुण किंवा विशेष सांगतात.

**नामाचा गुण किंवा विशेष सांगणाऱ्या विशेषणांना 'गुणवाचक विशेषणे' असे म्हणतात.**

- **खालील वाक्यांमध्ये कंसात दिलेली गुणवाचक विशेषणे योग्य स्थानी लिहा.**

(रेखीव, निळासावळा, प्रचंड, गोड)

(१) समुद्रात ........................ लाटा असतात.

(२) रिया ........................ चित्र काढते.

(३) नागपूरची संत्री ........................ असतात.

(४) ........................ झरा वाहतो बेटाबेटांतून.

- **पुढील चित्राचे निरीक्षण करा आणि उत्तरे लिहा.**



(१) बाजूच्या चित्रात किती वर्तुळे आहेत?

(२) वरच्या रांगेत किती वर्तुळे आहेत?

(३) खालच्या रांगेत किती वर्तुळे आहेत?

(४) पांढरा रंग या पार्श्वभूमीवर थोडा आहे की खूप?

वरील प्रश्नांच्या उत्तरांचा विचार केलात तर पाच, तीन, दोन, थोडा, खूप अशी उत्तरे आपल्याला आढळतील. अशा संख्यावाचक शब्दांना संख्यावाचक विशेषणाच्या रूपात ओळखले जाते.

**नामांची संख्या, प्रमाण दर्शवणाऱ्या विशेषणांना 'संख्यावाचक विशेषणे' म्हणतात.**

- **पुढील कंसात दिलेली संख्यावाचक विशेषणे योग्य ठिकाणी वाक्यांत लिहा.**
**(सहस्र, एकेक, अल्प, चौपट)**

(१) मला ........................ दरात भाजी मिळाली.

(२) सूर्याच्या ........................ किरणांनी जमिनीला स्पर्श केला.

(३) तो शाळेची ........................ पायरी चढला.

(४) ते क्रीडांगण आमच्या शाळेच्या क्रीडांगणापेक्षा ........................ आहे.

- **पुढील शब्दसूमह वाचा.**

**माझी** वही, **त्याचे** पत्र, **कोणता** पेढा, **आम्ही** मैत्रिणी

वरील शब्दसमूहांतील माझी, त्याचे, कोणता, आम्ही ही सर्वनामे आहेत; पण या सर्वनामांपुढे नामे आली आहेत. ही सर्वनामे त्यांच्यापुढे आलेल्या नामांबद्दल विशेष माहिती सांगतात म्हणजे ती विशेषणाचे कार्य करतात. ही सर्वनामे सार्वनामिक विशेषणाच्या रूपात ओळखली जातात.

**सर्वनामांपासून बनलेल्या अशा विशेषणांना सार्वनामिक विशेषणे किंवा सर्वनामसाधित विशेषणे म्हणतात.**

| सर्वनाम | सार्वनामिक विशेषणे |
|---|---|
| मी | माझा, माझी, माझे |
| तू | तुझा, तुझी, तुझे |
| तो | त्याचा, त्याची, त्याचे |
| ती | तिचा, तिची, तिचे |
| आम्ही | आमचा, आमची, आमचे |
| तुम्ही | तुमचा, तुमची, तुमचे |
| हा | असा, असला, इतका, एवढा, अमका |
| तो | तसा, तसला, तितका, तेवढा, तमका |
| जो | जसा, जसला, जितका, जेवढा |
| कोण | कोणता, केवढा |
| काय | कसा, कसला |

- **चौकटीतील योग्य सार्वनामिक विशेषण वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(जसा, तेवढे, जेवढा, तुमची)

(१) मला वाटते, ''...................... कचरा जास्त, तेवढे प्रदूषण जास्त.''

(२) ...................... मुलगी खूप हुशार आहे.

(३) ...................... अंगरखा तशीच टोपी घाला.

(४) मिळेल ...................... स्वातंत्र्य प्रत्येकाला हवेच असते.

- **खालील वाक्यांतील विशेषणांचे प्रकार ओळखून लिहा.**

(१) समिधा अंगणात रेखीव रांगोळी काढते.

(२) महागाईमुळे वस्तूंच्या किमती चौपट झाल्या आहेत.

(३) हे कोणते गाव आहे ?

(४) माझे पुस्तक सापडले आहे.

(५) मैदानात दहा मुले खेळत आहेत.

(६) पावसाळ्यात जंगल हिरवेगार दिसते.



## जाणून घेऊ या.

| कवी/कवयित्री | काव्यसंग्रह |
|---|---|
| (१) महदंबा | महदंबेचे धवळे |
| (२) संत मुक्ताबाई | ताटीचे अभंग |
| (३) बा. सी. मर्ढेकर | शिशिरागम |
| (४) कुसुमाग्रज | विशाखा |
| (५) पद्मा गोळे | आकाशवेडी |
| (६) इंदिरा संत | मृगजळ |
| (७) विंदा करंदीकर | स्वेदगंगा |
| (८) शांता शेळके | वर्षा |
| (९) मंगेश पाडगावकर | जिप्सी |
| (१०) ग. दि. माडगूळकर | चैत्रबन |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विशेषण व विशेषणांचे प्रकार यांची माहिती विविध उदाहरणांद्वारे करून द्यावी. तसेच वाक्यांतील विशेषण व विशेषणांचे प्रकार ओळखण्याचा जास्तीतजास्त सराव करून घ्यावा. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या विविध कृती करून घ्याव्यात. विद्यार्थ्यांना मराठीतील कवी व कवयित्री यांच्या विविध काव्यसंग्रहांविषयीची माहिती मिळवण्यासाठी व वाचनासाठी प्रोत्साहन द्यावे.

# ११. भल्लगडी दादा

- **ऐका. म्हणा. वाचा.**

हे आली रे आली, आली रे आली
सुगी आलीऽऽऽ
मेघराजानं किरपा केली रं
हे भल्लगडी दादा, भल्ल म्हण दादा ।। धृ.।।

काळ्या मातीला हिरवा सुगंध
या गंधात सारेच धुंद
नवनवतीचा साज हा ल्याली रे ।। १ ।।

नटलं घरदार शिवार सारं
खेळ अंगणी सळसळतं वारं
बहुआनंदाने धरती न्हाली रे ।। २ ।।

दोन हाताची किमया ही सारी
साथीला बैलं माझे खिल्लारी
केली दैवाने दौलत हवाली रे ।। ३ ।।

काय कमतरता कोणाला आज
धनी आम्हीच आमचं हे राजं
सान थोरांची चंगळ उडाली रे ।। ४ ।।



**शाहीर कुंदन कांबळे** (१९४७-२०१७) : प्रसिद्‌ध लोककवी, गीतकार आणि आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ शाहीर. त्यांनी अनेक लोकप्रिय कोळीगीते, भीमगीते आणि लोकगीते लिहिली आहेत. त्यांचे 'शाहिरी मेवा' हे पुस्तक विशेष प्रसिद्‌ध आहे. ही कविता 'गीतपुष्पांचा फुलोरा' या संकलित काव्यसंग्रहातून घेण्यात आली आहे.

शेतकऱ्यांसाठी सुगीचे दिवस म्हणजे अत्यंत आनंदाचे दिवस असतात. अशा सुगीच्या दिवसातील शेतकऱ्याच्या मनात उमटणाऱ्या विविध भावभावनांचे वर्णन प्रस्तुत कवितेत कवीने केले आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक, सामूहिकरीत्या कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. सुगीच्या दिवसात वातावरणात होणाऱ्या विविध बदलांविषयी, शेतीविषयी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून बोलते करावे. कवितेच्या वैशिष्ट्यांविषयी व शैलीविषयी चर्चा घडवून आणावी.

## नवीन शब्द शिकू या.

**सुगी –** शेतातील पिके काढण्याचा हंगाम. **किरपा –** कृपा. **ल्याले –** धारण केले. **शिवार –** शेत. **किमया –** जादू. **दौलत –** संपत्ती. **चंगळ –** मजा.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून काढा व लिहा.**

(अ) शेतातील पिके काढण्याचा हंगाम सुरू झाला.

(आ) पावसाने कृपा केली.

(इ) ही सगळी कष्टाची जादू आहे.

**प्र. २. कवितेत पुढील शब्दांचे वर्णन करणारे कोणते शब्द आले आहेत ते शोधा व लिहा.**

(अ) माती–

(आ) सुगंध–

(इ) घरदार–

(ई) धरती–

**प्र. ३. चौकटी पूर्ण करा.**

(अ) शेतकऱ्यासाठी कवितेत वापरलेला शब्द–

(आ) अंगणात खेळणारा, सळसळणारा–

(इ) बैलाची विशिष्ट जात–

(ई) शेतकऱ्यांसाठी आनंदाचे दिवस–

**प्र. ४. कवितेतील खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(अ) 'दोन हाताची किमया ही सारी'

(आ) 'धनी आम्हीच आमचं हे राजं'

## विचार करा व सांगा.

**प्र. १. 'पाऊस पडला नाही, तर काय होईल?' याबाबत विचार करा, गटात चर्चा करा व लिहा.**

**प्र. २. शेतकऱ्यांसाठी सुगीचे दिवस महत्त्वाचे का असतात?**

## खेळू या शब्दांशी

**प्र. १. कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधा व लिहा.**

(अ) सुगंध-  (आ) ल्याली-

(इ) सारं-  (ई) सारी-

**प्र. २. विरुद्धार्थी शब्द कवितेतून शोधून लिहा.**

(अ) दुर्गंध × ......................

(आ) दु:ख × ......................

(इ) अवकृपा × ......................

**प्र. ३. शब्दसाखळी पूर्ण करा.**

(अ) शेत→ त ................ ................ ................ ................

**प्र. ४. खालील ओळीतील अलंकार ओळखा.**

(अ) काळ्या मातीला हिरवा सुगंध, या गंधात सारेच धुंद

(आ) काय कमतरता कोणाला आज

(इ) दोन हाताची किमया सारी, साथीला बैल माझे खिल्लारी

(ई) हे आली रे आली, आली रे आली, सुगी आली.

## चर्चा करू या.

- **'भारत हा शेतीप्रधान देश आहे', याविषयी वर्गात मित्रमैत्रिणींसोबत चर्चा करा.**

## लिहिते होऊ या.

- **शेती आणि पाऊस यातील परस्परसंबंध आई, वडील व शिक्षक यांच्याकडून समजून घेऊन या विषयावर आधारित दहा ओळींचा परिच्छेद लिहा.**

## जाणून घेऊ या.

- **शिक्षकांच्या मदतीने आंतरजालाचा वापर करून लोकगीतांचा संग्रह करा आणि वाचा.**

## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** शाळेमधील सांस्कृतिक कार्यक्रमांच्या प्रसंगी मराठी लोकगीतांचे सादरीकरण करा.

## ओळख बोलींची

जी बोलली जाते, ती **'बोली'**. एखाद्या विशिष्ट प्रदेशात, समाजात किंवा समूहामध्ये आपले एक स्वतंत्र रूप घेऊन बोली बोलली जाते. ती प्रमाण भाषेपेक्षा वेगळी असते. तिला लिपी नसते, म्हणजेच तिला लेखी स्वरूप नसते. त्या त्या स्थानानुसार शब्द व उच्चारांसह ती बोलली जाते म्हणून 'दहा कोसांवर भाषा बदलते' असे म्हटले जाते.

प्रत्येक प्रदेशाचे भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक व आध्यात्मिक स्वरूप वेगवेगळे असते. त्यामुळे बोली भाषांमध्ये विविधता आढळून येते. बोलण्याची शैली, आवाजातील चढउतार, लय आणि पूर्वजांकडून आलेले विशिष्ट शब्द व बोलण्याची लकब यांमुळे बोलींचे वेगळेपण दिसून येते. प्रत्येक बोली ही शुद्ध असते. तिला तिचे स्वतंत्र रूप असते, मान असतो म्हणून प्रत्येक बोलीचा सन्मान करणे आपले कर्तव्य आहे.

कालपरत्वे बोली आणि त्यातील शब्द लुप्त होत आहेत. त्यामुळे बोलीतील शब्द, संस्कृती जपणे आणि टिकवणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

### (१) मालवणी बोली

कोनच गावात रवना नाय जो तो मुंबयक पळता. माका शेतीची सगळी कामा यतत. कवाळ लावाक यता. उकळ, बेर करूक यता. नांगरूक यता. पेरूक यता. गुट्ट्यावर बसाक तर मजा यता. गुटो फिरवलो काय जमीन कशी सपाट होता. पावस पडता. सगळ्याभर मातयेचो वास पसारता. मगे भात रुजता. हिरयोगार तरवो वाऱ्यार हलता, तेवा झुळझुळीत दिसता. तरवो काडूची आयेची नि माझी स्पर्धा लागता. तुझे किती पेंडका? माझे किती पेंडका? भात लावक यता. मग यक काडी आसांदे नायतर मसुरा. सगळ्याभर यकसारख्या लायनीत लावतंय मी भात. नडाचा आसला तरी मी आयेबरोबर जातय. तशी आये नि मीच शेतात मरतव. बाबा जॉत धरूक, कापनेक आनि मळनेवागता आसतत. मी पन काय शनवार रविवार सुटीचो दिवस आनि शाळेत जावच्या आदी आनि शाळेतसून इल्यार. लावनेवागता मी दांडी मारतंय सरळ. पाच सा दिवस! हाली गावात पावर टीलर इले हत, तेच्यामुळे चिकल पटकन व्हता. कापनेवागता दिवाळेची सुटी आसली तर मजाच. भात कापून यवस्थित सुकत घालूचा कामपन आपल्याक जमता. भात झोडण्यात तर आपण पटायत. हा फक्त हुडया, तनस डाळूक आपल्याक यत नाय. मळणेवागता न्हान आसताना माका याकच काम व्हता. सुपली घेवन बैलांच्या पाटसून फिरायचा. नायतर शेनाचो थापो मळनेतल्या गवतार पडतलो. आता मी सुपली धरूचा काम करीत नाय. आता मी मळनी हाकवतंय. मळनी घालताना खळ्यावर लय भारी वाटता.

**कल्पना मलये** (१९७५) **:** कवयित्री, कथा लेखिका आणि बालसाहित्यिक. 'कारटो' ही मालवणी भाषेत लिहिलेली अत्यंत लोकप्रिय बालकादंबरी प्रसिद्ध. मालवणी भाषेतील ही पहिलीच बालकादंबरी मानली जाते. 'समज-उमज' हा कोकणातील उदयोन्मुख कवयित्री म्हणून ओळख निर्माण करून देणारा काव्यसंग्रह आहे. 'अक्षरदोस्ती', 'सई', 'लिओ', 'गोष्टी खेळाडूंच्या' हे बालसाहित्य प्रसिद्ध. या काव्यसंग्रहाला राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा मालवणी बोलीतील उतारा 'कारटो' या बालकादंबरीतून घेण्यात आला आहे.

**रवना नाय** – राहत नाही. **माका** – मला. **पावस** – पाऊस. **मातयेचो** – मातीचा. **वाऱ्यार** – वाऱ्यावर. **यक** – एक. **आसांदे** – असू दे. **मसुरा** – भाताची एक जात. **नडाचा** – खुरपायचे. **जॉत** – नांगर. **मळनेवागता** – मळणीच्या वेळी. **हत** – आहेत. **तनस** – गवताची गंजी. **न्हान** – लहान. **तरवो** – भाताची रोपे. **घेर** – नांगरणी करण्याचे प्रकार. **गुटो** – बी पेरणी झाल्यावर जमीन सपाट करण्यासाठी वापरले जाणारे अवजार.

**शिक्षकांसाठी :** महाराष्ट्रातील विविध बोलींभाषेतील साहित्य, शब्द, म्हणी वाचण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करावे.

## (२) वऱ्हाडी बोली

गायवाळ्याची झापी उघळताच त्यानं अंदर पाऊलं टाकली, तशी त्याची नंदी, मुंदीची जोळी माना फिरू फिरू त्याच्या इकळे पायाले लागली. त्याच्या मांग त्याचे तीनही पोरं आले. येताबरूबर त्याईनं गायवाळा निऱ्हा दनानून टाकला. एकानं पानी भरली थाली आनली होती. त एकानं पानाले हयद आन् लोनी लावून आनलं होतं.

''कलमा नोका करू बे!''

तो पोट्टयाइच्या अंगावर खेकसला. त्यानं पुंजीचं ताट खाली ठेवलं. त्यातली अंगार डब्बी काहाडली आन् उजयनीतल्या तेलात वात बुचकून ते बाहीर काहाडली. आन् अंगारडब्बीची काळी उगावून तिले लावली.

त्यानं दिवा लागताच नंदी-मुंदीच्या डोयातबी दिवे लागले. ते टकमका कायाभोर डोयाईनं त्याच्या इकळे पाह्याले लागले. त्यानं वयन्यावयन्यानं बयलाइच्या पायावर पानी वतलं. आन् त्याईच्या कपायी हयदकुकू लावलं. पोराच्या हातावरलं हयदं आन् लोनी त्याईच्या खांद्यावर थापलं आन् तेच्यावरच पोथीचे पानं बी थापले. घरधनीननं पोथीच्या पानाच्या वळ्या केल्याच नोत्या. ते तरमा काय करीन? घरात चुनाचाच पत्ता नोता. बयलाइले त्यानं थापटलं आन् पोट्याइले म्हनलं,

''कसांड्या गयात घाला आन् मोठ्यानं म्हना बे.''

''गायीच्या सुता, धरतरीच्या पुता,
आळूसानं मारलं, आऱ्यानं टोचलं
पुरान्यानं मारलं, कासऱ्यानं आवरलं
राग नोका धरू हो, आज आवतन घ्या
आन् सकाय जियाले या''

**डॉ. प्रतिमा इंगोले** (१९५३) **:** प्रसिद्ध कवयित्री, ग्रामीण कथाकार आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक. वऱ्हाडी बोलीभाषेतील साहित्यासाठी आणि ग्रामीण स्त्रियांच्या समस्या वास्तववादीपणे मांडणाऱ्या लेखिका म्हणून मराठी साहित्यात विशेष ओळख. 'अकसिदीचे दाने', 'अंधारपर्व', 'वऱ्हाडी लोककथा' हे कथासंग्रह, 'भुलाई', 'लळा', 'सोन्याचं बाळ' हे कवितासंग्रह प्रसिद्ध. महाराष्ट्र शासनाच्या बालसाहित्य पुरस्काराने सन्मानित. हा वऱ्हाडी बोलीतील उतारा 'अकसिदीचे दाने' या कथासंग्रहातून घेण्यात आला आहे.

**गायवाळा** – गायवाडा/गोठा. **झापी** – तुराट्याचे छोटे दार/झडप. **जोळी** – जोडी. **इकळे** – इकडे. **निऱ्हा** – निव्वळ. **थाली** – तांब्या/गडवा. **हयद** – हळद. **कलमा** – कल्ला/गोंधळ. **पोट्टे** – मुले. **पुंजीचं** – पूजेचं. **अंगार डब्बी** – आगपेटी. **काहाडली** – काढली. **उजयनी** – मातीची छोटी पणती. **काळी** – काडी. **वयन्यावयन्यानं** – वाकूनवाकून. **बयलाइच्या** – बैलांच्या. **वळ्या** – वड्या. **तरमा** – तरी. **कसांड्या** – बैलांच्या गळ्यातील घंट्या. **गयात** – गळ्यात. **आळूस** – आळस. **आरी** – बैलाला टोचणी देणारे साधन. **पुरान्यानं** – पुराणे हे पेरणीचे साधन. **कासरा** – बैलाच्या गळ्यातील दोर. **आवतन** – आमंत्रण. **सकाय** – सकाळी. **जियाले** – जेवायला.

- **वरील बोली भाषेतील उतारे तुम्ही अभ्यासले आहेत. वरील उताऱ्यांमधील काही वाक्ये खाली दिली आहेत. त्याचे मराठी भाषेत रूपांतर करण्याचा प्रयत्न करा. शिक्षकांची मदत घ्या.**

(अ) माका शेतीची सगळी कामा यतत.

(आ) तो पोट्ट्याइच्या अंगावर खेकसला.

(इ) त एकानं पानाले हयद आन् लोनी लावून आनलं होतं.

(ई) कोनच गावात रवना नाय जो तो मुंबयक पळता.

# १२. धाडसी रोहन

**दिलीप फलटणकर** (१९५५) : प्रसिद्ध लेखक, शिक्षणतज्ज्ञ आणि राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक. त्यांनी चाळीस वर्षे भाषा शिक्षक म्हणून काम केले आहे. त्यांची 'माणूस माझे नाव', 'कष्टाची भाकर' ही पुस्तके प्रकाशित आहेत. सदर पाठ 'किशोर' डिसेंबर २०२३ या मासिकातून घेतला आहे.

बालशौर्य पुरस्कार हा भारत सरकारकडून दिला जाणारा एक प्रतिष्ठित सन्मान आहे. हा पुरस्कार १८ वर्षांखालील मुलांना दिला जातो. धाडस, साहस आणि प्रसंगावधान राखून अडचणीत सापडलेल्या व्यक्तींची मदत करणाऱ्या मुलांना हा पुरस्कार दिला जातो. प्रस्तुत पाठातून लेखकाने सन २०२३ मध्ये महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यामधील १५ वर्षीय रोहन रामचंद्र बहिर या धाडसी मुलाने दाखवलेल्या शौर्याविषयी माहिती सांगितली आहे. रोहन रामचंद्र बहिर याला 'पंतप्रधान राष्ट्रीय बाल शौर्य' पुरस्काराने सन्मानित केले आहे.

रविवारचा दिवस. दुपारची वेळ होती. रोहन पुस्तक वाचत बसला होता. जोराचा पडणारा पाऊस आला. रोहनची आई म्हणाली, ''अरे, रोहन, उद्या मला कामाला जायचंय. माझी सायकल चिखलानं भरलीय, ती नदीवर ने आणि धुऊन आण.''

''हो, आई!'' म्हणत रोहनने हातातले पुस्तक दप्तरात ठेवले आणि तो घराबाहेर आला. दारातली सायकल हातात धरून त्याने रस्त्यावर आणली आणि सायकल चालवत तो नदीकडे निघाला. चार-पाच दिवस खूप पाऊस पडत असल्याने डोंबरी नदी दुथडी भरून वाहत होती. रोहनचे पाय चिखलाने भरले होते. तो तसाच नदीजवळ आला आणि सायकल स्टँडवर उभी केली. पाऊस थांबल्याने गावातील महिला धुणे धुवायला नदीवर आल्या होत्या. रोहन सायकलच्या चाकांचा चिखल धुऊन काढत होता. इतक्यात त्याच्या कानांवर आवाज आला.

''वाचवा ऽऽऽ, वाचवाऽ... मला वाचवा....''

रोहनने मागे वळून पाहिले.... एक महिला नदीच्या पाण्यात वाहून जात होती. खडकावर धुणे धुवत असलेल्या महिलांनी आरडाओरड करायला सुरुवात केली; हे पाहताच रोहनने क्षणाचाही विचार न करता नदीत उडी मारली. चार-पाच दिवस सतत पाऊस पडत असल्याने नदीच्या पाण्याचा वेग वाढला होता. त्या महिलेच्या नाका-तोंडात पाणी गेल्याने ती घाबरली होती आणि पाण्याच्या मुख्य प्रवाहात येऊन वाहत जाऊ लागली. तिने रोहनचे दोन्ही हात पकडण्याचा प्रयत्न केला.

''मावशी, माझे दोन्ही हात धरू नका. आपण दोघेही पाण्यात बुडून जाऊ !'' असं रोहन म्हणताच तिने घाबरतच त्याचा एक हात सोडला. रोहनने जोर लावून त्या महिलेला नदीच्या कडेला असलेल्या खडकाजवळ आणले. आरडाओरड करणाऱ्या महिलांनी धावत येऊन त्याला मदत केली.



त्या महिलांनी ओळखले, की अरे, या तर आपल्या छायाबाई गायकवाड आहेत. त्या गावातल्याच छायाबाई गायकवाड होत्या. छायाबाई सुखरूप बाहेर आल्याचे पाहून शेजारच्या महिलांना आनंद झाला. त्यांनी छायाबाईच्या नाका-तोंडात गेलेले पाणी काढण्याचा प्रयत्न केला. छायाबाईंना खूप जोरात धाप लागली होती. त्या खूप मोठमोठ्याने रडत होत्या. सर्वांनी मिळून त्यांना दवाखान्यात नेण्याचा निर्णय घेतला. छायाबाईंना सर्वांनी उचलून दवाखान्यात नेले. बाकीच्या महिला रोहनचे खूप कौतुक करत होत्या. ''अरे रोहन, तू पाण्यात उडी मारली म्हणून गायकवाडांची छाया वाचली.... नाहीतर आज काय तिचं खरं नव्हतं....'' रोहनचे कपडे पाण्याने ओलेचिंब झाले होते.

आईची सायकल घेऊन तो घरी गेला. अचानक घडलेल्या या घटनेने तोही अस्वस्थ झाला होता. आई-वडील रागावतील म्हणून त्याने ही बातमी घरी कोणालाच सांगितली नाही. हळूहळू ही बातमी गावात पसरली.

हा रोहन म्हणजे राजुरी नवगण या गावातील गजानन विद्यालयाचा दहावीचा विद्यार्थी. अतिशय तरतरीत, उंच असा मुलगा. वडील रामचंद्र हे शेतकरी तर आई राधाबाई या गावात आरोग्य सेविका म्हणून काम करत होत्या. रोहनला नदीत पोहायला खूप आवडत होते.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी त्याची व त्याच्या आईवडिलांची भेट घेतली. डॉ. संजय तांदळे यांनी झालेली घटना समजून घेतली आणि त्याचे कौतुक केले. त्यांनी शाळेचे दप्तर, पुस्तके, पुष्पगुच्छ देऊन त्याचा सत्कार केला.

त्याचे आईवडील घरी आले. त्या दोघांनाही आपल्या मुलाने एका महिलेचे प्राण वाचवले, याचा खूप आनंद झाला. गजानन महाविद्यालयाचे प्राचार्य भांगे सरांनीही रोहनचे शाळेत कौतुक केले. बीड जिल्ह्यातील वृत्तपत्रांत रोहनची फोटोसह बातमी प्रसिद्ध झाली. सर्व बीड जिल्ह्यात त्याचे कौतुक झाले. बीडमधील अनेक सामाजिक संघटनांनी त्याचा सत्कार केला.

छायाबाई म्हणतात, 'मी केवळ रोहनमुळे वाचले, त्याचे उपकार मी फेडू शकत नाही.' छायाबाईंनी त्याला ५००/- रुपये बक्षीस देऊ केले. परंतु त्याने ही रक्कम सार्वजनिक गणपती मंडळाला दिली.



डॉ. तांदळे यांनी 'पंतप्रधान राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कारा'साठी खूप प्रयत्न केले आणि २०२३ला त्याला हा पुरस्कार विज्ञानभवनात देण्यात आला. त्याच्या आईवडिलांना प्रथमच विमानाने दिल्लीत जाता आले. मोठा होऊन रोहनला डॉक्टर व्हायचे आहे आणि समाजाची सेवा करायची आहे. 'दुसऱ्यांना मदत करण्याचा संस्कार आईवडिलांनी केला त्यामुळेच माझ्या हातून हे घडले', असे रोहनने सांगितले.



## नवीन शब्द शिकू या.

**दुथडी** – दोन्ही काठ भरून. **प्रवाह** – ओघ. **कौतुक** – प्रशंसा. **बक्षीस** – पारितोषिक. **शौर्य** – साहस, धाडस.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना शौर्यकथा सांगाव्यात. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये धाडस दाखवणाऱ्या लहान मुलांच्या कथा सांगाव्यात. तसेच बालशौर्य पुरस्कार या संदर्भात माहिती द्यावी. कथेच्या वैशिष्ट्यांबाबत गटात विद्यार्थ्यांची चर्चा घडवून आणावी.

विनामूल्य वितरणासाठी



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) रोहनचा आवडता छंद कोणता?

(आ) रोहनला मिळालेल्या बक्षिसाचे रोहनने काय केले?

(इ) रोहनला मोठेपणी कोण व्हायचे आहे? कशासाठी?

(ई) आईवडिलांनी रोहनवर कोणता संस्कार केला होता?

**प्र. २. कोण कोणास म्हणाले ते लिहा.**

(अ) ''माझी सायकल चिखलानं भरलीय, ती नदीवर ने आणि धुऊन आण.''

(आ) ''मावशी, माझे दोन्ही हात धरू नका. आपण दोघेही पाण्यात बुडून जाऊ!''

(इ) ''अरे रोहन, तू पाण्यात उडी मारली म्हणून गायकवाडांची छाया वाचली.''



## विचार करा व सांगा.

- **तुमच्या परिसरात अडचणीत सापडलेल्या व्यक्तीला तुम्ही कधी मदत केली आहे का? असल्यास कशी?**



## खेळू या शब्दांशी

- **विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) धाडसी × ......................    (आ) बक्षीस × ......................

(इ) कौतुक × ......................    (ई) उपकार × ......................



## शोध घेऊ या.

- **शिक्षकांच्या मदतीने आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरांवर कोणती यंत्रणा कार्यान्वित असते याची माहिती आंतरजालावरून मिळवा.**



## कृतीतून शिकू या.

- **प्रकल्प :** (१) विविध साहसी खेळांची सचित्र माहिती लिहून त्याचे वर्गात सादरीकरण करा.

  (२) शिक्षकांच्या मदतीने तुमच्या शाळेचा एक आपत्कालीन नकाशा तयार करा. समजा, शाळेत एखादी आपत्ती आली, तर प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी कोणत्या मार्गाने आणि कोठे सुरक्षित जमावे हे चिन्हांच्या साहाय्याने दाखवा.



## आपण समजून घेऊ या.

### क्रियापदे

- **पुढील वाक्ये वाचा.**

(१) रमेश नेहमी पहाटे उठतो.

(२) मुलांनी नेहमी खरे बोलावे.

(३) आमच्या संघाने ढाल जिंकली.

वरील वाक्यातील 'उठतो', 'बोलावे', 'जिंकली' हे अधोरेखित केलेले शब्द क्रिया दर्शवतात.

**वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दांना 'क्रियापद' म्हणतात.**

उदा., वैभव आंबा खातो. या वाक्यात 'वैभव' हा कर्ता आहे तर 'खातो' हे क्रियापद आहे. ही क्रिया आंब्यावर झाली म्हणून 'आंबा' हे कर्म आहे.

**लक्षात ठेवा–** क्रिया करणारा तो **कर्ता**

क्रिया ज्या वस्तूवर वा व्यक्तीवर होते ते **कर्म**

### (१) सकर्मक क्रियापद–

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) विराट क्रिकेट खेळतो.

(२) अनुराधा गीत गाईल.

(३) अभय पुस्तक वाचतो.

वरील तिन्ही वाक्ये सकर्मक वाक्ये आहेत. त्यांची मांडणी कर्ता, कर्म, क्रियापद या क्रमाने आहे, तथापि वाक्यातील कर्ता, कर्म व क्रियापद यांची मांडणी प्रत्येक वाक्यात याच क्रमाने येईल असे नाही.

उदा., छान नाच केला मयुरीने.

किती सुंदर भाषण केले आज सुमनने!

अशा वाक्यांमध्ये कर्ता अगदी शेवटी तर कधी क्रियापद वाक्याच्या सुरुवातीस येऊ शकते म्हणूनच वाक्यातील कर्ता, कर्म, क्रियापद कसे ओळखायचे ते नीट समजून घ्या.

**सकर्मक म्हणजे कर्मासहित. ज्या वाक्यात कर्म असते, ते वाक्य सकर्मक होय.**

- **पुढील वाक्ये वाचा.**

(१) आर्या लाडू खाते.

(२) गौरव पत्र लिहितो.

वरील वाक्यात पूर्ण अर्थ आहे. जर आर्या खाते, गौरव लिहितो एवढीच वाक्ये दिली, तर त्यांचे अर्थ पूर्ण होत नाहीत.

म्हणजेच 'खाते' या क्रियापदाला 'लाडू' या कर्माची जरूरी आहे म्हणून 'खाते' हे क्रियापद सकर्मक आहे. तसेच 'लिहितो' या क्रियापदाच्या बाबतीत आहे.

**ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरूरी असते, त्यास 'सकर्मक क्रियापद' असे म्हणतात.**

### (२) अकर्मक क्रियापद–

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) मी उद्या पुण्याला जाईन.
(२) आज गुढीपाडवा आहे.
(३) गाई झाडाखाली थांबल्या.

वरील वाक्यातील 'मी कुठे जाईन?' पुण्याला. 'पुण्याला' हे जाईल क्रियापदाचे कर्म नाही. तसेच आज काय आहे? असे विचारल्यावर 'गुढीपाडवा' आहे हे क्रियापद वस्तुस्थिती सांगते. असण्याची क्रिया कोणत्याही वस्तूवर घडत नाही. यावरून असे म्हणता येईल, की **ज्या वेळी वाक्यातील क्रियापदाला कर्म नसते किंवा वाक्यातील क्रियापदांना अर्थ पूर्ण करण्यासाठी कर्माची गरज लागत नाही, तेव्हा त्यास 'अकर्मक क्रियापद' असे म्हणतात.**

- **खालील वाक्यातील कर्ता, कर्म, क्रियापद ओळखून सारणीमध्ये भरा.**

(१) त्याने दरवाजा उघडला.
(२) चिन्मय घोड्यावर बसला.
(३) आम्ही दहा हजार वाचनालये बांधली.

| कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

### (३) सहायक क्रियापद व संयुक्त क्रियापद–

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) मीना गोष्ट सांगत आहे.
(२) दुर्गेशने सर्व अभ्यास करून टाकला.
(३) फुलांनी बहरलेले झाड कसे दिसत असेल?

वरील वाक्यात 'सांगत' या धातुसाधितापुढे 'आहे' हे क्रियापद ठेवले आहे त्यामुळे वाक्य पूर्ण झाले आहे.

वरील वाक्यात 'सांगत' हा शब्द सांगणे या क्रियापदाऐवजी वापरलेला आहे, परंतु त्याने वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही. **वाक्याचा अर्थ पूर्ण होण्यासाठी धातुसाधितांच्या जोडीला एक क्रियापद वापरावे लागते. धातुसाधिताला या क्रियापदाची मदत घ्यावी लागते म्हणून या क्रियापदाला 'सहायक क्रियापद' असे म्हणतात.**

**वाक्यातील अशा जोड क्रियापदाला 'संयुक्त क्रियापद' असे म्हणतात. धातुसाधित व सहायक क्रियापद मिळून संयुक्त क्रियापद होते.**

- **खालील सारणी वाचा.**

| मुख्य धातू | धातुसाधित + सहायक क्रियापद | संयुक्त क्रियापद |
|---|---|---|
| सांग | सांगत + आहे | सांगत आहे. |
| कर | करून + टाकला | करून टाकला. |
| दिस | दिसत + असेल | दिसत असेल. |

- **खालील वाक्ये वाचा आणि त्यातील संयुक्त क्रियापदे अधोरेखित करा.**

(१) पडका किल्ला बोलू लागला.
(२) मी आकाशवाणीसाठी पुष्कळ लिहित होते.
(३) मागच्या बाकावर दोघे बोलत होते.

- **रिकाम्या जागी कंसात दिलेल्या क्रियापदांची योग्य रूपे लिहा.**

(१) स्मिताला कारले अजिबात ...................... नाही. (आवडणे)
(२) काका रोज पोथी ...................... असत. (वाचणे)
(३) त्याला हसण्याचा आवाज ...................... आला. (ऐकणे)
(४) आजोबा स्वत:ची कामे स्वत:च ...................... लागले. (करणे)

## वाक्याचे प्रकार

मराठी व्याकरणात अर्थावरून वाक्यांचे मुख्य प्रकार पडतात.

(१) विधानार्थी (२) प्रश्नार्थी (३) आज्ञार्थी (४) उद्‌गारार्थी. हे प्रकार अनुक्रमे साधे विधान, प्रश्न, आज्ञा/विनंती आणि मनातील भावना व्यक्त करतात. याव्यतिरिक्त होकारार्थी व नकारार्थी असेही उपप्रकार आहेत.

- **वाक्याचे मुख्य प्रकार (अर्थावरून)**

**(१) विधानार्थी वाक्य–** ज्या वाक्यात केवळ एक विधान केलेले असते, त्याला विधानार्थी वाक्य म्हणतात.
उदा., (१) सूर्य पूर्वेला उगवतो. (२) शरद शाळेत जातो.

**(२) प्रश्नार्थक वाक्य–** ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो, त्याला प्रश्नार्थक वाक्य म्हणतात.
उदा., (१) तू कोठे चालला आहेस? (२) तुझे नाव काय आहे?

**(३) आज्ञार्थी वाक्य–** ज्या वाक्यातून आज्ञा, हुकूम, विनंती, सल्ला, आशीर्वाद किंवा उपदेश दर्शवला जातो, त्याला आज्ञार्थी वाक्य असे म्हणतात.
उदा., (१) शांत बसा. (२) सर्वांनी रांगेत चाला.

**(४) उद्‌गारार्थी वाक्य–** ज्या वाक्यात मनातील भावना तीव्रपणे, उत्स्फूर्तपणे व्यक्त केलेली असते, त्याला उद्‌गारार्थी वाक्य असे म्हणतात.
उदा., अहाहा! काय सुंदर चित्र आहे.
शाब्बास! असेच यश मिळवत राहा.

**इतर प्रकार–** ✲ होकारार्थी वाक्य– या प्रकारच्या वाक्यातून होकार दर्शवला जातो. उदा., तो व्यायाम करतो.
✲ नकारार्थी वाक्य– या प्रकारच्या वाक्यातून नकार दर्शवला जातो. उदा., तो व्यायाम करत नाही.

- **कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) तेजश्री दररोज शाळेत जाते. (प्रश्नार्थक वाक्य)
(२) ही बाग खूप सुंदर आहे. (उद्‌गारार्थी वाक्य)
(३) अबब! किती उंच इमारत आहे ही! (विधानार्थी वाक्य)
(४) रोहनचे घर शाळेपासून जवळ आहे. (नकारार्थी वाक्य)

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना क्रियापद व क्रियापदांच्या प्रकारांची ओळख करून द्यावी. वाक्यांतील क्रियापदांचे प्रकार ओळखण्याचा सराव करून घ्यावा. स्वर, स्वरादी, व्यंजने, अक्षरे यांचा सहसंबंध व त्यांपासून शब्द कसे तयार होतात याची माहिती द्यावी.

## ओळख बातमीची

एखाद्या घडून गेलेल्या, घडत असलेल्या किंवा घडणाऱ्या घटनेची वस्तुनिष्ठ माहिती देण्यासाठी बातमी तयार केली जाते. विविध वर्तमानपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन तसेच समाजमाध्यमे यांवर बातम्या वाचता, ऐकता व पाहता येतात. माहिती देणे, ज्ञान देणे, समाजप्रबोधन करणे, परिस्थितीची जाणीव करून देणे हे बातमीचे प्रमुख उद्देश असतात.

- **बातमीचे भाग–**

बातमीचा आशय व विषय वाचकाच्या चटकन लक्षात येईल अशा आकर्षक रूपात दिलेला असतो यालाच ‘मथळा’ असेही म्हणतात. कधीकधी पूरक माहिती देणारे उपशीर्षक दिलेले असते. बातमी कोठून मिळाली, कधी लिहिली हे दर्शवणारा भाग म्हणजे ठिकाण व दिनांक. पहिला परिच्छेद वाचल्यावर बातमीचा मुख्य मुद्दा समजतो. यानंतर सविस्तर बातमी दिलेली असते. बातमीच्या समर्थनार्थ छायाचित्रे व त्याची माहिती सांगणारी ओळ दिलेली असते.

बातमी समजून घेताना काय? कोण? कोठे, कधी? कसे? या स्वरूपाच्या प्रश्नांच्या उत्तरातून बातमीतील मुख्य मुद्दे मिळवता येतात. संपूर्ण बातमीचा थोडक्यात आढावा घेऊन बातमी सारांश रूपाने इतरांना सांगता येते.

- **पुढील बातमी वाचा.**

### विद्यानिकेतनच्या वार्षिक क्रीडामहोत्सवाची सांगता

**पन्हाळा, दि.१९ डिसेंबर (वार्ताहराकडून) :**



सोमवार पेठ येथील विद्यानिकेतन या उपक्रमशील प्रशालेचा वार्षिक क्रीडामहोत्सव उत्साहात संपन्न झाला. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या क्रीडामहोत्सवाची सांगता पारितोषिक वितरणाने झाली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध क्रीडातज्ज्ञ सौरभ भोसले यांच्या शुभहस्ते विविध खेळांतील विजेत्या खेळाडूंना प्रशस्तिपत्रके व पदके देऊन गौरवण्यात आले.

आपल्या जीवनातील खेळांचे महत्त्व सांगताना प्रत्येकाने कोणता ना कोणता आवडीचा खेळ खेळावा. खेळातून निर्माण होणारी खिलाडूवृत्ती आयुष्यभर जोपासावी हा विचार त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. प्रशालेतील उदयोन्मुख खेळाडू कु. हिरण्या पाटील हिने धावणे, लांब उडी व गोळा फेक या तिन्ही खेळांत प्रथम क्रमांक पटकावल्यामुळे स्पर्धेतील ‘सर्वोत्तम खेळाडू’ म्हणून तिची निवड करण्यात आली. या सांगता समारंभाच्या निमित्ताने इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी मल्लखांबावरील चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली.

या कार्यक्रमास प्रशालेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशालेचे क्रीडाशिक्षक श्री. विजय गव्हाणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

- **या बातमीतील ठळक मुद्दे शोधू या.**

**प्र. १. वरील बातमीच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) बातमीचे शीर्षक/मथळा-

(आ) बातमीचे स्थळ-

(इ) बातमीची तारीख-

(ई) चौकटी पूर्ण करा.

(१) प्रमुख पाहुणे -

(२) स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू -

(३) उपस्थित असणारे -

(४) मल्लखांबावरील प्रात्यक्षिके करणारी-

(५) आभार मानणारे-

**प्र. २. कारणे लिहा.**

(अ) खेळाडूंना प्रशस्तिपत्रके व पदके देऊन गौरवण्यात आले, कारण-

(आ) कु. हिरण्या पाटील हिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवडले, कारण-

- **बातमीचा सारांश-**

वरील बातमी शाळेतील क्रीडामहोत्सवाच्या समारोप कार्यक्रमाची आहे. या कार्यक्रमात विजेत्या खेळाडूंना प्रशस्तिपत्रके व पदके देण्यात आली. कु. हिरण्या पाटील हिची सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाली. आवडत्या खेळाची जोपासना करून आयुष्यातही खिलाडूवृत्ती बाळगा असा संदेश कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांनी दिला.

- **उपक्रम :** वर्तमानपत्रातील कला, क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांतील बातम्यांचे वाचन करा. त्याचा सारांश लिहा व त्यावर तुमचे मत वर्गात सांगा.



## सारे हसू या.

**गंपू :** अरे, माझा कुत्रा हरवलाय. खूप शोधतोय पण सापडतच नाही.
**पिंटू :** पेपरमध्ये जाहिरात का देत नाही?
**गंपू :** अरे, त्याला कुठे पेपर वाचता येतोय?

**पिंटू :** बाबा, मला दहा रुपये हवे आहेत.
**बाबा :** काय करणार आहेस दहा रुपयांचं!
**पिंटू :** एका गरजू माणसाला द्यायचे आहेत.
**बाबा :** अरे व्वा! खूप छान विचार आहे तुझा. कुठंय तो गरजू माणूस.
**पिंटू :** तो बघा. बाहेर आइसक्रीम विकतोय.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील विविध प्रकारांच्या बातम्यांचे वाचन करण्यासाठी प्रवृत्त करावे. वाचलेल्या बातम्याचा सारांश लिहिण्यासाठी प्रोत्साहन द्यावे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी किंवा आवडलेल्या बातम्यांचा संग्रह करण्यास सांगावे.

## आपण समजून घेऊ या.

- **खालील शब्द वाचा.**

मी, ही, जी, पी, बी, ती, तू, धू, जू, ऊ, पू हे एकाक्षरी शब्द आहेत.
एकाक्षरी शब्दांतील इ-कार किंवा उ-कार दीर्घ उच्चारला जातो म्हणून तो 'दीर्घ' लिहितात.
'नि' हा एकच शब्द असा आहे, की जो एकाक्षरी असूनही 'ऱ्हस्व' लिहितात.

- **खालील वाक्ये वाचा. अधोरेखित शब्दांचे निरीक्षण करा.**

(१) त्याची टोपी उडाली.
(२) नूतन विटी-दांडू खेळू लागली.
(३) ताईने पिशवी ठेवली.
(४) अजयला पेरू आवडतो.
(५) राजू आनंदाने नाचू, बोलू आणि गाऊ लागला.

त्याची, टोपी, उडाली, विटी, दांडू, खेळू, लागली, पिशवी, ठेवली, पेरू, राजू, नाचू, बोलू, गाऊ या शब्दांतील 'इ-कार' व 'उ-कार' दीर्घ आहेत. मराठी भाषेत शब्दांच्या शेवटी येणारे 'इ-कार' व 'उ-कार' दीर्घ असतात 'आणि' व 'परंतु' हे मराठीतील दोन शब्द असे आहेत, की ज्यांचा 'इ-कार' व 'उ-कार' ऱ्हस्व लिहितात.

- **शब्दांच्या शेवटी 'इ-कार' व 'उ-कार' दीर्घ येतील असे दहा शब्द लिहा.**

## विचार करा व सांगा.

- **खालील चित्राचे निरीक्षण करा व तुमच्या मनात येणारे प्रश्न लिहा.**



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वर्गात स्थानिक सण, समारंभ, उत्सव, जत्रा व शिबीर यांसारख्या कोणत्याही एका विषयावर आधारित प्रसंगचित्र किंवा चित्रफीत दाखवावी. त्यातील ठळक घटना, प्रसंग, संवाद, व्यक्ती यांवर आधारित वर्गात अनौपचारिक चर्चा घडवून आणावी. विद्यार्थ्यांना मुक्त स्वरूपाचे अनौपचारिक प्रश्न विचारण्यासाठी प्रोत्साहित करावे.

# १३. फिटे अंधाराचे जाळे

- **ऐका. म्हणा. वाचा.**

फिटे अंधाराचे जाळे
झाले मोकळे आकाश
दरीखोऱ्यांतून वाहे
एक प्रकाश प्रकाश ।। धृ. ।।

रान जागे झाले सारे
पायवाटा जाग्या झाल्या
सूर्य जन्मता डोंगरी
संगे जागल्या साऊल्या
एक अनोखे लावण्य
आलें भरास भरास ।। १ ।।

दवं पिऊन नवेली
झाली गवताची पाती
गाणी जुनीच नव्याने
आली पाखरांच्या ओठी
क्षणापूर्वीचे पालटे
जग उदास उदास ।। २ ।।

झाला आजचा प्रकाश
जुना कालचा काळोख
चांदण्याला किरणांचा
सोनसळी अभिषेक
सारें रोजचें तरीही
नवा सुवास सुवास ।। ३ ।।



**सुधीर मोघे** (१९३९-२०१४) : प्रसिद्ध कवी, गीतकार, संगीतकार, लेखक आणि निवेदक. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी अनेक भावगीते लिहिली. चित्रकार आणि निवेदक म्हणूनही त्यांनी मराठी कलाक्षेत्रात मोलाची कामगिरी केली. 'आत्मरंग', 'गाण्याची वही', 'पक्ष्यांचे ठसे', 'शब्दधून', 'स्वतंत्रते भगवते' हे कवितासंग्रह, 'अनुबंध', 'गाणारी वाट' हे गद्यलेखन प्रसिद्ध. महाराष्ट्र शासनाच्या सर्वोत्कृष्ट गीतकार या पुरस्काराने सन्मानित. बालभारती जुन्या मालेतून ही कविता घेण्यात आली आहे.

प्रस्तुत कवितेतून सूर्योदयाच्या वेळी वातावरणात झालेल्या विविध बदलांचे सुरेख वर्णन कवीने केले आहे. सदर कविता निसर्ग आणि आशावादाचे प्रतीक आहे. ही कविता नैराश्यातून बाहेर पडण्याचा सकारात्मक संदेश देते. प्रकाशामुळे निसर्ग आणि मानवी मन कसे मोकळे होते याचे प्रतिकात्मक चित्रण या कवितेत आले आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक, सामूहिकरीत्या कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. सूर्योदय व त्यावेळी निसर्गात होणारे बदल यावर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणावी. या कवितेची वैशिष्ट्ये व शैली याबाबत विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.



## नवीन शब्द शिकू या.

**लावण्य** – सौंदर्य. **भरास येणे** – उठून दिसणे. **नवेली** – नवीन. **सोनसळी** – सोनेरी.



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

(अ) दरीखोऱ्यातून वाहणारा– [ ]

(आ) दव पिणारी– [ ]

(इ) गाणी गाणारी– [ ]

**प्र. २. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) पाऊलवाटांवरून ये–जा सुरू झाली.

(आ) सूर्योदयामुळे उदास वाटणारे जग एका क्षणात पालटले.

**प्र. ३. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(अ) 'गाणी जुनीच नव्याने, आली पाखरांच्या ओठी.'

(आ) 'झाला आजचा प्रकाश, जुना कालचा काळोख.'

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सूर्योदयानंतर निसर्गात कोणकोणते बदल झाले?

(आ) सूर्याच्या किरणांचे वर्णन कसे केले आहे?

(इ) या कवितेतून कोणता मुख्य संदेश मिळतो?

**प्र. ५. खालील शब्द, शब्दसमूहाचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) अंधाराचे जाळे–

(आ) डोंगर–

(इ) सूर्य–

(ई) चांदणे–

**प्र. ६. खालील संकल्पनांचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

(अ) फिटे अंधाराचे जाळे (आ) सोनसळी अभिषेक



## विचार करा व सांगा.

- **'सूर्य उगवला नाही तर...' अशी कल्पना करा व तुमचे विचार सांगा.**

## लिहिते होऊ या.

- कवितेतील आकाश, प्रकाश, सूर्य, गवत, पाखरे या शब्दांचा वापर करून तुमच्या शब्दांत सहा ते आठ ओळींची कविता लिहिण्याचा प्रयत्न करा.

## जाणून घेऊ या.

- **मराठी स्वर, व्यंजने व अक्षरे यांचा सहसंबंध**

मराठी भाषेतील लेखनव्यवस्था देवनागरी लिपीवर आधारित आहे. या लिपीत स्वर, व्यंजने आणि त्यांपासून तयार होणारी अक्षरे यांचा घनिष्ठ परस्परसंबंध आढळतो. मराठी वर्णमालेमध्ये स्वर, स्वरादी आणि व्यंजने आहेत.

(१) **स्वर–** स्वर हे स्वतंत्रपणे उच्चारता येणारे ध्वनी आहेत. ओठांचा एकमेकांशी व जिभेच्या कोणत्याही भागाचा मुखातील कोणत्याही अवयवाशी स्पर्श न होता मुखावाटे जे ध्वनी बाहेर पडतात, त्यांना '**स्वर**' असे म्हणतात. उदा., अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, अॅ, ऐ, ओ, ऑ, औ स्वर स्वतंत्र अक्षर व्यंजनांसोबत जोडले असता ते मात्रांच्या रूपाने येतात. अलीकडे मराठीत इंग्रजी शब्दांचा वापर सुरू झाल्याने अॅ आणि ऑ या स्वरांचा समावेश करण्यात आला आहे.

उदा., क् + ा = का, क् + ि = कि, क् + ी = की

(२) **स्वरादी–** अं आणि अः हे स्वरादी आहेत. अनुस्वार आणि विसर्ग यांचा उच्चार करताना या वर्णाअगोदर स्वर येतो म्हणून **स्वरादी** आहेत.

उदा., वंदन = व् + अं = वं, दुःख = द् + उ + विसर्ग = दुः

(३) **व्यंजने–** ज्यांचा पाय मोडून आपण लिहितो ती व्यंजने. क्, ख्, ग् पासून.... ह् पर्यंत ज्या वर्णांचा उच्चार स्वरांच्या मदतीनेच पूर्ण होतो, ती '**व्यंजने**' होय. ङ् ञ् ण् न् म् ही अनुनासिके आहेत.

व्यंजने स्वतंत्रपणे पूर्ण उच्चारली जात नाहीत. त्यांना स्वराची आवश्यकता असते. उदा., क = क् + अ

इतर स्वर जोडल्यास अक्षराचा उच्चार बदलतो. क् + ई = की, क् + उ = कु

(४) **अक्षरे–** अक्षर म्हणजे पूर्ण उच्चारलेला वर्ण होय. सर्व स्वर आणि स्वरयुक्त व्यंजने यांना **अक्षरे** म्हणतात. स्वर आणि व्यंजन यांच्या संयोगातून अक्षर तयार होते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स् | + | अ | = | स |
| (व्यंजन) | | (स्वर) | | (अक्षर) |

अक्षर हे भाषेच्या लेखनाचे मूलभूत एकक आहे. स्वर आणि व्यंजन यांच्या योग्य संयोगामुळे शब्दरचना होते.

## कृतीतून शिकू या.

प्र. १. **वरील माहितीच्या आधारे खालील अक्षरांचा विग्रह करा.**

(अ) चौ (आ) पं (इ) ज्ञ (ई) कृ (उ) तः

प्र. २. **दिलेल्या शब्दांचा विग्रह करून त्यातील स्वर व व्यंजनांचे वर्गीकरण करा.**

(अ) राष्ट्रध्वज– (आ) कृतज्ञता–

प्र. ३. **शब्दकोशाचा उपयोग करून पुढे दिलेले शब्द अकारविल्हे क्रमानुसार लिहा.**

(अ) मेघ (आ) धरणी (इ) आकाश (ई) पाऊस (उ) इंद्रधनुष्य

# निबंध लेखन

एखाद्या दिलेल्या विषयावर योग्य व निवडक विचारांची आकर्षक व सुसंगत रीतीने केलेली मांडणी म्हणजेच 'निबंध' होय.










- **वर्णनात्मक निबंध** :- एखाद्या व्यक्तीचे, इमारतीचे, प्रसंगाचे किंवा दृश्याचे चित्र हुबेहूब शब्दांनी रेखाटणे यालाच **वर्णनात्मक निबंध** म्हणतात.

  **व्यक्तीचे वर्णन :-** आई, मित्र, शिक्षक, पोस्टमन, पोलीस, शाळेचा शिपाई इत्यादी.

  **पशुपक्ष्यांचे वर्णन :-** माझा आवडता प्राणी, गाय, घोडा, मोर, हत्ती, कबुतर, शहामृग इत्यादी.

  **स्थळांचे वर्णन :-** शाळा, गाव, शहर, लेणी, मंदिरे, किल्ला, रेल्वे स्टेशन, धबधबा, नदी, पर्वत वगैरे.

  **निसर्गाचे वर्णन :-** पहाट, सायंकाळ, ऋतू, जंगल, पर्वत, नद्या वगैरे.

  **प्रसंगाचे वर्णन :-** क्रिकेटचा सामना, स्नेहसंमेलन, सण, उत्सव, वाढदिवस इत्यादी.

यांसारख्या अनेक विषयांवर आपण वर्णनात्मक निबंध लिहू शकतो. यासाठी आपल्याला सभोवतालचे अगदी सूक्ष्म निरीक्षण करता यायला हवे. ज्या विषयावर निबंध लिहायचा, त्या विषयाशी त्याला एकरूप व्हावे लागते. मनातल्या मनात चिंतन करावे लागते. त्यासंदर्भात आपण काय पाहिले, काय वाचले, काय ऐकले, काय अभ्यासले ते आठवावे लागते. थोरामोठ्यांनी सांगितलेल्या विचारांचा, कवितेच्या ओळींचा, म्हणींचा व वाक्प्रचारांचा, आलंकारिक शब्दांचा उपयोग करून निबंध लिहिला, तर तो वाचनीय होतो व मनाला भिडतो.

- **खाली दिलेला वर्णनात्मक निबंध वाचा.**

### रम्य ती सकाळ

आकाशात सूर्य उगवला. त्याचा प्रकाश हळूहळू सगळीकडे पसरू लागलेला होता. सूर्याच्या केशरी किरणांनी पूर्व दिशा सुंदर दिसत होती. घरासमोर असलेल्या तलावाकडे नजर गेली तर काय आश्चर्य! त्या केशरी किरणांचे तेज त्या पाण्यावर पसरलेले होते. ते दृश्य फारच सुंदर होते. हलकासा गार वारा त्या सुंदरतेत भर घालू लागला.

त्याच वेळी घरटी सोडून पक्ष्यांचा थवा आकाशात उडू लागला होता. ते पाहून गंमत वाटली. या पक्ष्यांना उडताना मार्ग कसा समजत असेल याचे फार नवलच वाटले. काही मोठ्या वृक्षांवर पक्ष्यांचा किलबिलाट, चिवचिवाट सुरू होता. त्या मधुर आवाजाची जादू काही वेगळीच, नाही का! त्या मंजूळ गाण्याबरोबरच घरीदारी, अंगणात आयाबायांनी सडा शिंपलेला होता. त्यावर सुबक रांगोळ्या रेखाटल्या जात होत्या. कुठूनतरी दूरवरून मंदिरातील घंटानाद कानी पडत होता. सकाळच्या आरतीचे स्वर कानी पडले आणि मनाला फार आनंद झाला.

किती सुंदर असते ही सकाळ! मन प्रसन्न होऊ लागते. अशी ही रम्य सकाळ पाहिली, की मला कुणा कवयित्रीच्या ओळी आठवू लागतात.

**उगवती अवखळ, रम्य गोड ती सकाळ,**
**रुणझुण वाजे जणू, दोन्ही पायांतील चाळ.**

- **खालील विषयांवर दिलेल्या मुद्द्यांनुसार निबंध लिहा.**

(१) माझा आवडता ऋतू

**मुद्दे :** (१) प्रस्तावना (२) आवडत्या ऋतूचे वर्णन (३) का आवडतो? (४) समारोप

(२) माझी माय मराठी

**मुद्दे :** (१) मातृभाषा (२) वैशिष्ट्ये (३) महत्त्व (४) भाषा-संवादाचे माध्यम (५) जतन व संवर्धन

## भाषेची गंमत पाहू या.

- **मराठी विलोमपद म्हणजे असे वाक्य जे उलटे वाचले, तरी अगदी तसेच दिसते.**

उदा., (१) चिमा काय कामाची

(२) भाऊ तळ्यात उभा

(३) काका, वाचवा, काका

(४) तो कवी डालडा विकतो

(५) हाच तो चहा

(६) तो कवी ठमाला माठ विकतो

तुम्हीही अशा प्रकारची वाक्ये तयार करून लिहा. पाहा कशी गंमत येते.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वर्णनात्मक निबंधाची माहिती समजावून सांगावी. वर्णनात्मक निबंधाचे विविध विषय देऊन विद्यार्थ्यांकडून निबंध लेखन करून घ्यावे.

# १४. रक्षण पर्यावरणाचे

**दिलीप कुलकर्णी** (१९५८) : प्रसिद्ध लेखक, संपादक व पर्यावरणविषयक आणि सामाजिक चळवळीत भाग घेणारे कार्यकर्ते. 'निसर्गायन', 'हसरे पर्यावरण', 'सौर आरोग्य', 'विकास स्वप्न', 'अणु विवेक', 'बदलूया जीवनशैली' भाग १ व २ ही पुस्तके प्रसिद्ध. हा पाठ 'हसरे पर्यावरण' या पुस्तकातून घेण्यात आला आहे.

निसर्गाने मानवाला अन्न, हवा, पाणी या महत्त्वपूर्ण गोष्टी दिलेल्या आहेत. निसर्गाकडून मिळणाऱ्या गोष्टींच्या हव्यासामुळे व अतिवापरामुळे निसर्गाचा समतोल बिघडून जीवसृष्टीचे नुकसान होत आहे. प्रस्तुत पाठातून निसर्गाचे महत्त्व व रक्षण या संदर्भाने मोलाचा संदेश दिलेला आहे.

''माधवकाका! आम्ही सगळे तयार आहोत आता. कुठे बसू या अभ्यासाला?'' आनंदने विचारले.

माधवकाका म्हणाले, ''पर्यावरणाचा अभ्यास चार भिंतींत बसून मुळीच करायचा नसतो! चला, घराबाहेर पडू. कुठेतरी झाडाखाली बसू.''

पाखाडी उतरून नदीकडे जाताना पिंपळाचे एक झाड दिसले. ''चला, इथेच या पिंपळाच्या पारावर बसू या अभ्यासाला'', ते म्हणाले.



''छान! आता मला सांगा, 'पर्यावरण' या शब्दाचा अर्थ कुणाकुणाला माहिती आहे बरं?'' माधवरावांनी विचारले.

''पर्यावरण म्हणजे निसर्ग. झाडं, पक्षी, प्राणी असं सगळं.'', अजित म्हणाला.

''अन् हवा, पाणी, जमीन अशांसारख्या गोष्टीही!'' अंकिता म्हणाली.

माधवकाका म्हणाले, ''बरोबर! आता या पर्यावरणात राहणारा प्रत्येक प्राणी निसर्गाकडून किंवा इतर प्राण्यांकडून काहीतरी घेतो; पण त्याचबरोबर तो काहीतरी परतही करतो. जशी घेवाण होते; तशी देवाणही होते. गुरं जमिनीवर चरतात, पण शेणाच्या रूपानं सेंद्रिय खत जमिनीला परत करून ती सुपीक करतात. मधमाश्या फुलांतील मकरंद गोळा करतात, त्याच वेळी परागीभवन घडवून आणून निसर्गातलं एक फार मोठं काम करतात. झाडं जमिनीतलं पाणी आणि अन्नद्रव्यं शोषून घेतात, पण त्या बदल्यात प्राणवायूच्या रूपानं सर्वांना श्वास देतात, फळं देऊन प्राण्यांची भूक भागवतात. सापासारखा प्राणीसुद्धा उंदीर फस्त करून पिकांच्या संहाराला आळा घालण्याचं काम करतो. एवढंसं लिबलिबीत गांडूळ, पण तेसुद्धा जमीन भुसभुशीत बनवण्याचं काम करतं, जमीन सुपीक बनवतं.

माणूस मात्र निसर्गातून, इतर प्राण्यांकडून फक्त काहीतरी घेताना दिसतो. सगळ्यांकडून उपयोगी गोष्टी घ्यायच्या आणि द्यायच्या मात्र निरुपयोगी किंवा

घातक गोष्टी! असा माणसांचा खाक्या बनला आहे. जमिनीतून अन्न मिळवायचं, पण तिला द्यायचं काय, तर जळजळीत रासायनिक खतं! हवेतून प्राणवायू घ्यायचा आणि तिच्यात सोडायचं काय, तर विषारी वायू आणि धूर! निसर्गातल्या शुद्ध पाण्याचा उपयोग करायचा, पण त्या पाण्यात सोडायची घातक, विषारी अशी रसायनं! जमिनीत खाणी खणायच्या आणि तिथला कच्चा माल संपल्यावर त्या तशाच सोडून द्यायच्या. लाकडासाठी जंगलंच्या जंगलं साफ करायची. या सगळ्यात माणूस निसर्गाचा उपयोग करून घेतो. सर्व प्राणी निसर्गाचं पोषण करतात. माणूस तेवढा त्याचं शोषण करतो. पटतंय ना?''

पाहतो, ती अखंडितपणे काम करतात. पर्यावरणातल्या साखळ्या अतूट राहतात.''

''माणसाच्या वागण्यात मात्र अशी परस्परपूरकता नाही. 'आपण निसर्गाचा एक घटक आहोत, निसर्गचक्रात आपण बाधा आणता कामा नये' हे माणूस आता जणू विसरत चालला आहे. आपल्याला जंगलं हवीत, ती लाकडाच्या रूपातल्या कच्च्या मालासाठी! आपल्याला पृथ्वी हवी, ती नैसर्गिक साधनसंपत्तीसाठी! आपण फक्त घेणार! काय होईल निसर्गाचं अशा वागण्यानं?''

''आजचे विचारवंत खूप व्यथित झाले आहेत माणसाच्या निसर्गाकडून केवळ घेण्याच्या सवयीमुळे!








सर्वांनी होकारार्थी माना डोलावल्या.

''माणसाच्या या वागण्यामुळेच निसर्गाचा किंवा पर्यावरणाचा तोल ढासळून गेला आहे. असंख्य प्रकारचे सूक्ष्मजीव, किडे, पक्षी, प्राणी, वनस्पती यांच्यातले जे परस्परसंबंध आहेत त्यांत 'परस्परपूरकता' आहे. एकमेकांना पूरक आणि एकत्रपणे विचार केला, तर पर्यावरणाला पोषक अशा प्रकारानं हे मानवेतर सजीव काम करतात. ते काहीतरी घेतात आणि त्याचबरोबर देतातही. त्यामुळे निसर्गातील जी विविध चक्रं आपण

ही गोष्ट भविष्याविषयी चिंता निर्माण करणारी आहे. निसर्गाची खंडित झालेली चक्रं आणि तुटलेल्या साखळ्या यांचे दुष्परिणाम गेल्या दहा-वीस वर्षांपासूनच तीव्रतेनं जाणवू लागले आहेत. तुम्ही मुलं उगवत्या पिढीतली आहात. तुमच्या भावी पिढीचं भवितव्य तुमच्याच हातात आहे.''

माधवकाकांचे बोलणे ऐकताऐकता मुले विचारांत गढून गेली.



## नवीन शब्द शिकू या.

**पाखाडी** – चिरेबंदी अरुंद वाट. **मकरंद** – फुलातील मध. **खाक्या** – पद्धत. **व्यथित** – दु:खी. **वणवा** – जंगलात अचानक लागलेली आग.



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) माधवकाका आणि मुले अभ्यास करायला कोठे बसली होती?

(आ) 'पर्यावरण म्हणजे काय' याचे मुलांनी कोणते उत्तर दिले?

(इ) गुरे पर्यावरणाला कशा प्रकारे उपयोगी पडतात?

(ई) निसर्गचक्राविषयीची कोणती गोष्ट माणूस विसरला आहे?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मधमाश्या, झाडे, साप, गांडूळ हे निसर्गाचे संतुलन कशा प्रकारे राखतात?

(आ) मानव पर्यावरणाचा तोल बिघडवतो, असे का म्हटले आहे?

(इ) माणूस निसर्गाचा मालक असल्यासारखा वागतो, असे का म्हटले आहे?

(ई) आजचे विचारवंत व्यथित का झाले आहेत?

**प्र. ३. पाठातील योग्य शब्द योजून खालील वाक्यांतील गाळलेल्या जागा भरा.**

(अ) मधमाश्या मकरंद गोळा करतात, त्याच वेळी .................. घडवून आणतात.

(आ) सर्व प्राणी निसर्गाचं पोषण करतात; माणूस तेवढा त्याचं .................. करतो.

(इ) माणसाच्या वागण्यात अशी.................. नाही.



## लिहिते होऊ या.

- **पुढील अपूर्ण कथा वाचून ती पूर्ण करा.**

गोपाळ हा सात-आठ वर्षांचा रेल्वे स्थानकाजवळील झोपडीत राहणारा एक अनाथ मुलगा होता. तो हुशार आणि प्रामाणिकसुद्धा होता. शिक्षण घेणे हे त्याचे स्वप्न होते, पण वास्तवात दोन वेळचे पोटही भरत नव्हते. रेल्वे स्थानकावर लहानसहान वस्तू विकून तो कसाबसा उदरनिर्वाह करत होता.

अशातच एके दिवशी रेल्वे स्थानकावर गोंधळ माजला होता. कुण्या बड्या व्यक्तीची सुटकेस हरवली होती. सगळीकडे शोधाशोध सुरू होती. गोपाळची नजर तीक्ष्ण होती. लाल रंगाची एक पिशवी फलाटावर पडलेल्या सामानाच्या पोत्यांमागे घसरून पडलेली त्याला दिसली. आणि ..........................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................



## चर्चा करू या.

- निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी काय करायला हवे? याविषयी गटात चर्चा करा.



## खेळू या शब्दांशी

- पुढे दिलेल्या अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

(अ) र र्या प व ण-

(आ) ष्प म दु रि णा-

(इ) वं वि त र चा-

(ई) प न ध सं सा त्ती-



## जाणून घेऊ या.

- उच्चारांत बरेच साम्य असलेले; पण भिन्न अर्थ असणारे शब्द लिहिताना चुकल्यास विपरीत अर्थ दर्शवतात. केवळ ऱ्हस्व-दीर्घ, काना-मात्रा-अनुस्वार यांच्या फरकांमुळे अर्थ बदलतात, खालील शब्द वाचा व त्यांच्या अर्थातील फरक समजून घ्या.

| | |
|---|---|
| उदा., **ग्रह**- सूर्याभोवती फिरणारा गोल | **गृह**- घर |
| **उपहार**- नजराणा, भेट | **उपाहार**- फराळ |
| **संचित**- साठवलेले | **सचिंत**- चिंताग्रस्त |
| **पिक**- कोकीळ | **पीक**- धान्य |
| **पाणी**- जल | **पाणि**- हात |
| **लक्ष**- लाख, अवधान | **लक्ष्य**- नेम, साध्य |
| **दिन**- दिवस | **दीन**- गरीब |
| **सुत**- मुलगा | **सूत**- धागा |



## चला वाचू या.

- ग. दि. माडगूळकर यांची 'बिन भिंतीची शाळा' ही कविता मिळवून वाचा. कवितेचा आनंद घ्या व सारांश लिहा.



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** आंतरजालाच्या मदतीने विविध पर्यावरण गीतांचा संग्रह करा व वर्गात सादर करा.



## आपण समजून घेऊ या.

### काळ व त्याचे प्रकार

**काळ**

भूतकाळ | वर्तमानकाळ | भविष्यकाळ

भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांचे साधा, अपूर्ण, पूर्ण आणि रीती (चालू पूर्ण) असे ४ उपप्रकार आहेत.

* **वरील प्रकार–उपप्रकार समजून घेण्यासाठी खाली दिलेला तक्ता काळजीपूर्वक अभ्यासा आणि वाक्यांतील क्रियापदांत होणारे बदल समजून घ्या.**

| प्रकार | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| साधा | मी चित्र काढते. | मी चित्र काढले. | मी चित्र काढेन. |
| अपूर्ण | मी चित्र काढत आहे. | मी चित्र काढत होते. | मी चित्र काढत असेन. |
| पूर्ण | मी चित्र काढले आहे. | मी चित्र काढले होते. | मी चित्र काढले असेल. |
| रीती (चालू पूर्ण) | मी चित्र काढत असते. | मी चित्र काढत असे. | मी चित्र काढत जाईन. |

- **वरील काळ आणि त्याचे प्रकार अभ्यासून खालील तक्ता पूर्ण करा.**

| प्रकार | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| साधा | राघव कबड्डी खेळतो. | ................................. | राघव कबड्डी खेळेल. |
| अपूर्ण | ................................. | राघव कबड्डी खेळत होता. | ................................. |
| पूर्ण | राघव कबड्डी खेळला आहे. | ................................. | राघव कबड्डी खेळला असेल. |
| रीती (चालू पूर्ण) | ................................. | राघव कबड्डी खेळत असे. | ................................. |



## आम्हांला हे समजले.

- **पाठ्यपुस्तकात आलेल्या पुढील वाक्यांतील काळांचे प्रकार ओळखून वहीत लिहा.**

(१) शाळेतील वक्तृत्व स्पर्धा पार पडली.
(२) आईवडिलांनी अभिषेकचे कौतुक केले.
(३) या पत्रातून मी तुझ्याशी बोलत आहे.
(४) पहाटे पक्षी किलबिल करू लागतील.
(५) महिलांनी धावत येऊन त्याला मदत केली.

**शिक्षकांसाठी :** विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून काळांचे प्रकार ओळखण्याचा सराव करून घ्यावा.

# १५. आंब्याचा मोहोर

**देवीदास बागूल** (१९३१-२०१९) : व्यासंगी लेखक, समीक्षक, विचारवंत आणि छायाचित्रकार. 'शैशवदूत', 'नवे बालसंगोपन', 'कलेचे विकेंद्रीकरण', 'लौकिक ज्ञानेश्वर' आणि 'मोहोरणारी झाडे' ही पुस्तके प्रसिद्ध. हा पाठ बालभारती जुन्या मालेतून घेण्यात आला आहे.

हिवाळा संपून वसंत ऋतू सुरू झाला, की आंब्याच्या झाडांना मोहोर येतो. मोहोर आल्यावर संपूर्ण परिसर सुगंधाने दरवळतो. आंब्याचा मोहोर म्हणजे वसंत ऋतूचे आगमन व आनंदाची चाहूल होय. प्रस्तुत पाठातून लेखकाने वसंतऋतूतील आंब्याच्या झाडांना आलेल्या मोहोराचे व त्या काळातील विविध प्रसंगांचे वर्णन अतिशय सुंदर शब्दांत केले आहे.

शिशिर ऋतू म्हटला की झाडांच्या पानांची गळती डोळ्यांपुढे उभी राहते. काही अर्धीमुर्धी वाळलेली पाने फांद्यांच्या बोटांना धरून राहण्याचा प्रयत्न करतात; पण थोड्याच काळात ही पाने पोरकी होऊन घरंगळत खाली धुळीत येऊन पडतात. गुलमोहर, कडूनिंब, चिंच, वड यांची पाने तर सारखी भुरभुरत खाली पडताना दिसतात.

हिवाळा जसजसा वाढत जातो. तसतसा या झाडांचा मोहोर फुलतो, भरतो. शिशिर ऋतूची ही जादू मोठ्या आणि ठळक प्रमाणात दिसते ती आंब्याच्या अंगावर! मोहरलेल्या आंब्याचे दर्शन घ्यावे, तर भल्या सकाळी!

सकाळी सूर्योदय व्हायच्या आधी पूर्वक्षितिजावर केशरी-कुसुंबी रंगाचा पट्टा क्षितिजापाशी गडद आणि आभाळात हळूहळू विरळ होत जातो. मग तो आभाळाच्या निळ्या रंगात मिसळून नाहीसा होतो. रंगाचा असाच पट्टा संध्याकाळी नेमका पश्चिम क्षितीजावरही दिसतो. रंगाच्या या खेळात शुक्र आपल्या मोत्याच्या शुभ्रतेची चमक दाखवत असतो. केशरी परिसर असलेल्या निळ्या आकाशावर ही चांदीची टिकली मोठी खुलून दिसते, तेव्हा सकाळ-संध्याकाळ स्वागत करायला हिरव्या सृष्टीतर्फे फक्त आंब्याचा मोहोर काय तो पुढे होतो.



शिशिर ऋतू हिरव्या पानांच्या बाबतीत कर्दनकाळ भासला, तरी तो रंगांच्या बाबतीत मोठा रसिक कलावंत आहे. सकाळचे आणि संध्याकाळचे रंगकाम अति नाजूकपणे आणि विविध रीतीने करावे फक्त शिशिर ऋतूनेच!

या आंब्याच्या मोहोराने मनाला केवढातरी उल्हास वाटतो. मोहोर आला म्हणजे आता वसंतपंचमी लवकरच येणार. चैत्रातील गौराईची स्थापना होणार... म्हणजे खेळच खेळ! गौरीसाठी कोवळी कोवळी

आंब्याची पाने आणायची. तोपर्यंत आंब्याला तांबूस कोवळी पालवी आलेली असतेच. त्यानिमित्ताने आपल्या माहेरवाशीण बहिणीबरोबर आंबराईत जायचे, सूरपारंब्या खेळायच्या.

सूरपारंब्या हा खेळ खेळायला दोनच झाडे – एक वडाचे आणि दुसरे आंब्याचे. या झाडांच्या फांद्या जमिनीपासून फार उंच नसल्याने रिंगणातील काठी दूर भिरकावण्यासाठी झटकन उडी मारता येते आणि पटकन चढताही येते. आंब्याच्या फांद्या तशा मोठ्या सोईस्कर असतात. इतर झाडांना फांद्या फुटतात खांद्यापासून पुढे. म्हणूनच पिंपळ, कवठ ही झाडे सूरपारंब्या खेळायला सोईची वाटत नाहीत आणि शिवाय झाडावर चढण्यातला आनंदही ती देऊ शकत नाहीत. नुसते सरसर वर चढत जायचे यात काय मजा? आंब्याच्या झाडाच्या फांद्या सरळ उभ्या न जाता कधी समांतर तर कधी तिरकस अशा वाढत जातात. झाडावर चढण्याचाही एक खेळ असतो. अल्लडपणा असतो, याचा अनुभव आंब्याचे झाड चढताना अधिक येतो. झाडावर चढायला शिकायचे असेल, तर आंब्याइतके दुसरे सोईस्कर झाड नाही. नारळीपोफळीसारखी झाडे नुसता मल्लखांब करायला लावतात; पण आंब्याच्या डेरेदार झाडाच्या सर्व भागांतून वानरासारख्या उड्या मारत मनसोक्त हुंदडता येते.

सर्व झाडांमध्ये आपली जास्त मैत्री होते ती फक्त चिंच आणि आंबा या झाडांशी. चिंचेचा कोवळा तांबूस पाला खाण्यापासूनच चिंचेची मैत्री सुरू होते. पाल्यानंतर फुले, फुलांनंतर करंगळीच्या आकाराएवढ्या चिंचा, मग हिरवा चिंचोका असलेल्या चिंचा, गाभुळलेल्या चिंचा आणि शेवटी गुळाच्या रंगासारख्या चिंचा खाता खाता माघ महिना येऊन ठेपतो.

आधीच्या पौष महिन्यातील थंडीने आंब्याला जाग आलेली असते. मळकटलेल्या हिरव्या पानांतून पिवळसर हिरवे घोस डोके वर काढतात. तांबूस होत जातात. मधला देठ तर चांगलाच लाल होतो. या मधल्या देठाला फांद्या फुटलेल्या असतात आणि फांद्यांना तिळाच्या आकाराएवढी गोल फुले लगडतात. या पिवळसर शुभ्र फुलांना हळूहळू तांबूस छटा येते आणि या तांबूस छटेबरोबरच काहीसा उग्र मातकट वास दरवळू लागतो. झाडांपासून थोड्या अंतरावर येताच मोहोराचा वास जाणवतो. काकडून टाकणाऱ्या थंडीतही मन मोहरते.

हळूहळू होळीचे दिवस येतात आणि मोहोराची फुले झडू लागतात. मग फक्त मोहोराच्या फांद्यांचे फराटे तेवढे राहतात. या प्रत्येक फराट्याला चार-चार, पाच-पाच कैऱ्या दिसू लागतात.



एकदा आंबा पिकायला सुरुवात झाली, की झाडावर चढून रसाने भरलेला आंबा शोधून काढण्यात खरी मजा येते. या कामात पाखरांची चांगलीच मदत होते. आपल्या अगोदर कैरी पिकल्याचा सुगावा त्यांना लागलेला असतो. आपल्या चोचींनी त्या कैऱ्यांचा आस्वाद ती पाखरेच अगोदर घेतात.

आणि मग एके दिवशी आंबा उतरवण्याचा बेत ठरतो. चांगले शेंड्यापर्यंत चढणारे गडी बोलवले जातात. गडी वर चढले, की अगोदर पाड शोधतात. एखाददुसरा खाली टाकतात; पण जसजसे ऊन चढते तसतसे झोळणे भरभरून खाली येतात. कैऱ्यांनी खाली वाकलेल्या फांद्या पुन्हा ताठ होतात. तिसऱ्या प्रहरापर्यंत केवढा ढीग जमतो!

आंबा उतरवून झाला म्हणजे मला हुरहुर लागते. दोन-तीन महिन्यांच्या काळात आंब्याच्या झाडाचा खूपच लळा लागलेला असतो. आता यापुढे वर्षा ऋतूत वनदेवी खूप नटणार असते; पण तरीही मला आंब्याच्या झाडाची आठवण एकसारखी होतच राहते.



## नवीन शब्द शिकू या.

**पोरकी** – आईबाप नसलेली, कसलाही आधार नसलेली. **कर्दनकाळ** – क्रूर, निष्ठूर. **केशरी–कुसुंबी** – केशराच्या रंगाचा. **गौराई** – पार्वती. **सुगावा** – शोध, तपास. **आस्वाद** – चव. **पाड** – फळे पिकण्याची पहिली स्थिती.



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) रसिक कलावंत कोणाला म्हटले आहे? का?

(आ) आंब्याच्या मोहोराने लेखकाला उल्हास का वाटतो?

(इ) सूरपारंब्या खेळायला कोणती झाडे योग्य असतात? का?

(ई) आंबा आणि चिंच या झाडांशीच आपली मैत्री जास्त का होते?

(उ) लेखकाला आंब्याच्या झाडाची आठवण एकसारखी का होत राहते?

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**



विनामूल्य वितरणासाठी

प्र. ३. का ते सांगा.

(अ) सूरपारंब्या खेळायला वडाचे आणि आंब्याचे झाड सोपे असते.

(आ) लेखकाला शेवटी हुरहुर वाटते.



## खेळू या शब्दांशी

प्र. १. खालील आकृतीत दिल्याप्रमाणे शब्दाचे शेवटचे अक्षर सारखे असणारे शब्द वाचा.




- खालील शब्दातील शेवटचे अक्षर सारखे असणारे विविध शब्द शोधा व लिहा.

(अ) पिंपळ-

(आ) झाड-

(इ) चैत्र-

(ई) रंग-

प्र. २. 'रसिक' – 'रस' या शब्दाला 'इक' प्रत्यय लावून 'रसिक' हा शब्द तयार झालेला आहे. यासारखे इतर शब्द शोधा व त्या शब्दांची एकत्र यादी तयार करा.



## शोध घेऊ या.

- सहा ऋतूंचे वर्णन करणाऱ्या कविता पुस्तकांतून/आंतरजालाच्या मदतीने मिळवून वाचा.



## लिहिते होऊ या.

- 'मी पाहिलेली बाग' या विषयावर दहा ते पंधरा ओळींत निबंध लिहा.



## जाणून घेऊ या.

(अ) प्रहर ही वेळ मोजण्यासाठी एक प्राचीन भारतीय पद्धत आहे. खालील तक्त्यात दिवसाचे आणि रात्रीचे चार-चार प्रहर सविस्तर दिले आहेत. वाचा व समजून घ्या.

| कधी | घड्याळाची वेळ | प्रहर | प्रहराचे नाव |
|---|---|---|---|
| दिवसा | ६ ते ९ | १ ला | पूर्वान्ह |
| दिवसा | ९ ते १२ | २ रा | मध्यान्ह |
| दिवसा | १२ ते ३ | ३ रा | अपरान्ह |
| दिवसा | ३ ते ६ | ४ था | सायंकाल |
| रात्री | ६ ते ९ | ५ वा | प्रदोष |
| रात्री | ९ ते १२ | ६ वा | निशिथ |
| रात्री | १२ ते ३ | ७ वा | त्रियामा |
| रात्री | ३ ते ६ | ८ वा | उषा |

(आ) खालीलप्रमाणे ऋतूचक्राविषयी माहिती जाणून घेऊ या.




- खालील जाहिरात वाचा.

**भाषा प्रेमी मंडळ आयोजित**

**सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा**

सुंदर हस्ताक्षर कार्यशाळेत प्रवेशासाठी आजच प्रवेश नोंदणी करा.

वयोगट ८ ते १५

प्रवेश मर्यादित, माफक फी

**आमची वैशिष्ट्ये**

✻ तज्ज्ञ मार्गदर्शक

✻ लेखनाचा भरपूर सराव

✻ सरावासाठी शैक्षणिक साहित्याची उपलब्धता

✻ स्वच्छ, हवेशीर प्रशिक्षण वर्ग

**स्थळ :** गायत्री सभागृह, सांगली

**संपर्क :** ९६२३××××××

**कालावधी :** १ जाने ते ८ जाने.



## कृतीतून शिकू या.

- तुमच्या परिसरातील झाडांची पडलेली काही पाने गोळा करून त्यांच्या नावांसह, वैशिष्ट्यांसह ती पाने वहीत चिकटवा व विविध पानांची संग्रह वही तयार करा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून दिलेल्या जाहिरातीचे काळजीपूर्वक वाचन करून घ्यावे. त्यावर आधारित विविध प्रकारचे प्रश्न विचारावेत.

# १६. आम्ही असू वेगळे

## ● ऐका. म्हणा. वाचा.



तशाच हिरव्या वेलींवरची जरा निराळी फुले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।। धृ. ।।

देवाकडच्या वाटणीत जरि, कमी मिळाले काही
तक्रारीचा सूरही नाही, खंत जराशी नाही
व्यवहाराचे हिशेब त्याने, कुठे आम्हां शिकविले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।। १ ।।

म्हणून ईर्ष्या, द्वेष अशाची लागण आम्हां नाही
मला-तुला अन् माझे-तुमचे भाषा ठाऊक नाही
प्रेमाने जो हाक मारतो त्याला म्हटले अपुले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।। २ ।।

रस्त्याने जाताना आम्ही हात आईचा धरुनी
वळून बघता, खिदळता तुम्ही किती मनापासुनी
असतो आमुच्या तंद्रित आम्ही, काय आम्हांला कळे
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।। ३ ।।

कधी समारंभाला आम्ही नटुनी थटुनी येतो
का आईचा चेहरा तेव्हा बावरलेला असतो
या प्रश्नाचे उत्तर सांगा, आम्हास ते ना मिळे
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।। ४ ।।

जगात तुमच्या असेल बंदी, आम्ही असू वेगळे
स्वागत तुमचे, दार आमुच्या विश्वाचे परी खुले
एकवार या, निर्मळ बनुनी, जातील काळीजफुले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।। ५ ।।

**संजीवनी बोकील** (१९५१) : कवयित्री, कथाकार, कादंबरीकार, अनुवादक. ‘काळीजकुपी’, ‘एकांतरेघेवर’, ‘ओंजळीतले आभाळ’ हे काव्यसंग्रह, ‘फुलबाग’, ‘बुद्धिचातुर्य कथा’, ‘त्यांना उडू द्या’, ‘आनंदाची फुले’ हे बालकथासंग्रह प्रसिद्ध. प्रेमचंदांच्या निवडक कथा भाग १ ते ४ अनुवाद प्रकाशित. ग. दि. माडगूळकर श्रमसाहित्य पुरस्कार, संजीवन ग्रंथोत्तेजक पुरस्कार यांसारख्या विविध पुरस्कारांनी सन्मानित. ही कविता ‘किशोर’ सप्टेंबर २०२३ या मासिकातून घेण्यात आली आहे.

दिव्यांग मुलांमध्ये विशेष गुण आणि कौशल्ये असतात. योग्य प्रशिक्षण व प्रोत्साहन मिळाल्यास ही मुले मोठे यश मिळवू शकतात. समाजाने दिव्यांग मुलांकडे सहानुभूतीने नव्हे तर समजून घेऊन आणि आदराने पाहावे असा संदेश कवयित्री या कवितेतून देत आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक, सामूहिकरीत्या कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. दिव्यांग मुलांमध्ये असणाऱ्या विविध सुप्त गुणांसंबंधी माहिती द्यावी. प्रस्तुत कवितेची वैशिष्ट्ये, वेगळेपण आणि शैली सांगण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे.

## नवीन शब्द शिकू या.

**निर्मळ**– स्वच्छ. **खंत**– दु:ख. **खिदळणे**– मोठ्याने हसणे. **तंद्री लागणे**– वेगळ्या विचारात गुंग होणे. **बावरणे**– गोंधळणे. **विश्व**– जग. **खुले** – मोकळे, उघडे.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील मुलांना कोणती भाषा ठाऊक नाही?

(आ) कवितेतील मुले कोणाला 'आपली' मानतात?

(इ) कवितेतील मुलांना ईर्ष्येची लागण का होत नसेल?

(ई) कवितेतील मुलांना पडलेला प्रश्न कोणता?

**प्र. २. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) देवाने केलेल्या वाटणीत आम्हांला थोडे कमी मिळाले, तरी आमची तक्रार नाही.

(आ) तुमच्या जगात जरी आम्हांला बंदी असली, तरी आमच्या जगाचे दार तुमच्यासाठी उघडे असेल.

**प्र. ३. कंसातील योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.**

(अ) कवितेतील मुलांची हृदये ............... असतात.
(निर्मळ, प्रेमळ, सरळ, प्रांजळ)

(आ) कवितेत वर्णन केलेल्या मुलांना ............... लागण नाही.
(त्वेषाची, द्‌वेषाची, स्पर्धेची, खेदाची)

(इ) कवितेतील मुलाच्या आईचा चेहरा ............... असतो.
(गोंधळलेला, सुकलेला, घाबरलेला, बावरलेला)

(ई) सर्वसामान्यांच्या जगात ही मुले ............... असतात.
(वेगळी, निराळी, बावळी, चळवळी)

**प्र. ४. कवितेतील खालील ओळींचा अर्थ लिहा.**

(अ) 'तशाच हिरव्या वेलींवरची जरा निराळी फुले'

(आ) 'स्वागत तुमचे, दार आमुच्या विश्वाचे परी खुले'

## विचार करा व सांगा.

- **कवितेत उल्लेख केलेली 'निराळी' मुले कोणती असावीत, असे तुम्हांस वाटते? तुमच्या परिसरातील अशा दिव्यांग मुलांना आणि त्यांच्या पालकांना प्रश्न विचारून त्यांच्याशी संवाद साधा.**



## खेळू या शब्दांशी

**प्र. १. कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधा व लिहा.**

उदा., फुले – मुले इत्यादी.

**प्र. २. खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) तक्रारीचा सूर लावणे. (आ) खंत वाटणे.

(इ) लागण होणे.

**प्र. ३. खालील शब्दांसाठी समानार्थी शब्द लिहा.**

(अ) ...................... ← रस्ता → ......................

(आ) ...................... ← फूल → ......................

(इ) ...................... ← वेल → ......................

(ई) ...................... ← हात → ......................



## लिहिते होऊ या.

- **दिव्यांग मुले समाजाचा महत्त्वाचा भाग आहेत, याविषयी तुमचे मत लिहा.**



## जाणून घेऊ या.

- **वेगवेगळ्या क्षेत्रांत दिव्यांग मुलांनी केलेल्या कामगिरीची माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा, वाचा व त्यातून प्रेरणा घ्या.**



## चला वाचू या.

- **पुढील उतारा वाचा व योग्य शीर्षक सुचवा.**

दिव्यांग मुले ही आपल्या समाजाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. त्यांच्यात काही शारीरिक किंवा मानसिक अडचणी असल्या, तरी त्यांच्यातही अनेक गुण आणि क्षमता असतात. योग्य मार्गदर्शन, शिक्षण आणि प्रोत्साहन मिळाल्यास ही मुलेही उत्तम प्रगती करू शकतात.

दिव्यांग मुलांना विशेष काळजी, प्रेम आणि समजून घेण्याची गरज असते. त्यांच्या शिक्षणासाठी विशेष पद्धती, साधने आणि प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता असते. समावेशक शिक्षणामुळे ही मुले इतर मुलांसोबत शिकू शकतात, खेळू शकतात आणि समाजात आत्मविश्वासाने वावरू शकतात.

आपण सर्वांनी दिव्यांग मुलांशी संवाद साधावा. त्यांना मदत करावी आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवावा. त्यांच्यातील गुणांना प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. योग्य संधी आणि पाठबळ मिळाल्यास दिव्यांग मुलेही समाजात आपले स्थान निर्माण करू शकतात.

## संवादलेखन

- **खालील संवादलेखन वाचा.**

| कथा-कादंबरीतील संवादलेखन | नाटकातील संवादलेखन |
|---|---|
| विराज सहलीवरून घरी परत आल्यावर तेथील गमतीजमती आईबाबांना सांगू लागला. तो म्हणाला, ''आई, बाबा, आम्ही आज सहलीत खूप खेळलो.'' आईला उत्सुकता वाटली. तिने विचारले, ''अरे वा! कायकाय खेळलास तू?'' ''आम्ही ना, गाडीमध्ये अंताक्षरी खेळलो.'' विराज उत्साहाने सांगू लागला. ''खूप छान. मराठी गाणी येतात वाटतं तुला.'' बाबा हसत म्हणाले. विराज म्हणाला, ''हो बाबा.'' | **विराज :** आई, बाबा आम्ही आज सहलीत खूप खेळलो.<br>**आई :** अरे वा! कायकाय खेळलास तू?<br>**विराज :** आम्ही ना, गाडीमध्ये अंताक्षरी खेळलो.<br>**बाबा :** खूप छान. मराठी गाणी येतात वाटतं तुला!<br>**विराज :** हो बाबा. |

दोन किंवा अधिक व्यक्ती एकमेकांशी सहज बोलतात, तेव्हा त्यांच्यात संभाषण सुरू आहे असे म्हटले जाते. हेच संभाषण जेव्हा एखाद्या निश्चित, ठरलेल्या विषयानुसार केले जाते, तेव्हा त्यांच्यात संवाद सुरू आहे असे म्हणतात. असे संभाषण जेव्हा लिहून दाखवले जाते, तेव्हा त्याला '**संवादलेखन**' म्हणतात.

वरील दोन्ही संवादलेखन हे वेगवेगळ्या पद्धतींनी केलेले आहे. कथा-कादंबरीत वर्णनासह ''-'' अशा दुहेरी अवतरणचिन्हात संवाद लिहिले जातात, तर नाटकातील संवादलेखन बोलणाऱ्या पात्रांच्या नावापुढे **:** किंवा **-** असे चिन्ह देऊन केले जाते.

### संवादलेखन पूर्वतयारी

**संवाद**

| कोठे | किती व्यक्तींमध्ये | कोणत्या विषयांवर | सुरुवात कशी | शेवट कसा |
|---|---|---|---|---|

हे आधी निश्चित केल्यानंतर संवादलेखनाकडे वळू या.

- **संवादलेखन कसे करावे?**

(१) संवादासाठी योग्य विषय निवडावा.

(२) संवादलेखन सजीव अथवा निर्जीव घटकांवर आधारित असावे.

(३) बोलणाऱ्या व्यक्तीच्या तोंडी शोभेल अशी भाषा असावी.

(४) बोलीचाही उपयोग करावा.

(५) छोटीछोटी वाक्ये असावीत. विरामचिन्हे द्यावीत.

(६) केवळ प्रश्नोत्तर नसावे. विधानार्थी, उद्गारार्थी वाक्ये असावीत.

(७) संवादाची भाषा ओघवती असावी. तसेच कथानक पुढेपुढे नेणारी असावी.

- शाळेतील चित्रकला स्पर्धेची माहिती रिया आईला सांगत आहे. रिया व आईमधील संवाद कल्पना करून लिहा.

रिया– ..............................................................................

आई– ..............................................................................

रिया– ..............................................................................

आई– ..............................................................................

रिया– ..............................................................................

आई– ..............................................................................

रिया– ..............................................................................

आई– ..............................................................................

रिया– ..............................................................................

आई– ..............................................................................

- झाड व सूर्य यांच्या संवादांची कल्पना करून दहा ते बारा ओळींत संवाद लिहा.



## जाणून घेऊ या.

- भाषण अधिक आकर्षक, मनोरंजक व आनंददायी होण्यासाठी आपण काही शब्दांचा वापर करतो. असे काही मराठीतील सुंदर, रंजक शब्द खाली दिलेले आहेत. त्यांचा अर्थ समजून घ्या. असे अजून शब्द शोधा व तुमच्या भाषणात, लेखनात त्यांचा प्रभावी वापर करा.

(१) **गळ्यातील ताईत–** अतिशय प्रिय

(२) **उंबराचे फूल–** अत्यंत दुर्मीळ गोष्ट

(३) **पर्वणी–** उत्साहाचा काळ, दुर्मीळ संधी

(४) **अक्षरशत्रू–** निरक्षर, अडाणी

(५) **कूपमंडूक–** संकुचित वृत्ती

(६) **नवकोट नारायण–** खूप श्रीमंत

(७) **कर्दनकाळ–** महाभयंकर, विनाशक

(८) **जमदग्नी–** अतिशय रागीट मनुष्य

(९) **चौदावे रत्न दाखवणे–** कडक शिक्षा करणे.

(१०) **अष्टपैलू–** सर्व क्षेत्रात कौशल्य असणारा

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना संवादलेखनाबाबत मार्गदर्शन करावे. वेगवेगळे विषय देऊन विद्यार्थ्यांकडून संवादलेखनाचा सराव करून घ्यावा.

# १७. संगणकातील 'परम'पूज्य

**कविता भालेराव** (१९५८) : प्रसिद्ध लेखिका. मुक्त विज्ञान पत्रकारिता व चरित्रलेखन. त्यांची 'मैत्री करू या पर्यावरणाशी', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे' भाग १ व २, 'इतिहासातील रत्ने', 'जाणू या निसर्ग नवलाई', 'उलगडूया निसर्ग गुपिते', 'गणितयोगी डॉ. श्रीराम अभ्यंकर', 'राम ताकवले : परिवर्तनशील कुलगुरू' इत्यादी साहित्य प्रकाशित आहेत. 'मराठ्यांचा इतिहास ग्रंथसूची' या ग्रंथासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा म. म. दत्तो वामन पोतदार पुरस्काराने सन्मानित. 'सृष्टिज्ञान' या मराठीतून विज्ञानविषयक लेखन प्रकाशित करणाऱ्या मासिकाच्या कार्यकारी संपादिका होत्या. 'किशोर' दिवाळी अंक २००१ मासिकातून हा पाठ घेण्यात आला आहे.

प्रस्तुत पाठातून लेखिकेने जागतिक कीर्तीचे संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या मुलाखतीतून डॉ. भटकर यांचे कौटुंबिक जीवन, शिक्षण व त्यांच्या अंगी असलेल्या प्रयोगशीलता व आत्मविश्वास याचे वर्णन केले आहे.



**जागतिक कीर्तीचे संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांचे नाव तुम्हांला सर्वांनाच माहिती आहे. 'संगणक आणि माहिती तंत्रज्ञान' या क्षेत्रामध्ये अतुलनीय कामगिरी बजावून भारताची मान आणि शान उंचावणाऱ्या या संगणकतज्ज्ञाचे लहानपण कसे गेले असेल? ते किती शिकले आहेत? कोणती कामे त्यांनी केली आहेत? त्यांना किती पुरस्कार मिळालेत? असे कितीतरी प्रश्न तुमच्या मनात आले असतील. या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी मी डॉ. भटकर यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीतून त्यांच्या बालपणीचे काही प्रसंग आणि इतर माहिती तुम्हांला वाचायला मिळेल.**

**लेखिका :** शाळकरी वयातील मुलांना तुमच्या बालपणाविषयी जाणून घ्यायची खूप इच्छा आहे. तेव्हा आपण काही सांगाल का आपल्या घराबद्दल, कुटुंबाबद्दल?

**डॉ. भटकर :** माझे बालपण अकोला जिल्ह्यातल्या मूर्तिजापूर तालुक्यातल्या मुरंबा या खेडेगावात गेलं. माझी आई शिक्षिका होती आणि माझी आजीही त्या काळी शिक्षिका होती. त्यामुळे घरात चांगले शैक्षणिक वातावरण होते. आम्ही सर्व जण मिळून एकत्रित पुस्तक वाचन करायचो. माझे आजोबा दोन वर्तमानपत्रांचे संपादन करत होतं. माझे वडीलही चांगले शिकलेले होते. त्यांना सार्वजनिक कामात खूप रस होता. स्वातंत्र्यलढ्यातही त्यांनी भाग घेतला होता. अशा शैक्षणिक वातावरणाचा, आजी-आजोबांच्या संस्कारांचा माझ्यावर फार चांगला परिणाम झाला. माझा मोठा भाऊ आणि मी नेहमी एकत्र खेळायचो. एवढचं काय, पण मी शाळेत जायला कबूल झालो, ते 'भावाच्या वर्गात बसू दिले तरच', ही विचित्र अट घालून! खरंतर भाऊ चौथीत व मी दुसऱ्या इयत्तेत! परंतु मी मात्र रोज चौथीच्या वर्गात बसे. परीक्षेच्या वेळी मात्र चांगलीच पंचाईत आली.

त्या काळी शिक्षणाधिकारी परीक्षा घ्यायला येत. आमची शाळा देवळात भरत असे. तिथेच मी चक्क चौथीची परीक्षा दिली. तेव्हा तो अगदी थट्टेचा विषय झाला होता; पण मला त्याची पर्वा नव्हती. वडील मात्र चिंतेत होते. शेवटी त्या शिक्षणाधिकाऱ्यांनी माझे पेपर तपासले आणि ते फार आश्चर्यचकित झाले. कारण मी साडेसात वर्षांचा असूनही माझी चौथीची तयारी उत्तम होती. माझं लिखाण दोन-दोनदा तपासून त्यांनी मला चौथी पास असा शेरा दिला. त्या काळात ही गोष्ट सर्वांना धक्का देणारी होती. त्याची चर्चा झाली आणि 'विजय भटकर चौथी पास' या प्रगतिपुस्तकावरील शेऱ्यानं आई-आजीला माझं खूप कौतुक वाटलं. मी अठरा वर्षांचा होण्यापूर्वीच इलेक्ट्रिकल इंजिनिअर झालो.

**लेखिका :** तुमच्या शालेय आयुष्यातील अजून काही आठवणी सांगाल का?

**डॉ. भटकर :** हो तर! आमच्या घरीच अवांतर वाचन होत असल्यामुळे मी आणि माझा भाऊ दोघंही

अभ्यासात आणि इतर उद्योगांमध्ये हुशार होतो. माझी शाळा खेड्यातली! त्यामुळे शाळेच्या प्रयोगशाळेत विज्ञानाचे प्रयोग करण्यासाठी साधनं अपुरी पडत. माझ्या भावाची आणि माझी काहीतरी नवीन करण्याची सारखी धडपड चाले. शाळेत विज्ञान-प्रयोग करायला परीक्षानळ्या कमी पडत. त्यासाठी आम्ही एक धाडसी उपाय शोधला होता. आम्ही दोघं गावातल्या दवाखान्यांमध्ये जायचो. तेथील वाया गेलेल्या इंजेक्शनच्या पिचकाऱ्या उचलून आणायचो. त्या स्वच्छ करायच्या, कापायच्या आणि टेस्ट-ट्यूब्ज म्हणून वापरायच्या. हे खरंतर खूप धोकादायक होतं. अर्थात हे आमचे उद्योग आमच्या आईला माहिती असायचे; पण ती कधी 'हे करू नका' असं म्हणायची नाही. उलट नवीन गोष्टी करण्यासाठी प्रोत्साहन द्यायची. आम्ही आमच्या घरीच प्रयोगशाळा केली होती. तिथे विविध प्रयोग करत असू. त्यासाठी निरनिराळे रासायनिक पदार्थ जमवणं, घरातल्या वाया गेलेल्या बाटल्या, झाकणं, दोरा अशा सामानातून प्रयोगशाळेसाठी साहित्य तयार करायचो.

**लेखिका :** तुम्ही परीक्षेचा अभ्यास कधी आणि कसा करत होता?

**डॉ. भटकर :** आमच्या या पुस्तकाबाहेरील उद्योगांना आईची परवानगीच नव्हे, तर चक्क पाठिंबा होता; परंतु ती शाळेत शिक्षिका असल्यानं अभ्यासासाठी कठोर परिश्रम आम्हांला करावेच लागत. त्यात कुठलीही तडजोड तिला मान्य नव्हती. तसेच शाळा-महाविद्यालयामध्ये हस्तलिखित तयार करण्यासाठी मी आणि माझा भाऊ दोघंही ग्रंथालयाचा उपयोग करत असू. मी कॉलेजमध्ये असताना कॉलेजच्या ग्रंथालयातील पदार्थविज्ञानाची व रसायनशास्त्राची सर्व पुस्तकं नजरेखालून घातली होती. या अभ्यासाच्या सवयीमुळेच मी कॉलेजमध्ये असताना छोटा रेडिओ-ट्रान्झिस्टर तयार केला होता. ही सन १९६३-६४ ची गोष्ट आहे. तेव्हा वसतिगृहातल्या खोलीत आम्ही मित्रांनी त्या रेडिओवरून गाणी ऐकण्याचा आगळा आनंद मिळवला होता.

मी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगला प्रवेश घेतला आणि माझे विजेच्या तारांशी प्रयोग करण्याचे उपद्व्याप सुरू झाले. एकदा घरातच चुकून मला विजेचा धक्का बसला. मी जोरात उडून भिंतीवर आदळलो. थोडा वेळ माझी शुद्धच गेली होती; परंतु अशा संकटकाळीही माझ्या आईनं मला जोरात ओढलं. तिला शॉक बसला. या भयंकर प्रकरणामुळे माझ्या वडिलांनी मला 'इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या वर्गातून काढून सिव्हिल इंजिनिअरिंगच्या शाखेत प्रवेश द्यावा', असं चक्क कॉलेजमध्ये जाऊन सांगितलं; पण ते काही जमलं नाही.

**लेखिका :** तुमच्या कायम लक्षात राहिलेला एखादा प्रसंग सांगाल का?

**डॉ. भटकर :** तसे प्रसंग अनेक आहेत; परंतु माझ्या नोकरीत, अनेक अवघड निर्णय घेताना, मला नेहमी उपयोगी पडलेला एक प्रसंग मी मुद्दाम तुम्हांला सांगतो.

माझं पदव्युत्तर शिक्षण बडोद्यात झालं. मी बडोद्यात असताना आमच्या कौटुंबिक अडचणी वाढल्या होत्या.

आमची आर्थिक परिस्थिती ढासळली होती. त्यात दुष्काळाची भर! त्यामुळे शेतीचं उत्पन्नही मिळालं नव्हतं. साहजिकच घरातल्या सर्वांचं लक्ष मी केव्हा एकदा शिक्षण पूर्ण करून कुटुंबाच्या गरजा भागवण्यासाठी हातभार लावीन इकडेच होतं. त्याच वेळी बडोद्यात प्रचंड पाऊस पडून मोठा पूर आला होता. खूप हानी झाली होती. दुष्काळ आणि पूर अशा दोन परस्परविरोधी नैसर्गिक आपत्तींकडे बघताना मला आणि माझ्या मित्रांना वाटू लागलं, की आपण सामाजिक कार्य केलं पाहिजे. आपण स्वयंसेवक होऊ या. आम्ही एका देवळात रात्री ११ वाजता जमायचं ठरवलं आणि तिथेच आपली प्रमाणपत्रे जाळू या असा विचार केला. अर्थात हे करण्यासाठी आईची परवानगी घ्यायला हवी, असं माझ्या लक्षात आलं. मी ताबडतोब आईला पत्र पाठवून माझा मनोदय कळवला. तिनं

शांतपणे पण लगेचच उलट टपाली पत्र लिहिलं. त्यात तिनं, ‘तू कोणतंही चांगलं अगर वाईट कृत्य करताना स्वत:च्या अंतर्मनाला विचार आणि त्या आतल्या आवाजानुसार वाग.’ असं लिहिलं होतं. या तिच्या सांगण्यामधील अर्थ माझ्या लक्षात आला. आजही हे तिचं उत्तर मी माझ्या प्रत्येक कामासाठी ‘निकष’ म्हणून लावतो आणि अंतर्मनाचा कौल जणू काही मला माझी आईच देते आहे, असा भास होतो.’ ‘घट्ट कौटुंबिक प्रेमळ नात्याच्या आधारावर मी यश मिळवू शकलो आहे,’ असं त्यांनी आवर्जून सांगितले.

या आठवणी सांगताना भटकर सर पूर्णपणे आपल्या बालपणात हरवून गेले होते. या प्रत्येक आठवणीत आजी-आजोबा, आईवडील आणि इतर कुटुंबीय यांच्याबद्दलची कृतज्ञता त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. मुलाखत घेऊन परत येताना डॉ. भटकर सरांच्या लहानपणापासूनच्या प्रयोगशीलतेचे, मोठ्या आत्मविश्वासाने मिळवलेल्या ज्ञानाचे व उपक्रमशीलतेचे मनोमन कौतुक वाटत होते. या त्यांच्या यशस्वी कारकिर्दीतून तुम्हा मुलांनाही प्रेरणा मिळेल याची खात्री वाटते.



## नवीन शब्द शिकू या.

**अतुलनीय** – ज्याची तुलना होऊ शकत नाही असा. **प्रोत्साहन** – प्रेरणा, उत्तेजन. **आपत्ती** – संकट. **मनोदय** – इच्छा. **कृतज्ञता** – उपकाराची जाणीव. **व्यस्त** – गर्क.



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. कृती करा.**

(अ) **डॉ. भटकर यांनी बालपणात प्रयोगशाळेसाठी वापरलेले घरगुती साहित्य**

→ ................. → ................. → ................. → .................

(आ) **बडोद्यात आलेल्या दोन परस्परविरोधी नैसर्गिक आपत्ती**

→ ................. → .................

**प्र. २. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आजी-आजोबांच्या संस्कारांचा लेखकावर कोणता परिणाम झाला?

(आ) लेखकाने व त्यांच्या भावाने विज्ञानाचे प्रयोग करण्यासाठी कोणता धाडसी उपाय शोधला?

(इ) प्रयोगशाळेसाठी लेखकाने कोणते साहित्य तयार केले?

(ई) चांगल्या-वाईट कामांसाठी लेखक कोणते निकष लावतात?

**प्र. ३. खालील कृतींचा डॉ. भटकर यांच्यावर झालेला परिणाम लिहा.**

(अ) 'डॉ. विजय भटकर चौथी पास' या प्रगतीपुस्तकावरील शेरा.

(आ) डॉ. भटकर यांना प्रयोग करत असताना घरातच चुकून विजेचा धक्का बसला.



## विचार करा व सांगा.

- **'तू कोणतंही चांगलं अगर वाईट कृत्य करताना स्वत:च्या अंतर्मनाला विचार आणि त्या आतल्या आवाजानुसार वाग', या वाक्यातील आशयावर विचार करा व तुमचे मत सांगा.**



## लिहिते होऊ या.

- **तुमच्या परिसरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या एखाद्या व्यक्तीची मुलाखत घेण्यासाठी किमान दहा प्रश्नांची प्रश्नावली तयार करून लिहा.**



## खेळू या शब्दांशी

**प्र. १. कंसातील वाक्प्रचारांचा दिलेल्या वाक्यांत योग्य ठिकाणी उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अंगाचा तिळपापड होणे, गर्क असणे, गट्टी जमणे.)

(अ) बालकुमार चित्रकला स्पर्धेसाठी सर्व मुले चित्रे काढण्यात दंग झाली.

(आ) अन्वर आणि रोहन यांची स्नेहसंमेलनातून चांगलीच मैत्री झाली.

(ई) रस्त्यावर टाकलेला कचरा पाहून स्वच्छतादूत यांना खूप राग आला.

**प्र. २. खालील कोड्यातील वाक्प्रचार शोधा व लिहा.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धू | वा | णे | धा | पां | डो | के | अं | ब | र |
| क | म | सू | व | ग | ळ्यां | ळा | ज | नू | णे |
| कं | नू | ठो | णे | फे | त | पी | ला | ळ | प्रा |
| स | ब | ग | क | ड | ते | णि | गा | ग | के |
| पू | गं | र | ळा | णे | ल | म | न | पं | णे |
| भ | र | णे | क | रा | घा | कू | कां | च | द |
| क्ष | क | म | क | स | ल | डे | टो | ठो | डी |
| ना | क | मु | र | ड | णे | न | च | न | मा |
| ल | क्ष | वे | ध | णे | का | कां | त | ज | र |
| क | ठे | र | हा | त | भा | र | ला | व | णे |

## जाणून घेऊ या.

- **डॉ. विजय भटकर यांनी भूषवलेली काही पदे व कामगिरी**
  - ✻ त्रिवेंद्रम येथील इलेक्ट्रॉनिक्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटरचे संचालक (१९८०-८७).
  - ✻ टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेसचे उपाध्यक्ष.
  - ✻ भारत सरकारचा उपक्रम असलेल्या केलट्रॉन (KELT-RON) या संस्थेचे कार्यकारी संचालक.
  - ✻ सी-डॅक या संस्थेचे संस्थापक, कार्यकाही संचालक. 'परम' (PARAM) या सुपर कॉम्प्युटरच्या निर्मितीची अद्‌वितीय कामगिरी. १९९१ मध्ये परम-८००० आणि १९९८ मध्ये परम-१०,००० ची निर्मिती.
  - ✻ एज्युकेशन-टू-होम (ETH) या रिसर्च लॅबोरेटरीचे अध्यक्ष.
  - ✻ फिशनेट (Fishnet) डीएसएल लिमिटेड या संस्थेचे अध्यक्ष.

- **डॉ. विजय भटकर यांना मिळालेले पुरस्कार**
  - ✻ इलेक्ट्रॉनिक्स मॅन ऑफ द इयर, १९९२ अॅवॉर्ड.
  - ✻ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्ली अॅवॉर्ड - १९९४.
  - ✻ एच. के. फिरोदिया पुरस्कार - १९९५-९६.
  - ✻ लोकमान्य टिळक पुरस्कार - १९९९.
  - ✻ ओमप्रकाश भसिन फाउंडेशन पुरस्कार-२०००.
  - ✻ पद्‌मश्री - २०००.
  - ✻ महाराष्ट्र भूषण १९९९-२०००.

- **मुलाखत तंत्राविषयीची माहिती वाचा.**

एखाद्या व्यक्तीशी संवाद साधून तिचे विचार, जीवनकार्य, वैशिष्ट्यपूर्ण जडणघडण लोकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी व थेट माध्यम म्हणजे मुलाखत होय. मुलाखत घेणे हे कौशल्यपूर्ण काम आहे. मुलाखतकाराने मुलाखत घेण्याआधी विविध स्तरांवर तयारी करावी लागते. ज्यांची मुलाखत घ्यायची, त्यांच्याशी संपर्क साधून मुलाखतीचा उद्देश स्पष्ट करायला हवा. संबंधित व्यक्तीने मुलाखतीस परवानगी दिल्यास मुलाखतकाराने मुलाखतीच्या अनुषंगाने प्रश्नावलीची रचना करायला हवी. मुलाखतीचे प्रश्न हे चढत्या क्रमाने, श्रोत्यांची उत्कंठा वाढवतील असे असावेत. मुलाखत ही समोरच्या व्यक्तीला समजून घेण्याचे माध्यम आहे. तिच्या जीवनातील प्रेरणादायी, कलाटणी देणारे प्रसंग व जीवनप्रवास हळुवार उलगडणारा हा प्रवास असावा. व्यक्तीचा समग्र प्रवास जाणून घेताघेता तिच्या मर्मबंधाचा ठेवा श्रोत्यांसाठी उलगडणारी प्रश्नरचना असावी. मुलाखत देणाऱ्याचा आत्मसन्मान दुखावेल असे प्रश्न मुलाखतकाराने टाळावेत. मुलाखत ही व्यक्तीच्या अनुभवाचा व कर्तृत्वाचा वेध घेणारी एक संवाद प्रक्रिया आहे.

## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** (१) प्रावीण्यप्राप्त विद्यार्थी/शिक्षक यांच्या मुलाखतीचे आयोजन करा व मुलाखत घ्या.
  (२) विविध समाजमाध्यमांवर उपलब्ध असणाऱ्या यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती ऐकून त्यावर वर्गात चर्चा करा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून विविध यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती वर्गात ऐकवून त्यावर चर्चा घडवून आणावी.

# १८. हा देश माझा

- **ऐका. म्हणा. वाचा.**

हा देश माझा याचे, भान जरासे राहू द्या रे ।। धृ ।।

हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
ह्या गंगा यमुना, शेती धरती, बागबगीचा माझा
अभिलाषा यांची धरिता, कुणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया, स्फुरण आपल्या बाहू पावू द्या रे ।। १ ।।

जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात, थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहिसा अर्थही येऊ द्या रे ।। २ ।।

जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती
परी अभंग असू द्या सदैव अपुली माणुसकीची नाती
द्या सर्व दूर ललकारी, फुंका रे एक तुतारी
संदेह रोष जे, द्वेष मनातील वाहून जाऊ द्या रे ।। ३ ।।





**सेनापती बापट** (१८८०-१९६७) : पांडुरंग महादेव बापट उर्फ सेनापती बापट हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील थोर स्वातंत्र्यसैनिक होते. मेकॅनिकल इंजिनिअर होण्यासाठी ते इंग्लंडला गेले. तेथे असताना भारतीय स्वातंत्र्याविषयी आस्था निर्माण झाल्याने शिक्षण अर्धवट सोडून ते मायदेशी परतले आणि 'सेनापती' म्हणून ओळखले जाऊ लागले. 'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ', 'गोवामुक्ती संग्राम' या चळवळींमध्ये त्यांनी स्वत:ला झोकून दिले. ही कविता 'राष्ट्रीय एकात्मता गीते' या संकलित काव्यसंग्रहातून घेण्यात आली आहे.

प्रस्तुत कवितेतून कवीने आपल्या मातृभूमीबद्दलचा अभिमान व कृतज्ञता व्यक्त केली आहे. भारत देश हा विविधतेने नटलेला, निसर्गसंपन्न आणि संस्कृतीने समृद्ध असा देश आहे. या कवितेतून देशप्रेम, एकता आणि कर्तव्य भावना यांचे महत्त्व स्पष्ट होते.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक, सामूहिकरीत्या कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. देशभक्तीपर गीते ऐकवावीत. विद्यार्थ्यांना देशासाठी बलिदान दिलेल्या अनेक क्रांतिकारकांची माहिती द्यावी. कवितेची शैली व वैशिष्ट्ये यांबाबत चर्चा करण्यास सांगावे.

## नवीन शब्द शिकू या.

**अभिलाषा** – इच्छा. **स्फुरण** – उत्साह. **बाहू** – हात, भुजा. **वर्षाव** – मारा करणे. **सामर्थ्य** – ताकद, बळ. **व्यर्थ** – वाया, निष्फळ. **ललकारी** – गर्जना, घोषणा. **संदेह** – संशय, शंका.

## आम्हांला हे समजले.

**प्र. १. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) 'हे बंद करा उत्पात, थांबवा आपुला घात' असे कवीने का म्हटले असावे?

(आ) 'संदेह रोष जे, द्वेष मनातील वाहून जाऊ द्या रे' या ओळीतून कवीने कोणता संदेश दिला आहे?

**प्र. २. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) देशद्रोहासाठी सरसावलेले हात देशकार्याला लावावे.

(आ) जातिधर्माच्या विविधतेसाठी माणुसकी टिकायला हवी.

**प्र. ३. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) विशाल | (१) देश |
| (आ) उंच | (२) नाती |
| (इ) माझा | (३) सागर |
| (ई) अभंग | (४) हिमालय |

## विचार करा व सांगा.

- **खालील ओळींचा अर्थ तुमच्या शब्दांत सांगा.**

  जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
  रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला

## शोध घेऊ या.

**प्र. १. आंतरजालाच्या साहाय्याने भारताच्या स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या पाच क्रांतिकारकांच्या कार्यांची माहिती मिळवा.**

**प्र. २. सेनापती बापट यांच्या स्वातंत्र्यसंग्रामातील योगदानाविषयी अधिक माहिती मिळवा.**

**प्र. ३. देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता या संदर्भातील घोषवाक्ये शोधा व लिहा.**

## आपण समजून घेऊ या.

**श्लेष अलंकार**

- **खालील वाक्ये वाचा.**

आम्ही आपले सुमनाने स्वागत करतो.

मित्राच्या उदयाने कोणास आनंद होत नाही!

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द पाहा. या शब्दांचे दोन अर्थ आहेत.

* सुमन– फूल, चांगले मन * मित्र– सखा, सूर्य

**एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृती साधते, तेव्हा 'श्लेष' अलंकार होतो.**

- **खालील ओळी वाचून त्यातील श्लेष अलंकार होणारे शब्द ओळखून त्याचे दोन अर्थ लिहा.**

(१) हे मेघा, तू सर्वांना जीवन देतोस.

(२) श्रीकृष्ण नवरा मी नवरी ।

शिशुपाल नवरा मी न वरी ॥

- **शिक्षकांच्या मदतीने श्लेष अलंकाराची पाच उदाहरणे तयार करून लिहा.**

## कृतीतून शिकू या.

**प्र. १. खाली दिलेल्या शब्दांतील स्वर आणि व्यंजने ओळखून त्याप्रमाणे फोड करून तक्ता पूर्ण करा.**

| शब्द | फोड |
|---|---|
| पाऊस | प् + आ + ऊ + स् + अ = पाऊस |
| औक्षण | |
| सुंदर | |
| दु:खदायी | |

## सारे हसू या.

**रोहित** : प्रकाश, अरे हे बोटावर काय लिहीत आहेस.

**प्रकाश** : अरे, हे अंक आहेत.

**रोहित** : तू बोटावर अंक का लिहीत आहेस?

**प्रकाश** : अरे, माझी आजी म्हणते आपल्याला नुसत्या बोटावर आकडेमोड करता आली पाहिजे.

## अहवाल लेखन

एखाद्या संस्थेत किंवा कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाची, समारंभाची योग्यप्रकारे नोंद करून ठेवणे म्हणजे 'अहवाल लेखन' होय. ते करताना त्यात कार्यक्रमाचा हेतू, तारीख, सहभागी व्यक्ती, प्रतिसाद, समारोप इत्यादी विविध मुद्दे विचारात घेतले जातात.

- **अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये**

(१) वस्तुनिष्ठपणा व सुस्पष्टता (२) विश्वसनीयता (३) सोपी व औपचारिक भाषा
(४) क्रमवार, मुद्देसूद मांडणी (५) आटोपशीरपणा

अहवाल लेखन हे विषयाच्या स्वरूपानुसार केले जाते. तो आटोपशीर असावा मात्र अर्धवट असू नये याची काळजी अहवाल लेखनात घ्यावी लागते. त्यात जे घडले, जसे घडले याला महत्त्व असते. सरावाने असे अहवाल लेखन अधिक चांगले जमू शकते.

### अहवाल
### मराठी भाषा गौरव दिन

आज आमच्या शाळेत 'मराठी भाषा गौरव दिन' अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज-वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने मराठी भाषेचा वारसा आणि महत्त्व जपण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. शाळेचे मुख्याध्यापक श्री. अरुण पवार सर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी पुढील उपक्रम राबवण्यात आले. सकाळी ८ वाजता विद्यार्थ्यांनी गावातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. ''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...'' या गीताने आसमंत दुमदुमला. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या प्रसिद्ध कवितांचे वाचन केले. कु. प्रिया पांचाळ हिने मराठी भाषेवर स्वरचित कविता सादर केली.

'माझी मराठी' या विषयावर अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त भाषणे केली. शाळेच्या वाचनालयातील निवडक पुस्तकांचे प्रदर्शन श्री. प्रदीपकुमार मोरे सर यांच्या मार्गदर्शनात भरवण्यात आले. मुख्याध्यापक श्री. अरुण पवार यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाचे महत्त्व पटवून दिले. शाळेचे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. अविनाश जाधव सर यांनी सर्वांचे आभार मानले.

**स्थळ :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आलेगाव.

**दिनांक :** २७ फेब्रुवारी.



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** तुमच्या शाळेत साजरा करण्यात आलेल्या प्रजासत्ताक दिनाचा अहवाल लिहा.

# १९. खरी संपत्ती

**सुधा मूर्ती** (१९५०) : प्रसिद्ध लेखिका. त्यांची 'वाइज अँड अदरवाइज', 'सामान्यांतले असामान्य', 'अस्तित्व', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'गोष्टी माणसांच्या' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. हा पाठ 'गोष्टी माणसांच्या' या कथासंग्रहातून घेण्यात आला आहे.

वाचनालयामुळे वाचनाची सवय लागते, ज्ञान वाढते आणि विचारशक्ती विकसित होते. वाचनालयातील विविध प्रकारांची पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे आणि संदर्भग्रंथ वाचून विविध प्रकारची माहिती मिळते. प्रस्तुत पाठातून लेखिकेने ज्ञान संपन्न होण्यासाठी वाचनालयाचे महत्त्व सांगितले आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचनालयाचा उपयोग करून अधिकाधिक समृद्ध होण्याचा संदेश या पाठातून दिलेला आहे.

मी एका मध्यमवर्गीय शिक्षकाच्या घरातली मुलगी, त्यामुळे कोणत्याही शिक्षकाच्या घरी जे असेल, तेच आमच्याही घरी होते. पुस्तके आणि ज्ञान हीच खरी संपत्ती असे आमच्याकडे मानण्यात येई.

लहानपणी मी माझ्या आजीआजोबांजवळ एका लहानशा खेड्यात राहत असे. गावचे लोक माझ्या आजोबांना कसा मान द्यायचे, ते अजूनही मला आठवते. आमचे आजोबा बसलेले असायचे. त्यांच्या हातात एक पुस्तक असायचे. गावातील अनेक लोक त्यांच्याकडे सल्ला मागायला यायचे. गावातला सर्वांत श्रीमंत माणूस जरी आमच्या दारावरून जात असला, तरीसुद्धा तो आजोबांना आदराने नमस्कार करून जाई. मी एकदा त्यांना विचारले, ''शिक्षकांना एवढा मान का द्यायचा असतो?'' त्यावर ते हलकेसे हसले आणि त्यांनी मला एक गोष्ट सांगितली.

''महाभारतातील महापराक्रमी योद्धा अर्जुन त्याच्या मित्रांसमवेत बसला असताना त्याला त्याच्या मित्रांनीही हाच प्रश्न विचारला, 'आपले गुरू द्रोणाचार्य यांच्याविषयी तुला एवढा आदर का वाटतो ?' द्रोणाचार्य वृद्ध होते, निर्धन होते आणि त्यांच्या मालकीचे कोणतेही राज्य वगैरे नव्हते; तरीही अर्जुन नेहमीच नम्रपणे त्यांच्या पायांशी बसत असे. अर्जुन म्हणाला, ''या जीवनात सर्वच गोष्टी नाशवंत आहेत. आपण आपल्याजवळील कोणतीही गोष्ट इतरांना दिल्याने ती आपल्याकडून जाते, कमी होते ... मग ती हिरेमाणकं असोत, सोनंनाणं असो, नाहीतर जमीन असो. एवढंच काय, सौंदर्यसुद्धा कालांतराने कमी होत जाते. फक्त एकच गोष्ट अविनाशी आहे, ती म्हणजे ज्ञान. तुम्ही जेवढं ते भरभरून दुसऱ्याला देत राहाल, तेवढं ते वाढत जातं. गुरू हा शिष्याला सतत ज्ञान देत असतो, म्हणून माझ्या दृष्टीने गुरू हा सर्वांत श्रीमंत असतो आणि म्हणूनच गुरुजींना किंवा शिक्षकांना एवढा आदर मिळतो. त्यांच्याकडे किती धनसंपत्ती आहे, याच्यावर तो अवलंबून नसतो. शिक्षक हे ज्ञानाचं निधान असतं. ''



माझे आजोबा अत्यंत साधे आणि शिस्तप्रिय होते. त्यांच्याकडून मी खूप काही शिकले. लहानपणी घराबाहेर पडून मी सर्वांत लांबची चक्कर पहिल्यांदा मारली ती आमच्या गावच्या वाचनालयात. मी पुढे आयुष्यात ज्या अनेक वाचनालयांमध्ये पाऊल ठेवले, त्यांतील हे पहिलेच होते.

एकदा सायंकाळच्या वेळी मी आणि आजोबा घरी निघालो होतो. माझ्या आजोबांना अंधारात नीटसे दिसत नसे; त्यामुळे मी त्यांना हाताला धरून नेत होते. त्यांनी अचानक मला विचारले, ''हे बघ, मी आता कवितेची एक ओळ म्हणतो. तू ती कविता पूर्ण करशील ? चांगली प्रसिद्ध कविता आहे ....

मी म्हणाले, ''प्रयत्न करीन.'' आम्ही हा खेळ खूपदा खेळायचो; त्यामुळे माझ्या कितीतरी कविता पाठ झाल्या होत्या. ते म्हणाले, ''जर मला पंख असतील तर...'' मी डोळ्याची पापणीही न हलवता क्षणार्धात म्हणाले, ''...मी शेजारच्या गावच्या वाचनालयात जाईन, खूप खूप पुस्तकं वाचीन.''

माझ्या तोंडचे शब्द ऐकून माझे आजोबा चालताचालता थांबले. ते म्हणाले, ''परत म्हण बघू.''

मी परत तीच वाक्ये उच्चारली.

''मी शेजारच्या गावच्या वाचनालयात जाईन, खूप खूप पुस्तकं वाचीन.''

त्यावर त्यांना हसू आले. ''काय मजेशीर पद्धतीने कविता पूर्ण केलीस गं तू ! पण काय गं, तुला मूळ कविता माहिती आहे का ?''



जर मला पंख असतील तर
मी निळ्याभोर विस्तीर्ण आकाशात उडेन,
या धरतीवरची सुंदर ठिकाणे पाहीन,
या भूमीवरच्या थोर लोकांना भेटीन,
मी गुप्त खजिन्याचा शोध घेईन.

माझे आजोबा एकदम अबोल झाले. आम्ही घरी पोहोचल्यावर त्यांनी चटई अंथरली. त्यावर ते बसले आणि त्यांनी मला जवळ बोलावले. ते खूप थकलेले होते, तरीपण त्यांचा चेहरा उजळून निघाला होता. त्यांनी माझा चिमुकला हात हातात घेतला आणि म्हणाले, "तुला माहिती आहे?''

अमेरिकेत अँड्र्यू कार्नेजी नावाचा फार थोर माणूस होऊन गेला. तो कोट्यधीश होता; पण त्याने आपल्या मृत्युपत्रात असे लिहिले होते, की माझी सगळी धनसंपत्ती माझ्या मुलांना न देता अमेरिकेतील जास्तीतजास्त खेडेगावांमध्ये वाचनालये बांधण्यासाठी ती खर्च करावी.''

''मी अजून किती वर्षे जगेन, ते काही सांगता यायचं नाही; पण आज तू ज्या पद्धतीने ती कविता पूर्ण केलीस, त्यावरून तुला वाचनाची किती आवड आहे, हे माझ्या लक्षात आलं. मला एक वचन दे – तू मोठी झालीस आणि समजा, तुझ्या सर्व गरजा भागून तुझ्याकडे जास्तीचे पैसे शिल्लक राहिले, तर तू निदान एकातरी वाचनालयाला पुस्तकं घेऊन देशील ?''

मी आजोबांना वचन दिले होते – एकातरी वाचनालयासाठी पुस्तके देईन.

आजोबांच्या मृत्यूनंतर कितीतरी वर्षांनी ते वचन मला आठवले आणि पुढील आयुष्यात इन्फोसिस फाऊंडेशनच्या माध्यमातून आम्ही अशी दहा हजार वाचनालये बांधली आहेत.



## नवीन शब्द शिकू या.

**निर्धन** – गरीब. **नाशवंत** – नष्ट होणारे. **अविनाशी** – नष्ट न होणारे. **निधान** – ठेवा, साठा, संग्रह. **विस्तीर्ण** – मोठे, भव्य. **मृत्युपत्र** – मृत्यूनंतर आपल्या संपत्तीची/मालमत्तेची विभागणी कशी करावी हे सांगणारे पत्र.



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शिक्षकाची खरी संपत्ती कोणती?

(आ) अर्जुनाच्या मते अविनाशी काय असते?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अमेरिकेत अँड्र्यू कार्नेजी या माणसाने आपल्या संपत्तीचे काय केले?

(आ) आजोबांनी लेखिकेकडून कोणते वचन घेतले?

**प्र. ३. कोण, कोणास म्हणाले?**

(अ) ''शिक्षकांना एवढा मान का द्यायचा असतो?''

(आ) ''हे बघ, मी आता कवितेची एक ओळ म्हणतो. तू ती कविता पूर्ण करशील?.''

(इ) ''सौंदर्यसुद्‌धा कालांतराने कमी होत जाते.''

**प्र. ४. का ते लिहा.**

(अ) शिक्षक हे ज्ञानाचं निधान असतं.

(आ) लेखिकेला लहानपणीच कितीतरी कविता पाठ झाल्या.

(इ) गुरू सर्वांत श्रीमंत असतो.



## लिहिते होऊ या.

**प्र. १. तुमच्या परिसरातील वाचनालयाला भेट द्या. तेथील कार्यपद्‌धती समजून घ्या. या वाचनालयाविषयी दहा ते पंधरा ओळींत माहिती लिहा.**

**प्र. २. अनुप्रास, यमक किंवा श्लेष या अलंकारांचा उपयोग करून मनोरंजक पद्‌धतीने आठ ते दहा ओळींत भाषण तयार करा व वर्गात सादर करा.**



## कृतीतून शिकू या.

- **भारतीय समाजसुधारकांविषयी माहिती पुस्तकांतून मिळवा. तुम्हांला आवडणाऱ्या समाजसुधारकांची माहिती वर्गात सांगा.**

## संदेश लेखन

- **पाणी बचत या विषयावरील संदेश वाचा.**

  **(१) पाणी म्हणजे जीवन**

  **(२) पाणी वाचवणे म्हणजे भविष्य सुरक्षित करणे.**

  **(३) सर्व नागरिकांनी पाणी जपून वापरावे.**

कमी शब्दांत अर्थपूर्ण, नेमका व स्पष्ट मजकूर लिहिला जातो. जेणेकरून वाचकाला सहज समजेल यालाच 'संदेश' असे म्हणतात. वाढदिवस, शुभेच्छा व अभिनंदन, सामाजिक, विविध कार्यक्रमाप्रसंगी, पर्यावरण जनजागृतीपर यांसारख्या विषयांवर संदेश लिहिले जातात. अशा प्रकारचे संदेश आपल्या आजूबाजूच्या परिसरामध्ये दिसतात. सार्वजनिक ठिकाणी दिसणाऱ्या फलकांवर अशा प्रकारचे संदेश लिहिले जातात.

- **संदेशलेखनाची वैशिष्ट्ये :** (१) संक्षिप्त व नेमके असते.
  (२) सोप्या भाषेत लिहिलेले असते.
  (३) वाचकाभिमुख मांडणी असते.
  (४) संदेश श्राव्य आणि दृक्‌श्राव्य प्रकारांतही दिले जातात.
- **संदेशलेखनाची रचना : प्रारंभ ⟶ मुख्य संदेश ⟶ आवाहन / अपेक्षा**
- **वृक्षारोपण या विषयावर तुमच्या शब्दांत संदेशलेखन करा व वहीत लिहा.**
- **रक्षाबंधनाच्या निमित्ताने तुमच्या दादासाठी/ताईसाठी शुभेच्छा संदेश तयार करा. तयार केलेला संदेश खालील भेटकार्डावर सुंदर हस्ताक्षरात लिहा.**




- **खालील तक्त्यात दिलेल्या सणांच्या निमित्ताने पारंपरिक व एआय तंत्रज्ञानाचा वापर करून शुभेच्छा संदेश तयार करा व लिहा.**

| सण | संदेश |
|---|---|
| गुढीपाडवा | |
| दिवाळी | |
| रमजान ईद | |
| नाताळ | |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांवर आधारित संदेश तयार करून भेटकार्डे तयार करण्यास सांगावीत.



## आपण समजून घेऊ या.

### जोडाक्षरांचे नियम

(१) स्वर हे पूर्ण उच्चारतात. अ, आ, इ.

(२) व्यंजने ही अपूर्ण उच्चारतात. क्, ख्.

(३) दोन विजातीय स्वर एकत्र आले की संयुक्त स्वर तयार होतो. अ + इ = ए.

(४) दोन व्यंजने एकत्र आली की त्यास संयुक्त व्यंजन असे म्हणतात. उदा., म् + ह् = म्ह, त् + य् = त्य

(५) एकच व्यंजन दोन वेळा जोडले की त्याला **'द्विवित्त'** म्हणतात. उदा., क् + क् = क्क, त् + त् = त्त

(६) द्विवित्तच्या शेवटी स्वर मिसळला की **'जोडाक्षर'** तयार होते. उदा., म् + ह् + अ = म्ह, द् + य् + अ = द्य

(७) ज्या अक्षरात दोन किंवा अधिक व्यंजने प्रथम एकत्र येऊन शेवटी त्यात स्वर मिसळतो, त्यास **'जोडाक्षर'** असे म्हणतात.

(८) वक्ता या शब्दात **'क्ता'** हे जोडाक्षर आहे, त्यातील **'क्'** चा उच्चार अपूर्ण होतो त्याचे लेखन अर्धा क् (क्) असे केले जाते.

### असे लिहावे जोडाक्षर

- र् या व्यंजनानंतर दुसरे व्यंजन येते, तेव्हा 'र' या व्यंजनाचा उच्चार अपूर्ण असतो. तो पुढील व्यंजनावर (ई) रफार देऊन लिहिले जाते.
  र् + क् = अर्क, तर्क
- र् या व्यंजनानंतर 'य्' किंवा 'ह्' ही व्यंजने येतात आणि जेव्हा 'र'च्या मागील व्यंजनावर आघात येत नसेल, तेव्हा 'र्'चे लेखन (-) असे केले जाते.
  उदा., र् + य् = ऱ्य (कैऱ्या, वाऱ्यात)
  र् + ह् = ऱ्ह (कुऱ्हाड, गुऱ्हाळ)
- मध्ये दंड असणाऱ्या व्यंजनानंतर 'र' हे अक्षर आले, तर त्याचे लेखन (्र) असे करावे.
  उदा., क् + र = क्र (क्रम, क्रियापद)
  फ् + र = फ्र (फ्रान्स, फ्रेंच)
- शेवटी दंड असणाऱ्या व्यंजनानंतर 'र' हे अक्षर आले, तर त्याचे लेखन (्र) असे करावे.
  उदा., ख् + र = ख्र (ख्रिस्त)
  ज् + र = ज्र (वज्र)
- शेवटी स्वतंत्र दंड असणाऱ्या व्यंजनानंतर 'र' हे अक्षर आल्यास त्याचे लेखन (्र) असे करावे. ग् + र = अग्रज
- अर्धा दंड असणाऱ्या व्यंजनानंतर 'र' हे अक्षर आल्यास त्याचे लेखन (^) (्र) या चिन्हांनी केले जाते.
  उदा., ट् + र = ट्र (ट्रक, राष्ट्र)
  ड् + र = ड्र (ड्रम)
  द् + र = द्र (द्रुम, द्रोह)

**शिक्षकांसाठी :** जोडाक्षरांच्या नियमांच्या आधारे विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारे जोडाक्षरयुक्त शब्दांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

## अनुस्वारासंबंधी शुद्धलेखन व नियम

(१) ज्या अक्षराचा उच्चार नाकातून स्पष्टपणे होतो; त्या अक्षरावर अनुस्वार द्यावा.
मराठीतील अनुनासिके- ङ्, ञ्, ण्, न्, म्
उदा., गंगा, चिंच, तंटा, अंत, आंबा इत्यादी.

(२) य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल संस्कृतप्रमाणे केवळ शीर्षबिंदू द्यावा.
उदा., संयम, संरक्षण, संवाद, संलग्न, संशय, संसार, सिंह इत्यादी.

(३) नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तीप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा.
उदा., मुलास-मुलांस, घरात-घरांत, त्याचा-त्यांचा इत्यादी.



### खेळू या शब्दांशी

- **'अवाक होणे' यांसारखे वाक्प्रचार खालील चौकटीत आले आहेत ते शोधा. वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हा | ता | व | र | तु | री | दे | णे |
| त | ब | ळ | दे | णे | ओ | ख | प्र |
| चा | र | ढा | म | स | ढ | भा | ति |
| म | क | रा | ई | व | णे | ल | का |
| ळ | क | च | ना | मा | ब | क | र |
| अ | वा | क | हो | णे | र | र | क |
| स | डे | तो | ड | बो | ल | णे | र |
| णे | व | की | ल | प | त्र | घे | णे |

(१) हातावर तुरी देणे.
(२) हातचा मळ असणे.
(३) वकीलपत्र घेणे.
(४) प्रतिकार करणे.
(५) बढाई मारणे.
(६) री ओढणे.
(७) सडेतोड बोलणे.
(८) बळ देणे.
(९) देखभाल करणे.



### कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** खालील सुविचार वाचा. अशा प्रकारच्या सुविचारांचा संग्रह करा आणि वर्गातील फळ्यावर रोज लिहा.

◈ **मेहनत ही यशाची गुरुकिल्ली आहे.**
◈ **प्रामाणिकपणा हा सर्वोत्तम गुण आहे.**
◈ **वेळ हा अमूल्य आहे.**
◈ **आईवडील हेच आपले पहिले गुरू असतात.**

# २०. विचारधन

मानवी जीवनात पर्यावरणाला महत्त्वाचे स्थान आहे. झाडे, वेली, फळे, फुले, पाने, वने हे निसर्गाचे अविभाज्य घटक आहेत. झाडे लावणे, वाढवणे आणि त्यांचे संवर्धन करणे हे प्रत्येकालाच आपले कर्तव्य वाटायला हवे.

झाडे आणि पर्यावरण या संदर्भात महाराष्ट्रातील संतांनी मांडलेले विचार खाली दिलेले आहेत. ते वाचा आणि समजून घ्या.



**पत्र पुष्प छाया । फळ मूळ धनंजया ।**
**वाटेचा न चुके आलिया । वृक्षु जैसा ।।**

**–संत ज्ञानेश्वर**

(वाटेने चालणाऱ्या वाटसरूला वृक्ष आपल्या स्वत:कडे असणारे पान, फूल, सावली, फळ आणि मूळ या गोष्टी देण्यास कधीही चुकत नाही. आपल्याकडे असलेल्या या सर्व गोष्टी तो प्रदान करतो. या स्वरूपात वृक्ष आपल्यावर कायम उपकारच करत असतो.)



**जे वृक्ष लाविती सर्वकाळ ।**
**तयावरी छत्रांचें झल्लाळ ।**

**– संत नामदेव**

(जे लोक नेहमी वृक्ष लावतात, त्यांची निगा राखतात व संवर्धन करतात त्यांच्यावर निसर्गाच्या आणि सुखाच्या शीतल छायेचा अखंड वर्षाव होत राहतो. त्याला निसर्गाची कृपा लाभते. )



**अतिथी आल्या वृक्षापासीं । वंचनार्थु न करी त्यासी ।**
**पत्रपुष्पफलमूळच्छायेसीं । त्वचाकाष्ठांसी देतसे ।।**

**– संत एकनाथ**

(एखादा अतिथी वृक्षाजवळ आल्यावर तो वृक्ष त्याला कधीच विन्मुख पाठवत नाही. आपल्याजवळ असणारे पान, फूल, फळ, मूळ, छाया, साल, लाकूड या सर्व गोष्टी देत राहतो. अर्थात वृक्षाच्या ठायी परोपकारी वृत्ती असते.)

**वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरें । पक्षीही सुस्वरें आळविती ।**
**येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगा येत ॥**

**– संत तुकाराम**



(निसर्गातील सर्व झाडे, वेली आणि पशू, पक्षी हे आम्हा भक्तांचे सगेसोयरे (आप्तेष्ट) आहेत. त्यांचे मंजुळ स्वर कानांवर पडतात. या सर्वांच्या सहवासात खरा आनंद आणि एकांत मिळतो. तसेच कोणताही गुणदोष अंगाला लागत नाही. असे निसर्गाच्या सान्निध्यातील एकांतातील सुख आम्हां भक्तांना आवडते.)

**नाना वल्लीमध्यें जीवन । नाना फळीं फुलीं जीवन ।**
**नाना कंदीं मुळीं जीवन । गुणकारकें ॥**

**– संत रामदास**



(अनेक प्रकारांच्या वृक्षवल्लींमध्ये, फळाफुलांमध्ये तसेच अनेक प्रकारांच्या कंदांमध्ये व मुळांमध्ये जीवन संचारत आहे. इतकेच नव्हे तर यामध्ये अनेक प्रकारांची उपयुक्त गुणकारके आहेत.)

**सुंदर वेली लावल्या अंगणी । घालोनिया परिश्रमाचे पाणी ।**
**फुलाफळांनी गेल्या बहरोनि । गगनभेदी ॥**

**– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**



(अंगणामध्ये सुंदर वेली लावल्या आणि खूप परिश्रम करून त्यांची जोपासना केली, की त्या फुलाफळांनी बहरून आकाशाला भिडतात.)

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध संतांचे अभंग ऐकवावेत. संतांच्या कार्याविषयी माहिती सांगावी. झाडे व पर्यावरण याविषयी वर्गात चर्चा घडवून आणावी. पर्यावरणावर आधारित इतर संतांच्या रचना वाचण्यास प्रोत्साहन द्यावे.

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn

- विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.

# राज्यगीत



जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।





काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।


महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
मराठी बालभारती इयत्ता सहावी
(मराठी माध्यमासाठी)
समग्र शिक्षा
Samagra Shiksha
(विनामूल्य वितरणासाठी)